मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

ISSN 0973-8452

## मराठी अर्थशास्त्र परिषद

नियतकालिक

(त्रैमासिक)

# अर्थसंवाद

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

चैत्र-वैशाख-ज्येष्ठ-आषाढ शके १९४५

एप्रिल-मे-जून २०२५/खंड ४९, अंक १

## ‘अर्थसंवाद’च्या लेखकांसाठी महत्त्वाच्या सूचना

१. लेखकांनी आपले शोधनिबंध Shree Lipi (२३३५) किंवा Kruti Dev किंवा Unicode यापैकी कोणत्याही Font मध्ये Pagemaker किंवा Ms Word मध्ये टाईप करून पाठवावा. या व्यतिरिक्त कोणताही Font वापरू नये.

२ **संशोधनपर लेखाची प्रत अथवा सीडी पोस्टाद्वारे पाठवू नये.** काही अडचण असल्यास संपादकांशी संपर्क साधावा.

३. **संशोधनपर लेखाची एक सॉफ्ट कॉपी (एक मूळ फाईल व त्याचीच PDF केलेली फाईल अशा दोन फाईल्स्) ई-मेल द्वारे प्रमुख संपादकांकडे rahulmhopare@rediffmail.com या ई-मेल अॅड्रेसवर पाठवावी.** लेखासोबत संपादकांना लेख पाठवल्याची स्वाक्षरी केलेली कव्हर नोट स्कॅन करून पाठवावी. तसेच ई-मेल केल्यानंतर संपादकांशी भ्रमणध्वनीवर (९९२३८७९०२०) संपर्क साधून आपला ई-मेल व्यवस्थित पोचल्याची खात्री करून घ्यावी.

४. संशोधनपर लेख पूर्वमुद्रित नसावा. त्यामध्ये कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा उल्लेख करावा. आजीव सभासद क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल लिहिणे आवश्यक आहे.

५. लेखाच्या शीर्षकाखाली लेखकांनी स्वत:चे संपूर्ण नाव देवनागरीतूनच लिहावे.

६. संशोधनपर लेख खास अर्थसंवादसाठीच लिहिलेला असावा. माहिती व आकडेवारी अद्ययावत असावी. लेखात गरजेनुरूप सांख्यिकीय तक्ते व आलेखांचा वापर केल्यास उत्तम. लेखांची गुणवत्ता पाहून तज्ज्ञ परिक्षकांनी केलेल्या सर्व सूचनांची पूर्तता केल्यानंतरच त्याची प्रसिद्धीसाठी निवड केली जाईल.

७. भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अर्थशास्त्र परिभाषा कोश यातील परिभाषेचा उपयोग करावा. संपादकांना पाठवलेल्या कव्हर नोटसह लेखनाची एक प्रत स्वत जयळ अवश्य ठेवावी.

८. लेखकांनी कृपया संशोधनपर लेख टाईप केल्यानंतर सर्व सांख्यिकी माहिती, शुद्धलेखन आणि व्याकरण अचूक तपासून नंतरच अंतिम प्रत पाठवावी.

९. संदर्भ सूची देताना पूढील पद्धतीने देणे आवश्यक आहे : उदा. पाटील, ज.फा., सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राची बदलती अर्थव्यवस्था, सकाळ पेपर्स लिमिटेड, पुणे, २०१०, (पृष्ठ क्रमांक असेल तर द्यावा.)

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।
www.marthpari.org
(स्थापना वर्ष - १९७७)

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये।
शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तितः।।

# अर्थसंवाद

(तज्ज्ञ परिक्षित नियतकालीक)

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452

एप्रिल-मे-जून २०२५ / खंड ४९ / अंक १

**प्रमुख संपादक**
राहुल शं. म्होपरे
(देवचंद कॉलेज, अर्जुननगर)

**सहाय्यक संपादक**
चंद्रकांत जाधव
(य.च.वारणा महाविद्यालय, वारणानगर)

**सल्लागार मंडळ**
**(२०२५-२८)**
सुर्यकांत जगदाळे
जगन्नाथ पाटील
राजेंद्र भांडवलकर
विनोद गावंडे

**संपादकीय पत्रव्यवहार**
राहुल शं. म्होपरे
'सर' निवास, री.स.नं. ३३/क/२,
प्लॉट नं. १८, लेक व्ह्यू कॉलनी,
दीपा गॅस गोडावूनच्या पाठीमागे,
उजळाईवाडी, ता. करवीर,
जि. कोल्हापूर - ४१६ ००४
भ्रमणध्वनी : ९९२३८७९०२०

**लेखातील मते लेखकांचीच**

## अ नु क्र म णि का

१. **ज्ञानदेव तळुले, सुभाष कोंबडे**
सन २०२७-२८ पर्यंत महाराष्ट्राच्या एक ट्रिलियन डॉलर राज्य अर्थव्यवस्थेच्या उद्दिष्ट कालावधीच्या (अ) संभाव्यतेवर संक्षिप्त टिपण ........ ३

२. **प्रशांत ज्ञा. हरमकर**
भारताच्या आर्थिक वृद्धीतील अस्थैर्य : वास्तव आणि निष्पत्ती .... १७

३. **विजय अ. पवार**
कृषी व्यवसायाचे सोनेरी भविष्य: कृषी जोखीम व्यवस्थापन....... २७

४. **गजानन चंद्रकांत खामकर,मारुती बाबुराव राठोड**
भारतीय आर्थिक सुधारणांचे पितामह: डॉ. मनमोहन सिंग..!...... ३४

५. **कुंडलिक भिमराव चौगुले**
भारतीय श्रमदलातील लिंगभाव असमानतेचे चिकित्सक अध्ययन.. ४३

६. **सोनल सुभाषराव डगवार**
NEP - २०२० ची प्रभावी अंमलबजावणी ...................... ५१

७. **जयश्री पंढरीनाथ जाधव, निलेश भगवान महाजन**
महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासात नाबार्डने केलेल्या कामगिरीचा अभ्यास ........ ५८

८. **वसंत नानाराव पतंगे**
शेतमजुरांचा तुटवडा समस्या व उपयोजनात्मक अध्ययन ......... ६५

९. **किशोर सुतार**
शोधनिबंध लेखकांसाठी मार्गदर्शक टिपण..
डॉ. मनमोहन सिंग यांचे अर्थशास्त्रीय योगदान .................... ७२

१०. **सुभाष सावंत**
शोधनिबंध लेखकांसाठी मार्गदर्शक टिपण..
जोखीम आणि परताव्याचे आर्थिक सिद्धांतन ...................... ७७

११. **मारोती तेगमपुरे**
शोधनिबंध लेखकांसाठी मार्गदर्शक टिपण..
महाराष्ट्रातील व्यसनाधिनतेचे सामाजिक व आर्थिक पैलू.......... ८३

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## कार्यकारी मंडळ २०२४-२५

- **अध्यक्ष**

  **विलास खंदारे (देवगाव रंगारी)**

- **कार्याध्यक्ष**

  **विकास सुकाळे (नांदेड)**

- **कार्यवाह खजिनदार**

  **मारोती वि. तेगमपुरे (अंबड)**

- **प्रमुख संपादक-अर्थसंवाद**

  **राहुल शं. म्होपरे (कोल्हापूर)**

- **विश्वस्त**

  **विठ्ठल घीणमीने (हिंगणघाट)**
  **धोंडीराम पवार (पुणे)**
  **गणेश गावंडे (बदनापूर)**

- **सदस्य**

  **जयवंत इंगळे (मलकापूर)**
  **बाळासाहेब पाटील (पनवेल)**
  **सुभाष सावंत (नाशिक)**
  **राजाराम पाटील (सोलापूर)**
  **जितेंद्र तलवारे (धुळे)**
  **विठ्ठल ठावरी (भिसी)**
  **राजू शिंदे (धुळे)**
  **हनुमंत भोसले (खामगाव)**
  **विजय भोपाळे (नांदेड)**
  **धीरज कदम (नागपूर)**
  **दिपक भुसारे (पैठण)**

- **स्वीकृत सदस्य**

  **संभाजी काळे (भेंडा)**
  **लक्ष्मण मस्के (अमरावती)**

- **स्थानिक कार्यवाह**

  **धनंजय काळे (अकोला)**


**कार्यालयीन पत्रव्यवहार:**


(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)
मुद्रक-प्रकाशक : **मारोती वि. तेगमपुरे**
कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
'संगाई', घर नं. २२, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपामागे, पारनेर रोड, अंबड, जि. जालना.
पिन - ४३१ २०४ भ्रमणध्वनी : ९४२३९९३१३७


**अर्थसंवाद वर्गणी :**

- **परिषदेचे सदस्य :**

  आजीव सदस्य : रु. ३०००/- (एकरकमी)
  इमारत निधी : रु. २०००/-
  सदस्य सूची : रु. १००/-
  एकूण : रु. ५१००/-

- **संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार:**

  शैक्षणिक संस्था
  व्यावसायिक संस्था
  ग्रंथालये
  } रु.२०००/-(त्रैवार्षिक)
  रु.३०००/-(पंचवार्षिक)

- **वर्षगणना :** १ एप्रिल ते ३१ मार्च
- संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.
- कृपया आजीव सदस्य वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच कार्यवाहांकडे पाठवावी.
- अर्थसंवादची वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्ट किंवा NEFT (BOI खाते क्र. 094720110000368, IFSC - BKID0000947, राजारामपुरी, कोल्हापूर) द्वारे प्रमुख संपादकाकडे पाठवावी.
- मनीऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.


**'अर्थसंवाद'साठी अनुदानाबद्दल आभार:**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.


टीप : म. रा. सा. सं. मंडळाने अनुदान दिले असले, तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.


हे त्रैमासिक, प्रकाशक मारोती वि. तेगमपुरे (प्रमुख संपादक राहुल शं. म्होपरे) यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता भारती मुद्रणालय, शाहूपुरी, कोल्हापूर येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपामागे, पारनेर रोड, अंबड - ४३१ २०४ येथे प्रसिद्ध केले.

# सन २०२७-२८ पर्यंत महाराष्ट्राच्या एक ट्रिलियन डॉलर राज्य अर्थव्यवस्थेच्या उद्दिष्ट कालावधीच्या (अ) संभाव्यतेवर संक्षिप्त टिपण

**ज्ञानदेव तळुले** †
**सुभाष कोंबडे** ††

**टिपणाची पार्श्वभूमी:**

भारतीय अर्थव्यस्थेच्या विकासाच्या वाटचालीत सन १९९४ नंतरच्या व्यापार उदरीकरणानंतर गेल्या साडेतीन दशकांत आमूलाग्र बदल घडून आले. सन १९५१ ते १९९१ या सुधारणपूर्व काळातील पाच दशकादरम्यानच्या न्यूनतम वृद्धिदर प्रवृत्तीस (ज्याला 'हिंदू रेट ऑफ ग्रोथ' असे संबोधन प्राप्त झाले होते) मागे टाकून जगातील वेगाने वाढणारी एक अर्थव्यवस्था म्हणून भारत उदयास आला. जागतिक व्यापार संघटनेच्या स्थापनेनंतर जेव्हा आशियायी वाघांची (Asian Tigers) घसरण होत होती, तेव्हा भारताची अर्थव्यवस्था साधारणपणे ७ टक्के दराने आर्थिक वृद्धिदर नोंदवत होती. तर सन २००६ ते २०१२ दरम्यान भारताचे औद्योगिक क्षेत्र उच्च रोजगारनिर्मितीसह साधारणपणे ९.५ टक्के दराने विकसित पावत होते. हा विकासदर आर्थिक उदारीकणापर्यंत सर्वात अधिक असल्याचे मान्य करावे लागते. तथापि, जागतिक व्यापार संघटनेच्या सुरुवातीच्या काळात झालेली उच्च रोजगार वाढ पुढील सहा वर्षांत कमी झाल्यामुळे हा अल्पकालीन वाढीचा कालखंड असल्याचे सिद्ध झाले. जे दीर्घकाळ टिकू शकले नाही व त्याचे रूपांतर रोजगारनिर्मितीविना भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल होण्यात झाले. सन १९९३ ची उदारीकृत औद्योगिक धोरणे आणि व्यापार व विनिमयदर सुधारणांनी चांगल्या आर्थिक वाढीच्या दृष्टिकोनातून आशा पल्लवित केल्या की, ज्यामुळे भविष्यातील चांगल्या वाढीच्या क्षमतेसह भारत जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला आहे आणि सन २०२६-२७ पर्यंत पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे लक्ष गाठण्याचे स्वप्न पाहात आहे.

अकराव्या पंचवार्षिक योजनेत कृषी विकासाचा ४, औद्योगिक क्षेत्रासाठी १२ व पहिल्या तीन वर्षांसाठी संपूर्ण अर्थव्यवस्थेसाठी ७ आणि शेवटच्या दोन वर्षांसाठी १० टक्के वार्षिक आर्थिक विकासाचे उद्दिष्ट निश्चित केले होते जे सन २००७ ते २०१२ (भारत सरकार नियोजन आयोग, २००६) अशा योजना कालावधीत पूर्ण होऊ शकले नाही. कारण प्रामुख्याने देशातील ४७ टक्क्यांपेक्षा

† वरिष्ठ प्राध्यापक, अर्थशास्त्र अधिविभाग-स्वायत्त, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, ४१६ ००४, आजीव सभासद क्र. ८१७, भ्रमणध्वनी : +९१-९४२३७ ५०५५५, ईमेल: dnyanshrinit@gmail.com
†† प्राध्यापक, अर्थशास्त्र अधिविभाग-स्वायत्त, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, ४१६ ००४, आजीव सभासद क्र. १८११, भ्रमणध्वनी : +९१-९८२२८ ८१५६५,ईमेल: skombde@gmail.ciom

अधिक कामगारांचा समावेश असलेले कृषिक्षेत्र घवघवीत कामगिरी करू शकले नाही. तसेच सन २००८ च्या अमेरिकेतील दर्जाहीन आर्थिक (Subprime Crisis) संकटाचा उद्योग आणि व्यापाराला मोठा फटका बसल्यामुळे देशाच्या वृद्धिदरात मोठी घसरण झाली. सन २०१४ मधील राजकीय सत्तेत झालेला बदल आणि सन २०१५ मध्ये नियोजन आयोगाच्या बरखास्तीनंतर भारताची अर्थव्यवस्था पाच ट्रिलियन डॉलर बनविण्याचे उद्दिष्ट समोर ठेवण्यात आले. देश आपली अर्थव्यवस्था पाच ट्रिलियन डॉलर बनविण्याची योजना आखत असताना महाराष्ट्र व उत्तर प्रदेशसारख्या राज्यांनीही सन २०२७-२८ पर्यंत प्रत्येकी एक ट्रिलियन डॉलरच्या राज्य अर्थव्यवस्थेचा टप्पा गाठण्याचा विचार केला आहे. याकामी महाराष्ट्राने दुहेरी उद्दिष्ट समोर ठेवले आहे. राज्य अर्थव्यवस्थेला एक ट्रिलियन डॉलर बनविण्याचा विचार करत असताना महाराष्ट्राला देशातील गुंतवणुकीसाठी सर्वात जास्त पसंतीचे राज्य बनविण्याचा मानस ठेवला आहे. अशा दुहेरी उद्देशाने महाराष्ट्र राज्य आर्थिक सल्लागार परिषदेने ऑगस्ट २०२३ मधील आपल्या अहवालात राज्यासाठी एक ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था साध्य करण्याचे उद्दिष्ट आखण्याबरोबरच महाराष्ट्राला प्राधान्यकृत गुंतवणुकीचे गंतव्यस्थान बनविण्यासाठीचा रोडमॅप तयार केला आहे.

राज्याला एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनविण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्य आर्थिक सल्लागार परिषदेने काही क्षेत्रे आणि उपक्षेत्रे निर्धारित करून सन २०२७-२८ साठी निश्चित केलेले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ही क्षेत्रे आर्थिक वृद्धीचे इंजिन बनू शकतात असे अपेक्षिले आहे. राज्यस्तरीय विकास धोरणाच्या धर्तीवर महाराष्ट्राने सन २०२३-२४ आणि सन २०२७-२८ या पाच वर्षांच्या कालावधीसाठी प्रत्येक जिल्ह्याकरिता राज्य आर्थिक सल्लागार परिषदेच्या धोरण सुसंगत असा विकास आराखडा बनविण्याचे ठरविले आहे. जेणेकरून प्रत्येक जिल्ह्याकडे भविष्यातील राज्याच्या वृद्धीत सहभागी होण्यासाठी जिल्हास्तरीय नियोजनाचा मार्ग तयार असेल आणि सन २०२७-२८ साठी निर्धारित लक्ष साध्य करण्यासाठी राज्याला मदत होईल.

महाराष्ट्राची एकूणच आर्थिक कामगिरी, वृद्धिदर व विकासाचा मार्ग चांगला असला तरीही आर्थिक वाढ आणि संपत्तिनिर्मितीच्या हव्यासामुळे विभागीय असमतोलाकडे सापेक्ष दुर्लक्ष झाल्याने राज्याच्या अर्थव्यवस्थेमध्ये सर्वकाही आलबेल नाही हे सर्वश्रुत आहे. राज्याच्या प्रादेशिक असमतोलाचा विचार करता मुंबई व पुणे विभाग वगळता उर्वरित महाराष्ट्राची आर्थिक स्थिती देशातील इतर गरीब राज्यांपेक्षा काहीही भिन्न नसेल (अब्दुल शबाण, २००६), (तळुले ज्ञानदेव २०२०), (तळुले ज्ञानदेव, २०२१) व (तळुले ज्ञानदेव व इतर, २०२३).

राज्याचा आर्थिक असमतोल कोकण, मराठवाडा व विदर्भातील जिल्ह्यांच्या आर्थिक स्थितीकडे पाहिल्यास प्रकर्षाने स्पष्ट होतो. एकंदरीतच राज्याच्या विकास परिप्रेक्ष्यांत हे विभाग दीर्घकाळ दुर्लक्षित राहिले आहेत. परंतु हे विभाग एकत्रितपणे महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वाचे स्थान निर्माण करू शकतात. कोकण, मराठवाडा व विदर्भ मिळून राज्याच्या एकूण क्षेत्रफळाच्या ६२.१०% (९.७९, २०.९९ व ३१.३२%) तर लोकसंख्येत ५७.२९% (१५.५३, १८.७४ व २३.२०%) हिस्सा दर्शवतात. याशिवाय राज्यातील आदिवासी लोकसंख्येपैकी ४५.६८% (१७.८४, ०२.४२ व २५.४२%) व एकूण दुष्काळग्रस्त लोकसंख्येपैकी ४२.८२% लोक या तीन प्रदेशांत राहातात (८.९५, ७.२१ व २६.६६%). वास्तविक पाहाता, कोकण, मराठवाडा व विदर्भाची अशी वैशिष्ट्ये लक्षात घेता यासाठी विशेष आर्थिक उपक्रमाची आवश्यकता आहे. उर्वरित महाराष्ट्राच्या तुलनेत हे विभाग विकासाच्या

अनुषंगाने मागे आहेत हेच खरे. सर्व क्षेत्रांचा एकत्रित विचार करता मराठवाड्यातील विकास अनुशेष २०.१६% तर विदर्भासाठी तो ४८.३०% दिसून येतो (केळकर विजय, २०१३). कोकण, मराठवाडा व विदर्भ यांचा एकत्रितपणे महाराष्ट्राच्या स्थूल राज्य उत्पादनात ३६.३५% (९.७५, १०.१० व १६.५०%) हिस्सा आहे. मराठवाडा व विदर्भातील ७३%पेक्षा अधिक लोकसंख्या उपजीविकेसाठी शेतीवर निर्भर आहे. तर कोकणात हेच प्रमाण ६५%पेक्षा अधिक आहे. उर्वरित महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाड्याची विकास तफावत ३७.२७% तर विदर्भासंदर्भात तीच ३८.८३% दिसून येते (मित्रा व श्रॉफ, २००७, महाराष्ट्र शासन-केळकर विजय, २०१३). अशा उपरोल्लेखित पार्श्वभूमीसह महाराष्ट्राने सन २०२७-२८ पर्यंत राज्य अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलर बनविण्याचे उद्दिष्ट निर्धारित केले असल्याने आम्ही प्रस्तुत टिपणात निम्नोल्लेखित आकडेवारीवर आधारित काही भाष्य करू इच्छितो. अर्थात, संपूर्ण भाष्य हे महाराष्ट्र शासनाच्या अर्थ व सांख्यिकी संचलनालयाच्याच विदा सांगणाऱ्यांवर बेतले आहे, याची विशेष नोंद असावी.


**विदा संगणन निर्भर स्पष्टीकरण व निरीक्षणे:**

केंद्र सरकारच्या पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेच्या उद्दिष्टानुरूप महाराष्ट्र व उत्तर प्रदेशसारख्या राज्यांनीही सन २०२७-२८ पर्यंत एक ट्रिलियन डॉलर राज्य अर्थव्यवस्थेची उद्दिष्टे निर्धारित केली आहेत. याकामी महाराष्ट्राच्या राज्य आर्थिक सल्लागार परिषदेने (राज्य आर्थिक सल्लागार परिषद / एमईएसी, महाराष्ट्र शासन, २०२३) राज्यातील सर्व छत्तीस जिल्ह्यांकरिता जिल्हास्तरीय धोरणात्मक आराखडा अनिवार्य करून नियोजन करण्याचे निश्चित केले असल्याने, तसे जिल्हानिहाय अहवाल जिल्हा नियोजन समिती व राज्याच्या नियोजन विभागाकडे तयार आहेत (तळुले ज्ञानदेव व इतर २०२४ अ, २०२४ब, २०२४क व २०२४ड). महाराष्ट्र राज्य आर्थिक सल्लागार परिषदेने राज्याच्या औद्योगिक विकास दरात वाढ करून औद्योगिक विस्तारासाठी आपल्या सन २०२३ च्या अहवालात विशेष नोंद घेऊन एक लक्ष एकर जमीन अधिग्रहणाची शिफारस केली असून राज्य सरकारही त्याचा गांभीर्याने विचार करत आहे. याकामी जागतिक बँकेची सुद्धा भूमिका महत्त्वाची ठरू शकते. कारण अगदी सुरुवातीपासून जागतिक बँकेचे तज्ज्ञ पथक या सर्व घडामोडींवर लक्ष ठेवून आहे. तसेच सर्व जिल्हानिहाय धोरणात्मक नियोजन अहवाल तयार होऊन त्यांचे जिल्हा नियोजन समित्या व राज्यस्तरीय समितीसमोर सादरीकरण होऊन अंतिम रूप दिल्यानंतर जागतिक बँकेकडून धोरणात्मक नियोजन आराखडा अंमलबजावणीकरिता अर्थसहाय्य होण्याची अपेक्षा आहे. परंतु सन २०११-१२ ते २०२१-२२ दरम्यान राज्यातील जिल्हा तसेच विभागनिहाय सर्व आर्थिक क्षेत्रे व उपक्षेत्रांचे राज्य अर्थव्यवस्थेतील योगदान, दशकभरातील त्यांच्या वृद्धिदराप्रमाणे (आलेख १, २, ३, ४, ५, ६ व ७) सन २०२२-२३ ते २०२७-२८ या काळातील अपेक्षित आणि राज्यलक्षित राज्य उत्पादित यातील तफावतीचा विचार करता महाराष्ट्राचे सन २०२७-२८ चे एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट साध्य होण्यात अनेक अडचणी असतील, यात शंकाच नाही. अर्थात, महाराष्ट्र आणि गुजरातसारख्या राज्यांनी सातत्याने मजबूत आर्थिक वाटचालीचा पायंडा दाखविला आहे, यातही शंका नाही. परंतु महाराष्ट्राची गेल्या दशकाची क्षेत्र व उपक्षेत्रनिहाय आर्थिक कामगिरी तसेच जिल्हा व विभागवार सर्व आर्थिक क्षेत्रांच्या वाढीचा दर पाहाता सन २०२२-२३ च्या विनिमय दराप्रमाणे सन २०२७-२८ पर्यंत ७० लक्ष कोटी रुपयांचे (एक ट्रिलियन डॉलर) राज्य उत्पादिताचे उद्दिष्ट सध्या होईल असे संभवत नाही.

सन १९६०-६१ ते १९७०-७१ दरम्यानचा उत्तर


प्रदेशचा एका दशकाचा अपवाद सोडता, सन १९७०-७१ ते २०२३-२४ अशा प्रदीर्घ काळात भारताच्या राष्ट्रीय उत्पादनातील महाराष्ट्राचे स्थान अव्वलच राहिले आहे, यातही वाद नाही (संजीव सान्याल व आकांक्षा अरोरा, २०२४). परंतु राज्यातील सर्व छत्तीस जिल्हे व विभागीय उपराष्ट्रीय उत्पादन आणि त्यांचा सन २०११-१२ ते २०२१-२२ असा दशकभराचा वाढीचा दर व क्षेत्रनिहाय सरासरी योगदान या बाबी लक्षात घेता सन २०२७-२८ पर्यंत ७० लक्ष कोटींचे उद्दिष्ट साध्य होईल असे वाटत नाही. अर्थात, रुपयाची डॉलरच्या तुलनेतील सततची घसरण लक्षात घेता आजच हा आकडा ८० लक्ष कोटी रुपयांपेक्षा अधिकची आवश्यकता प्रतिपादित करतो. त्यामुळे सन २०२७-२८ पर्यंत यात काय बदल होतील हे आजच कथन करणे कठीण आहे. त्यामुळे निर्यातीतील तुलनात्मक घट आणि  परिणामे भारताच्या विरोधात सतत बदलता विनिमय दर आणि डॉलरच्या तुलनेतील रुपयाची नेहमीची घसरण पाहाता उद्दिष्ट साध्यता अधिकच कठीण होईल, यात शंका नाही. राज्य सरकारने एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट सन २०२२-२३ मध्ये निश्चित केले असल्याने त्यावर्षीचा राज्य उत्पन्नाचा आकडा हाती होताच. सन २०२७-२८ करिता एक ट्रिलियन डॉलर म्हणजे सन २०२२-२३ च्या  प्रचलित विनिमय दराप्रमाणे ७० लक्ष कोटी रुपयांचे उद्दिष्ट निश्चित करून सन २०२२-२३ ते २०२७-२८ दरम्यानच्या वर्षनिहाय राज्य उत्पन्नाच्या आकडेवारीचे गणन करून ते निश्चित करून त्याप्रमाणे वार्षिक वाढीची उद्दिष्टे ठरविली गेली. यात विशेष म्हणजे राज्य अर्थव्यवस्थेच्या सर्व क्षेत्रे व उपक्षेत्रांकरिता सन २०२३-२४ ते २०२७-२८ करिता वार्षिक वाढीचे प्रमाण १४.६९% असे समान येताना दिसून आले. अर्थात, या दराने गेल्या अनेक दशकांत जगातील एकही अर्थव्यवस्था वृद्धी पावू शकली नाही, ही बाब येथे लक्षात घेणे महत्त्वाचे ठरते. सन २०२३-२४ ते २०२७-२८ करिताच्या वर्षनिहाय निश्चित केलेल्या राज्य उत्पन्नाचे प्रचलित पद्धतीने सर्व छत्तीस जिल्ह्याकरिता क्षेत्र व उपक्षेत्रनिहाय वाटप करून (रवींद्र ढोलाकिया, २०२०) व (तळुले ज्ञानदेव व इतर, २०२४) त्यांचे वृद्धिदरही निश्चित करून उद्दिष्टे ठरविण्यात आली. परंतु कोणताही देश किंवा राज्याची अर्थव्यवस्था अशा स्वयंचलित पद्धतीने कधीच चालू शकत नाही. अर्थात, उपरोल्लेख केल्याप्रमाणे विनिमय दरातील बदल व रुपयाची सततची घसरण पाहाता एक ट्रिलियन डॉलर उद्दिष्टाचा आकडा ७० लक्ष कोटीपेक्षा अधिक होणार हा प्रश्न अलाहिदा. प्रचलित विनिमय दर लक्षात घेतला तर हाच आकडा ८६ लक्ष कोटीचा असेल व सन २०२७-२८ च्या विनिमय दराची कल्पना करता भारतीय रुपयात अपेक्षित रक्कम किती असेल याचा अंदाज लावणे कठीण आहे. म्हणूनच सरकार निश्चित सन २०२३-२४ ते २०२७-२८ दरम्यानच्या सकल राज्य, जिल्हा व विभागनिहाय उपराष्ट्रीय उत्पन्नाचे आकडे सन २०११-१२ ते २०२१-२२ च्या क्षेत्र व उपक्षेत्रनिहाय कामगिरीवर आधारित प्रतिमान वृद्धी प्रमेयानुसार शक्य उत्पन्न आकड्यांशी तुलना करता मोठी तफावत अर्थात तूट निदर्शनास येते (आलेख ८, १०, १२, १४, १६, १८ व २०). याकामी संपूर्ण राज्य, छत्तीस जिल्हे व सहा विभागांतील कृषि, उद्योग व सेवा अशी तीन प्रमुख आर्थिक क्षेत्रे व सतरा उपक्षेत्रांची गेल्या दशकातील विदानिर्भर वर्तनाच्याआधारे संभाव्य कामगिरी तपासून प्रतिमान वृद्धी प्रमेयानुसार सन २०२३-२४ ते २०२७-२८ दरम्यानच्या अपेक्षित उत्पन्नाची राज्यगृहीत उत्पन्नाशी तुलना करून सन २०२७-२८ पर्यंतच्या एक ट्रिलियन डॉलर राज्य अर्थव्यवस्थेच्या शक्याशक्यतेची पडताळणी प्रस्तुत टिपणात करण्याचा प्रयत्न केला आहे.

### आलेख १ : महाराष्ट्र राज्य उत्पादितातील उपक्षेत्राचा चालू किमतीनुरुप सरासरी वार्षिक हिस्सा व स्थिर किमतीनुरुप (२०११-१२) वार्षिक वाढीचे दर २०११-१२ ते २०२१-२२





स्रोत : महाराष्ट्र राज्य अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या वार्षिक आकडेवारीवर आधारित लेखकाचे संगणन.

### आलेख २ : महाराष्ट्रातील अमरावती विभागाच्या उत्पादितातील उपक्षेत्राचा चालू किमतीनुरुप सरासरी वार्षिक हिस्सा व स्थिर किमतीनुरुप (२०११-१२) वार्षिक वाढीचे दर २०११-१२ ते २०२१-२२





स्रोत: महाराष्ट्र राज्य अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या वार्षिक अकडेवारीवर आधारित लेखकाचे संगणन.

आलेख ३: महाराष्ट्रातील औरंगाबाद विभागाच्या उत्पादितातील उपक्षेतत्राचा चालू किमतीनुरूप सरासरी वार्षिक हिस्सा व स्थिर किमतीनुरूप (२०११-१२) वार्षिक वाढीचे दर २०११-१२ ते २०२१-२२





स्रोत: महाराष्ट्र राज्य अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या वार्षिक अकडेवारीवर आधारित लेखकाचे संगणन.

आलेख ४: महाराष्ट्रातील कोकण विभागाच्या उत्पादितातील उपक्षेतत्राचा चालू किमतीनुरूप सरासरी वार्षिक हिस्सा व स्थिर किमतीनुरूप (२०११-१२) वार्षिक वाढीचे दर २०११-१२ ते २०२१-२२




स्रोत: महाराष्ट्र राज्य अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या वार्षिक अकडेवारीवर आधारित लेखकाचे संगणन.


**आलेख ५: महाराष्ट्रातील नागपूर विभागाच्या उत्पादितातील उपक्षेत्राचा चालू किमतीनुरूप सरासरी वार्षिक हिस्सा व स्थिर किमतीनुरूप (२०११-१२) वार्षिक वाढीचे दर २०११-१२ ते २०२१-२२**




**चालू किमतीनुसार विभागीय उत्पादितातिल उपक्षेत्रनिहाय सरासरी वार्षिक हिस्सा-२०११-१२ ते २०२१-२२**

**स्त्रोत: महाराष्ट्र राज्य अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या वार्षिक अकडेवारीवर आधारित लेखकाचे संगणन.**


**आलेख ६: महाराष्ट्रातील नाशिक विभागाच्या उत्पादितातील उपक्षेतत्राचा चालू किमतीनुरूप सरासरी वार्षिक हिस्सा व स्थिर किमतीनुरूप (२०११-१२) वार्षिक वाढीचे दर २०११-१२ ते २०२१-२२**




**चालू किमतीनुसार विभागीय उत्पादितातिल उपक्षेत्रनिहाय सरासरी वार्षिक हिस्सा-२०११-१२ ते २०२१-२२**

**स्त्रोत: महाराष्ट्र राज्य अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या वार्षिक अकडेवारीवर आधारित लेखकाचे संगणन.**


**आलेख ७: महाराष्ट्रातील पुणे विभागाच्या उत्पादितातील उपक्षेत्राचा चालू किमतीनुरूप सरासरी वार्षिक हिस्सा व स्थिर किमतीनुरूप (२०११-१२) वार्षिक वाढीचे दर २०११-१२ ते २०२१-२२**




**चालू किमतीनुसार विभागीय उत्पादितातिल उपक्षेत्रनिहाय सरासरी वार्षिक हिस्सा-२०११-१२ ते २०२१-२२**


**स्त्रोत: महाराष्ट्र राज्य अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या वार्षिक अकडेवारीवर आधारित लेखकाचे संगणन.**

**आलेख ८: एक ट्रीलियन डॉलर राज्य उद्दिष्टप्रमाणे व प्रतिमान वृद्धी प्रमेय शक्य महाराष्ट्राच्या क्षेत्रणीहाय स्थूल राज्य उत्पादितातील तफावत (रू / कोटी)**





स्त्रोत: महाराष्ट्र राज्य अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या वार्षिक अकडेवारीवर आधारित लेखकाचे संगणन.

**आलेख ९: महाराष्ट्राचे ट्रीलियन डॉलर राज्य उद्दिष्टप्रमाणे व प्रतिमान वृद्धी प्रमेयानुसार शक्य दरडोई उत्पन्न - २०२३-२४ ते २०२७-२८ (रु)**





स्त्रोत: महाराष्ट्र राज्य अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या वार्षिक अकडेवारीवर आधारित लेखकाचे संगणन.

**आलेख १०: एक ट्रीलियन डॉलर राज्य उद्दिष्टप्रमाणे व प्रतिमान वृद्धी प्रमेय शक्य अमरावती विभागाच्या क्षेत्रणीहाय स्थूल विभागीय उत्पादितातील तफावत (रू / कोटी)**





स्त्रोत: महाराष्ट्र राज्य अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या वार्षिक अकडेवारीवर आधारित लेखकाचे संगणन.

**आलेख ११: अमरावती विभागाचे एक ट्रीलियन डॉलर राज्य उद्दिष्टप्रमाणे व प्रतिमान वृद्धी प्रमेयानुसार शक्य दरडोई उत्पन्न - २०२३-२४ ते २०२७-२८ (रु)**





स्त्रोत: महाराष्ट्र राज्य अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या वार्षिक अकडेवारीवर आधारित लेखकाचे संगणन.

**आलेख १२: एक ट्रीलियन डॉलर राज्य उद्दिष्टप्रमाणे व प्रतिमान वृद्धी प्रमेय शक्य औरंगाबाद विभागाच्या क्षेत्रणीहाय स्थूल विभागीय उत्पादितातील तफावत (रू / कोटी)**





स्त्रोत: महाराष्ट्र राज्य अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या वार्षिक अकडेवारीवर आधारित लेखकाचे संगणन.

**आलेख १३: औरंगाबाद विभागाचे एक ट्रीलियन डॉलर राज्य उद्दिष्टप्रमाणे व प्रतिमान वृद्धी प्रमेयानुसार शक्य दरडोई उत्पन्न - २०२३-२४ ते २०२७-२८ (रु)**





स्त्रोत: महाराष्ट्र राज्य अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या वार्षिक अकडेवारीवर आधारित लेखकाचे संगणन.

आलेख १४: एक ट्रीलियन डॉलर राज्य उद्दिष्टप्रमाणे व प्रतिमान वृद्धी प्रमेय शक्य कोकण विभागाच्या क्षेत्रणीहाय स्थूल विभागीय उत्पादितातील तफावत (रु / कोटी)





स्त्रोत: महाराष्ट्र राज्य अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या वार्षिक अकडेवारीवर आधारित लेखकाचे संगणन.

आलेख १५: कोकण विभागाचे एक ट्रीलियन डॉलर राज्य उद्दिष्टप्रमाणे व प्रतिमान वृद्धी प्रमेयानुसार शक्य दरडोई उत्पन्न - २०२३-२४ ते २०२७-२८ (रु)





स्त्रोत: महाराष्ट्र राज्य अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या वार्षिक अकडेवारीवर आधारित लेखकाचे संगणन.

आलेख १६: एक ट्रीलियन डॉलर राज्य उद्दिष्टप्रमाणे व प्रतिमान वृद्धी प्रमेय शक्य नागपूर विभागाच्या क्षेत्रणीहाय स्थूल विभागीय उत्पादितातील तफावत (रु / कोटी)





स्त्रोत: महाराष्ट्र राज्य अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या वार्षिक अकडेवारीवर आधारित लेखकाचे संगणन.

आलेख १७: नागपूर विभागाचे एक ट्रीलियन डॉलर राज्य उद्दिष्टप्रमाणे व प्रतिमान वृद्धी प्रमेयानुसार शक्य दरडोई उत्पन्न - २०२३-२४ ते २०२७-२८ (रु)





स्त्रोत: महाराष्ट्र राज्य अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या वार्षिक अकडेवारीवर आधारित लेखकाचे संगणन.

आलेख १८: एक ट्रीलियन डॉलर राज्य उद्दिष्टप्रमाणे व प्रतिमान वृद्धी प्रमेय शक्य नाशिक विभागाच्या क्षेत्रणीहाय स्थूल विभागीय उत्पादितातील तफावत (रू / कोटी)





स्त्रोत: महाराष्ट्र राज्य अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या वार्षिक अकडेवारीवर आधारित लेखकाचे संगणन.

आलेख १९: नाशिक विभागाचे एक ट्रीलियन डॉलर राज्य उद्दिष्टप्रमाणे व प्रतिमान वृद्धी प्रमेयानुसार शक्य दरडोई उत्पन्न - २०२३-२४ ते २०२७-२८ (रु)





स्त्रोत: महाराष्ट्र राज्य अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या वार्षिक अकडेवारीवर आधारित लेखकाचे संगणन.




**आलेख २०: एक ट्रीलियन डॉलर राज्य उद्दिष्टप्रमाणे व प्रतिमान वृद्धी प्रमेय शक्य पुणे विभागाच्या क्षेत्रणीहाय स्थूल विभागीय उत्पादितातील तफावत (रु / कोटी)**

**स्रोत: महाराष्ट्र राज्य अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या वार्षिक अकडेवारीवर आधारित लेखकाचे संगणन.**




**आलेख २१: पुणे विभागाचे एक ट्रीलियन डॉलर राज्य उद्दिष्टप्रमाणे व प्रतिमान वृद्धी प्रमेयानुसार शक्य दरडोई उत्पन्न - २०२३-२४ ते २०२७-२८ (रु)**

**स्रोत: महाराष्ट्र राज्य अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या वार्षिक अकडेवारीवर आधारित लेखकाचे संगणन.**

२०२३-२४ ते २०२६-२७ दरम्यानचे वर्षनिहाय राज्य उत्पन्नाचे आकडे ४०४५३१४, ४६३९६८७, ५३२१३९१ व ६१०३२५६ लक्ष कोटी रुपये असे असावे लागतील. परंतु सन २०११-१२ ते २०२१-२२ च्या दशकातील एकंदरीतच राज्य अर्थव्यवस्थेची कामगिरी तसेच क्षेत्र व उपक्षेत्रनिहाय वाढीच्या दरावर आधारित विचार करता प्रतिमान वृद्धी प्रमेयानुसार शक्य उत्पन्नाचे सन २०२३-२४ ते २०२७-२८ दरम्यानचे वार्षिक उत्पन्न आकडे अनुक्रमे ३६६५७७३, ३९८४८९४, ४३३४४८७, ४७१७६४९ व ५१३७८०६ लक्ष कोटी रुपये असे असतील. म्हणजेच राज्यगृहीत सकल राज्य उत्पादितापेक्षा सन २०२३-२४ ते २०२७-२८ दरम्यान वार्षिक तुटीचे प्रमाण अनुक्रमे ९.३८, १४.११, १८.५५, २२.७० व २६.६० टक्के संभवत असल्याने प्रत्यक्षपणे रकमेतील वर्षनिहाय तुटीचे आकडे ३७९५४१, ६५४७९३, ९८६९०४, १३८५६०७ व

१८६२१९४ लक्ष कोटी रुपये असे असणार आहेत. राज्य अर्थव्यस्थेचा कृषी व संलग्न, उद्योग आणि सेवा असा क्षेत्रनिहाय विचार करता राज्यगृहीत व प्रतिमान वृद्धी प्रमेयानुसार सन २०२३-२४ ते २०२७-२८ करिता शक्य वार्षिक उत्पन्नाच्या आकड्यांवर दृष्टिक्षेप टाकताही अशाच प्रकारची तफावत दिसते. सन २०२३-२४ ते २०२७-२८ दरम्यानचे वार्षिक कृषि व संलग्न क्षेत्रातील राज्यगृहीत उत्पादित अनुक्रमे ४१९७५४, ४८१४२८, ५५२१६४, ६३३२९२ व ७२६३४१ लक्ष कोटी रुपये तर प्रतिमान वृद्धी प्रमेयानुसार शक्य उत्पन्न अनुक्रमे ४४०८५०, ४७७५७५, ५१७५६६, ५६११३३ व ६०८६१४ लक्ष कोटी रुपये येत असल्याने तुटीचे प्रमाणसुद्धा लक्षणीय असेल यात शंका नाही. उद्योगक्षेत्राचा विचार करता सन २०२३-२४ ते २०२७-२८ दरम्यान राज्यगृहीत उत्पादित अनुक्रमे १०६०४३३, १२१६२४१, १३९४९४२, १५९९८९९ व १८३४९७० तर प्रतिमान वृद्धी प्रमेयानुसार शक्य उत्पादित अनुक्रमे ८३७८८०, ८८०८३२, ९२६२९२, ९७४४२० व १०२५३९० लक्ष कोटी रुपये येत असल्याने वार्षिक तुटीचे प्रमाण २०.९९, २७.५८, ३३.६०, ३९.०९ व ४४.१२% असे असणार (आलेख ८, १०, १२, १४, १६, १८ व २०). राज्यगृहीत उत्पादित व प्रतिमान वृद्धी प्रमेयानुसार शक्य उत्पादिताचा विचार करता सेवाक्षेत्रही असाच कल दर्शविते. सन २०२३-२४ ते २०२७-२८ दरम्यान सेवाक्षेत्राचे राज्यगृहीत उत्पादित अनुक्रमे २०९७७८३, २४०६००८, २७५९५२०, ३१६४९७२ व ३६२९९९८ तर प्रतिमान वृद्धी प्रमेय शक्य उत्पादित अनुक्रमे १९८६६८९, २१९१३६९, २४१७८६३, २६६८५८१ व २९४६१८० लक्ष कोटी रुपये इतके संभवत असल्याने त्यातून निर्मित तुटीचे सन २०२३-२४ मधील प्रमाण ५.३० वरून सन २०२७-२८ मध्ये १८.८४% पर्यंत जाते (आलेख ८). महाराष्ट्रातील अमरावती, औरंगाबाद, कोकण, नागपूर, नाशिक व पुणे असा विभागवार विचार करताही राज्यगृहीत व प्रतिमान वृद्धी प्रमेय शक्य उत्पादितात अशाच तफावती दिसून येतात. सन २०२७-२८ करिता अमरावती विभागाचे राज्यगृहीत उत्पादित ४०७९०७ व प्रतिमान वृद्धी प्रमेय शक्य उत्पादित ३१२९४५ कोटी रुपये असल्याने सन २०२७-२८ करिता तुटीचे प्रमाण २३.२८% असेल. राज्यातील औरंगाबाद, कोकण, नागपूर, नाशिक व पुणे या उर्वरित पाच विभागांचे सन २०२७-२८ मधील राज्यगृहीत उत्पादित अनुक्रमे ७४५९५९, २७१६५२०, ६५०५७२, ८८२९२८, व १५९६११३ तर तेच प्रतिमान वृद्धी प्रमेय शक्य ५८१५६६, १९८०५८१, ४७५९०२, ६५४४३१ व ११४८०५५ कोटी रुपये येत असल्याने सन २०२७-२८ या उद्दिष्ट वर्षाचे विभागनिहाय तुटीचे प्रमाण अनुक्रमे २२.०४, २७.०९, २६.८५, २५.८८ व २८.०७% इतके असणार असल्याने ते कसे भरून निघू शकते हा महत्त्वाचा प्रश्न निकाली निघत नाही. अमरावती, औरंगाबाद, कोकण, नागपूर, नाशिक व पुणे या सर्व सहाही विभागांचे कृषि व संलग्न, उद्योग आणि सेवा असे सन २०२३-२४ ते २०२७-२८ करिता क्षेत्रनिहाय राज्यगृहीत व प्रतिमान वृद्धी प्रमेय शक्य उत्पादितातील तफावत पाहाताही वर्षनिहाय तुटीचे आकडे भरून न निघण्याइतकेच मोठे असल्याचे दिसून येतात. सन २०२७-२८ मध्ये अमरावती, औरंगाबाद, कोकण, नागपूर, नाशिक व पुणे अशा सहाही विभागांतील औद्योगिक उत्पादितांच्या तुटीचे प्रमाण अनुक्रमे ३५.८४, ४३.७३, ४४.८८, ४१.८९, ४३.७९ व ४३.८०% तर तेच सेवाक्षेत्राकरिता २३.३५, २०.४०, १६.५७, २०.५१, १८.९४ व १९.९६% इतके असणार आहे (आलेख ८, १०, १२, १४, १६, १८ व २०).

**अनुमानः**

एकंदरीत काय तर महाराष्ट्रासारख्या आर्थिकदृष्ट्या दीर्घकाळ आघाडीवरील राज्याकरिता एक ट्रिलियन डॉलर राज्य अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट ठेवणे गैर आहे असे नाही. परंतु गेल्या दशकातील राज्याचा कृषि, उद्योग व सेवा असा क्षेत्रनिहाय तसेच जिल्हा व विभागनिहाय या सर्व क्षेत्रांचा त्यांच्या उपक्षेत्रांसहित सन २०११-१२ ते

२०२१-२२ असा गेल्या पूर्ण दशकातील एकंदरीतच वाढीचा दर व सकल राज्य उत्पादितातील या सर्व क्षेत्र व उपक्षेत्रांचा सरासरी हिस्सा (आलेख १, २, ३, ४, ५, ६ व ७) लक्षात घेता सन २०२७-२८ हे उद्दिष्ट पूर्तीचे वर्ष पुढे ढकलावे लागेल, यात शंका नसावी.

**संदर्भसूची:**


1. Abdul Shaban (2006), Regional Structures, Growth and Governance in Maharashtra, Economic and Political Weekly, Vol. 41, No. 18, May 06, 2006, PP. 1803-1815.
2. GoM (2023), Roadmap to Becoming a Trillion Dollar Economy, Maharashtra Economic Advisory Council, GoM, Mumbai.
3. GoI (2006), Approach Paper to Eleventh Five Year Plan, Planning Commission, Govt. of India, New Delhi-2006.
4. Mitra, Siddhartha and Sangeeta Shroff (2007): Farmers' Suicides in Maharashtra, Economic and Political Weekly, pp 73–77.
5. Ravindra Dholakiya-Chairman (2020), A Report on the Sub-National Accounts Committee, MoSPI, Government of India, New Delhi, April 2020.
6. Sanyal Sanjeev and Arora Akanksha (2024), Relative Economic Performance of Indian States: 1960-61 to 2023-24, EAC-PM Working Paper Series, EAC-PM/WP/31/2024, September 2024.
7. Talule Dnyandev (2020), Farmer Suicides in Maharashtra-Trends across Marathwada and Vidarbha, Economic and Political Weekly, Vol. LV, No. 25, June 20, 2020, pp. 116-125.
8. Talule Dnyandev (2021), Suicide by Maharashtra Farmers - The Signs of Persistent Agrarian Distress, Economic and Political Weekly, Vol. LVI, No. 51, December 18, 2021, pp. 46-55.
9. Talule Dnyandev and Kalamkar SS (2023), Characteristics of the Multipronged Agrarian Crisis in Maharashtra, Economic and Political Weekly, Vol. LVIII, No. 37, September 16, 2023, pp. 47-60.
10. Talule Dnyandev C, Shirke Digambar T, J. Dennis Rajkumar, SS Kalamkar, KS Hari and Kombde Subhash, (2024), District Domestic Product Estimation for Maharashtra, Directorate of Economics and Statistics, Planning Department, Government of Maharashtra, Mumbai, May 2024.
11. Talule Dnyandev, Kombde Subhash, SS Kalamkar and Hari KS (2024a), District Strategic Plan for Raigad, Planning Department, Government of Maharashtra, Mumbai, July 2024.
12. (2024b), District Strategic Plan for Sindhudurg, Planning Department, Government of Maharashtra, Mumbai, July 2024.
13. (2024c), District Strategic Plan for Solapur, Planning Department, Government of Maharashtra, Mumbai, July 2024.
14. (2024d), District Strategic Plan for Yavatmal, Planning Department, Government of Maharashtra, Mumbai, July 2024.
15. Vijay Kelkar (2013), A Report of the High-Level Committee on Balanced Regional Development Issues in Maharashtra, Govt. of Maharashtra, Planning Department, Mumbai, Oct. 2013.


◆

# भारताच्या आर्थिक वृद्धीतील अस्थैर्य : वास्तव आणि निष्पत्ती

**प्रशांत ज्ञा. हरमकर** †

**प्रस्तावना :**

आर्थिक विकासाच्या सिद्धांताचा करार दीर्घकालीन आर्थिक वृद्धी घडून येण्याशी असतो. आर्थिक संपदा निर्माण करणे आणि लोककल्याण घडवून आणण्याचा हा शाश्वत मार्ग असतो. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये शास्त्र वा विज्ञान समजावून घेत असताना विकसनशील ते विकसित देश म्हणून गौरव करून घेत असताना आर्थिक विकासाच्या संक्रमणाचा मार्ग हा क्लेशदायक ठरू शकतो. खऱ्या अर्थाने औद्योगिक क्रांती घडून आल्यानंतरच ह्या देशांमध्ये संपत्ती निर्माण होऊन संपत्तीचा विस्तार घडून येत असतो. पण ही संपत्ती वा संपदा निर्माण होत असताना भारतासारख्या देशामध्ये आर्थिक घसरण दिसून येते. अर्थव्यवस्था सापळ्यामध्ये अडकलेली दिसून येते. अशावेळी सापळ्यामध्ये अडकलेल्या देशांना यामधून निघण्यासाठी पर्यायी धोरण व व्यूहरचनेचा स्वीकार करावा लागतो. जेणेकरून हा सापळा तोडता येईल किंवा या सापळ्याच्याबाहेर पडता येईल. पर्यायाने आर्थिक विकासाचा वृद्धिदर वाढवून संपत्ती निर्माण होईल व लोककल्याण घडून येईल.

**अर्थव्यवस्थेत स्फितीचे अस्तित्व :**

आर्थिक वर्ष २०२१-२२ च्या तिमाही अंदाजानुसार समग्र देशीय उत्पाद (GDP) हा चौथ्या तिमाहीमध्ये CSO कार्यालयाने प्रस्तुत केला. २०२१-२२ मध्ये समग्र आर्थिक वृद्धीचा दर उसळी मारून परत ८.७ प्रतिशत झाला. मात्र तिमाही वृद्धिदरामध्ये सातत्याने GDP मध्ये घसरण होऊन ६.६, ५.४ आणि ४.१ प्रतिशत पर्यंत वृद्धिदर घटत असल्याचे दिसून आले.

पर्याप्त प्रमाणात नोंद घेण्यायोग्य बाब म्हणजे २०२१-२२ मध्ये GDP चे आकारमान १४७.३५ लाख कोटी रुपये होते. जो की २०१९-२० त्या तुलनेत १.५ प्रतिशतने जास्त होते. याचा अर्थ असा की, २०१९-२० च्या तुलनेत अर्थव्यवस्थेने २०२१-२२ मध्ये उसळी मारली होती. कोरोना महामारीपूर्व (Pre-pandamic) पातळी पर्यंत गेलो तर असे दिसून येते की, हॉटेल, व्यापार, दळणवळण इत्यादी क्षेत्राचे पुन:र्भरण (Recovery) घडून येणे आवश्यक आहे. याकरिता GDP मध्ये सुधारणा कराव्या लागणार आहे. प्रतिव्यक्ती उत्पन्न, वास्तव प्रतिव्यक्ती उत्पन्न याद्वारे समायोजन स्फिती नियंत्रित करण्याकरिता करावे लागणार आहे. स्फितीचे

† सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग या.द.व. देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, तिवसा, जि. अमरावती.
आजीव सभासद क्र. १३७९, भ्रमणध्वनी : ९४२०६३३१२८, ईमेल: haramkarprashant380@gmail.com

मापन राहणीमानाच्या दर्जावरून करता येते. २०२१-२२ मध्ये प्रतिव्यक्ती उत्पन्न ९१,४८१ रुपये होते. जे २०१८-१९ च्या तुलनेत ०.७ प्रतिशतने कमी होते. गेल्या चार वर्षांमध्ये नागरिकाची जीवनाची गुणवत्ता संपूर्णपणे लोककल्याण घडवून आणणारी असावी. मात्र अजूनही यामध्ये आपण मागे राहिलो आहोत.

जीवनमानाच्या दर्जाला पर्याप्त प्रमाणात धक्के बसत आहेत. यामागील प्रमुख काळजी करण्याचे कारण म्हणजे पुनर्भरणाच्या शाश्वतेची, संभाव्यतेची गती मंद आहे. प्रवृत्ती हा महत्त्वाचा निर्देशक असतो. खाजगी उपभोग आणि स्फिती हे महत्त्वाचे निर्देश आहे. अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे क्षेत्र म्हणजे निर्माणी उद्योग आणि बांधकाम क्षेत्र होय. यामध्ये विस्तार होऊन वृद्धी घडून येणे अपेक्षित आहे. प्रथमत: खाजगी अंतिम उपभोग खर्चाची त्रैमासिक वृद्धी बघता स्थिर किमतीवरच्या उपभोग खर्चामध्ये घसरण घडून आलेली आहे. खाजगी उपभोगाची घसरण १४.४ या उच्चतम पातळीवरून १.८ प्रतिशत या निम्नपातळीपर्यंत झालेली आहे. २०२१-२२ च्या चार त्रैमासिकांमध्ये दिसून आली आहे. परिणामतः खाजगी उपभोगाचा वाटा तीव्रतेने घटत गेलेला आहे. ही अवस्था अर्थव्यवस्थेमध्ये घसरण निर्माण झाल्याचे सूचक आहे. जी अर्थव्यवस्थेमध्ये अरिष्ट निर्माण करू शकते. यामुळे या स्थितीचे पुनर्भरण घडून येण्याची आवश्यकता आहे. मात्र प्रत्यक्षात पुनर्भरण घडून येत नाही. उपभोगावरचा खर्च वाढवा याकरिता शासन केंद्रीय अंदाजपत्रकामध्ये तरतुदी केल्या जातात. मात्र २०२०-२१ आणि २०२१-२२ या दोन वर्षांमध्ये उपभोगावरचा शासनाचा खर्च झपाट्याने संकुचित झाला आहे. समांतरपणे बाह्यक्षेत्राची मागणी २०२१-२२ मध्ये पुनर्भरण करून तेजी निर्माण करणारी होती. असे असून सुद्धा परिस्थितीमध्ये बदल घडून आले नाही. २०२१-२२ च्या त्रैमासिकामध्ये वस्तू आणि सेवांच्या निर्याती घसरलेल्या होत्या. ही दोन्ही क्षेत्रे अर्थव्यवस्थेचे इंजिन असूनसुद्धा देशीय आणि बाह्य मागणीमध्ये ऱ्हास घडून आलेला आहे. या क्षेत्राचे पुनर्भरण होणे कठीण असून हे आवाहन धोरणकर्त्यासमोर आहे.

द्वितीय प्रमुख कारण असे की, स्फितीची लाट अर्थव्यवस्थेमध्ये निर्माण झालेली आहे. ही काळजीची बाब आहे. स्फितीचे मापन तीन मापकाद्वारे केले जाते. हे तीन मापक म्हणजे उपभोक्ता किंमत, घाऊक किंमत निर्देशांक आणि जीडीपीचे विचलन (GDP deflator) होय. पहिल्या मापाचा विचार केला तर उपभोक्ता किंमत ही वस्तू व सेवाच्या किंमतीची प्रवृत्ती आहे. दुसरे मापक म्हणजे वस्तूच्या घाऊक किंमती होय, ज्यामुळे अर्थव्यवस्थेमधील मागणी प्रवृत्ती कळते. तर तिसरे मापक जीडीपीचे विचलन यामुळे संपूर्णपणे किंमतीमधील बदल प्राप्त होतात. जीडीपी विचलनावरून अनुमान काढता येतात. जीडीपी विचलनाद्वारे सामान्य जीडीपी आणि वास्तवातील जीडीपीचे किती विचलन झाले हे स्पष्ट होते. यावरून स्फितीचे मापन करता येते. जीडीपी विचलनावरून अनुमान काढता येतात. अर्थव्यवस्थेत २०२१-२२ मध्ये स्फितीचा दर १०.८ प्रतिशत होता. जो की सरासरी स्फिती दरापेक्षा दुप्पट होता. १९९१ नंतर सर्वात जास्त स्फितीचा दर २०२१-२२ मध्ये दिसून आला. गेल्या ३० वर्षांमधील हा उच्चांक होता. शिवाय ही दुहेरी अंक स्फितीमध्ये शाश्वतता दिसून आली. याला कारणीभूत स्थिर आर्थिक वृद्धीचा दर होता. शिवाय स्थिरता ही प्रतिव्यक्ती उत्पन्न, उपभोग आणि निर्यातीमध्ये होती.

महत्त्वाचे कारण असे की, सर्व वस्तूंच्या किंमत पातळीमध्ये तीव्रतेने वाढ घडून आली होती. विविध क्षेत्रांमध्ये जीडीपीच्या विचलनामध्ये मोठी तफावत दिसून आली. याचे पुनर्भरण घडून येणे आवश्यक होते. याचा परिणाम व्यापार अटीवर घडून आला. जो क्षेत्रनिहाय आणि संपूर्ण वृद्धिदराला प्रभावित करणारा आहे. विशेषत: तीव्रतेने वाढत जाणाऱ्या किमती कृषिक्षेत्रातील

व्यापार अटींना प्रतिकूल आहे. जीडीपीचे विचलन दर्शविते की, कृषी वस्तूच्या किमती हळुवारपणे (७.३ प्रतिशत) वाढत आहेत. कृषी वस्तूच्या किमतीची तुलना निर्माणी वस्तूशी केली तर संपूर्ण अर्थव्यवस्थेमध्ये किंमत पातळी १०.८ प्रतिशत असताना व्यापार अटी कृषिक्षेत्राला प्रतिकूल आहे.

व्यापार क्षेत्रामधील बदलाचा कृषिक्षेत्रावर गंभीर परिणाम घडून येतो. ग्रामीण भागातील लोकसंख्या मोठ्या प्रमाणात कृषिक्षेत्रावर अवलंबून आहे. यामुळे अत्यंत वाईटरित्या ग्रामीण उत्पन्न आणि उपभोग प्रभावित झाले आहे. शिवाय जीवनमानाच्या दर्जाचा ऱ्हास घडून आलेला आहे. याकरिता उच्चतम उपभोग मागणीवर भर असायला पाहिजे. एकूण अर्थव्यवस्थेमधील पुनर्भरण थांबलेले आहे. समांतरपणे निर्माणी वस्तूच्या किंमती तीव्र गतीने वाढलेल्या आहे. भारताच्या निर्यातीचे मापन करीत असताना दुहेरी अंक निर्यातीला हानी पोहोचलेली आहे. कारण बाह्यक्षेत्राची मागणी घसरण्याची संभाव्यता आहे.

तिसरा महत्त्वाचा घटक म्हणजे खाजगी उपभोगाची पातळी आणि उच्चतम स्फितीचा दर आहे. येथे पुनर्भरण घडून येण्याची आवश्यकता आहे. अर्थव्यवस्थेच्या काही क्षेत्रांमध्ये वृद्धिदर ५ प्रतिशत होता तर अर्थव्यवस्थेच्या बांधकाम आणि निर्माणी क्षेत्रामध्ये तीव्रतेने वृद्धिदर घसरलेला आहे. याचा परिणाम समग्र स्थिर भांडवल आणि गुंतवणुकीवर झाला आहे. बांधकाम आणि निर्माणी क्षेत्रातील वृद्धिदर घसरून २ प्रतिशतवर येऊन पोहोचला आहे. यामुळे निर्माणी क्षेत्रातील उत्पादन आणखी घसरले आहे. या दोन क्षेत्रातील घसरणीने इतर क्षेत्र प्रभावित केले आहे. अर्थव्यवस्थेतील संरचनात्मक मर्यादाचा परिणाम हा पुनर्भरणावर घडून येत असतो. याकरिता प्रभावी मौद्रिक धोरणाची अंमलबजावणी करावी लागते. यामुळे अर्थव्यवस्थेतील किंमती नियंत्रित करून आर्थिक वृद्धीला चालना द्यावी लागते.

**सेवा आणि उद्योग क्षेत्राची स्थिती :**

राष्ट्रीय सांख्यिकीय कार्यालयाद्वारे २०२२-२३ साठी राष्ट्रीय स्तरावरचा अंदाज प्रस्तुत करण्यात आला होता. यामध्ये काही आश्चर्यजनक बाबी दिसून आल्या. समग्र देशीय उत्पादनामध्ये (GDP) वृद्धी २०२१-२२ मध्ये ९.१ प्रतिशत होती ती घसरून २०२२-२३ मध्ये ७.२ प्रतिशत झाली होती. एकूणच जीडीपीमध्ये दोन प्रतिशत घसरण झाली होती. परिणामतः प्रतिव्यक्ती उत्पन्न वृद्धीचा दर हा ७.६ प्रतिशतवरून ६.३ प्रतिशतपर्यंत घसरला होता. गेल्या दोन वर्षांच्या कालखंडामध्ये जी.डी.पी. मध्ये घसरण घडून आलेली आहे. मात्र ही घसरण कोरोना महामारीच्या काळापेक्षा जास्त होती.

आर्थिक वृद्धीचा दर घसरत जाणे याला अनेक कारणे जबाबदार आहेत. यामध्ये वृद्धीच्या गाभ्याशी जुळलेले प्रमुख कारण म्हणजे उद्योग क्षेत्रातील घसरण आहे. भारत सरकारने पुढाकार घेऊन उद्योगक्षेत्राला चालना देण्याचा प्रयत्न 'मेक इन इंडिया' योजनेअंतर्गत केला आहे. असे असूनसुद्धा औद्योगिक वृद्धीचा दर २०२१-२२ मध्ये ११.४ प्रतिशत होता तो घसरून २०२२-२३ मध्ये ४.४ प्रतिसाद झाला आहे. ही काळजी करण्यायोग्य बाब आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचे नेतृत्व करणारे सेवाक्षेत्र आहे. एकूणच आर्थिक वृद्धीमध्ये सेवाक्षेत्राचा वाटा ३/४ आहे. याविरुद्ध उद्योग क्षेत्राने आर्थिक वृद्धीमध्ये घसरण घडवून आणली आहे. आर्थिक वृद्धीमध्ये उद्योगाचा वाटा १/५ आहे.

उद्योग क्षेत्राची जीडीपीमध्ये निराशाजनक कामगिरी आहे. निर्माणी क्षेत्रामध्ये मंदी दिसून येते. निर्माणी क्षेत्राचे उत्पादन हा उद्योगाचा मोठा वाटा आहे. यामध्ये स्थिरता (Stagant) निर्माण झाली आहे. निर्माणी क्षेत्रामध्ये वृद्धी तीव्रतेने घटून ११.१ प्रतिशतवरून १.३ प्रतिशत २०२२-२३ मध्ये झालेली होती. ही तीव्र घसरण आश्चर्यजनक आहे. गेल्या पाच वर्षांमध्ये निर्माणी क्षेत्राचा

सरासरी आर्थिक वृद्धीचा दर ३.५ प्रतिशत होता. हा कृषिक्षेत्राच्या वृद्धिदरापेक्षा न्यूनतम पातळीवर होता. कृषिक्षेत्राचा सरासरी वृद्धिदर ४ प्रतिशत होता. परिणामतः निर्माणी क्षेत्रामध्ये घसरण निर्माण झाल्याचे दिसून येते.

खाणी आणि उत्खनन क्षेत्रातील घसरणसुद्धा अतिशय महत्त्वाची आहे. खनिज तेल आणि गॅस उत्पादन क्षेत्रांमध्ये मूल्यवृद्धी मोठ्या प्रमाणात आढळून येते. या क्षेत्रामध्ये घसरण घडून आलेली आहे. खाण आणि उत्खनन क्षेत्रांमध्ये २०२१-२२ ला वृद्धिदर ७.१ प्रतिशत होता तो घटून २०२२-२३ मध्ये ४.६ प्रतिशत झाला आहे. बांधकाम क्षेत्रामधील वृद्धी घटून १० प्रतिशत तर वीज क्षेत्राचा वृद्धिदर ९.९ प्रतिशत झाला आहे.

सेवाक्षेत्रामध्ये सर्वोत्कृष्ट कामगिरी २०२२-२३ मध्ये हॉटेल, वाहतूक व दळणवळण क्षेत्राची आहे. या क्षेत्रामध्ये १४ प्रतिशत वृद्धिदर गाठलेला आहे. २०१०-११ पासून या क्षेत्राने उच्चत्तम वृद्धिदर राखण्यामध्ये यश संपादित केलेले आहे. वित्त, वास्तव मालमत्ता आणि व्यावसायिक सेवाक्षेत्रातील वृद्धीचा दर ७.१ प्रतिशत आहे. मूल्यवर्धन घडवून आणणाऱ्या प्रशासन, संरक्षण आणि इतर सेवांमध्ये घसरण निर्माण होऊन दुहेरी अंकावरून वृद्धी ७.२ प्रतिशतपर्यंत घसरलेली आहे. याकरिता राजकोषीय धोरणाच्या मापकाचा उपयोग उपाय म्हणून केंद्र सरकार करीत आहे. केंद्र सरकार कल्याणकारी कार्यक्रम आणि प्रोत्साहन देणाऱ्या योजनांच्या खर्चामध्ये वाढ करीत आहे. एकूणच उद्योगाच्या संरचनेमध्ये अस्थैर्यता निर्माण झालेली आहे.

**उपभोग खर्चातील घसरण :**

काळजी करण्यायोग्य बाब म्हणजे भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये सातत्याने उपभोग खर्चामध्ये घसरण निर्माण झालेली आहे. राष्ट्रीय उत्पन्नाच्या मापनानुसार सार्वजनिक आणि खाजगी उपभोग खर्च या दोन्हीमध्ये २०२२-२३ ला घसरण निर्माण झाली आहे. याकरिता गुंतवणूक पातळीमध्ये वाढ करण्याची आवश्यकता आहे. सार्वजनिक अंतिम उपभोग खर्चामध्ये चालू किंमतीला घसरण घडून आलेली आहे. ही घसरण १०.३ प्रतिशतवर पोहोचली आहे. जी गेल्या सहा वर्षांमध्ये न्यूनतम पातळीवर आहे. केंद्र सरकारने शाश्वत राजकोषीय एकीकरणाचे (Fiscal Consolidation) परिश्रम करूनसुद्धा घसरण घडून आलेली आहे. महत्त्वाचा पैलू असा की, खाजगी उपभोगामध्ये संकोच घडून आलेला आहे. हा संकोच वाढत चाललेला आहे. यामुळे अर्थव्यवस्थेमधील मागणीमध्ये घसरण निर्माण झाली आहे. समग्र खाजगी उपभोग खर्चामध्ये घसरण निर्माण होऊन २०२२-२३ मध्ये खाजगी उपभोग खर्च ६०.६ प्रतिशत होता. जो गेल्या चार वर्षांमध्ये सर्वात कमी होता. खाजगी उपभोगाचा संकोच घडून येणे म्हणजे याचा मोठा परिणाम हा लोकसंख्येच्या जीवनमानावर घडून येत असतो. खाजगी उपभोगाच्या संकोच्यामुळे जीवनमानाच्या पातळीमध्ये घसरण निर्माण झालेली आहे. खाजगी उपभोगाच्या संकोच्यामुळे जीवनमानाच्या पातळीमध्ये घसरण निर्माण झालेली आहे. खाजगी उपभोगाचा संकोच घडून येण्यामागील प्रमुख कारण म्हणजे वाढत्या किंमती अथवा स्फिती होय. त्यामुळे विस्तृत प्रमाणात स्फितीचे मापन होण्याची आवश्यकता आहे. २०२२-२३ मध्ये स्फितीचा दर ८.८ प्रतिशत असून हा दर उच्चतम होता.

स्फितीचा अत्यंत गंभीर परिणाम हा कृषी उत्पादने आणि जंगल उत्पादनावर घडून येत असतो. २०२१-२२ ते २०२३-२४ या कालावधीमध्ये अन्नधान्याच्या किंमती सातत्याने वाढत गेल्या आहे. याचा नकारात्मक प्रभाव उपभोगावर घडून आलेला आहे. उपलब्ध निर्देशांकाच्यानुसार असे दिसून आले की, महामारी पूर्वकाळातील पुनर्भरणाचा आकार K अक्षराप्रमाणे होता. यामुळे तिरकस पुनर्भरण (Skewed recovery) घडून मागणी वरच्या बाजूने ढकलल्या गेली आहे. यामुळे निम्नश्रेणीच्या उत्पादनापेक्षा उच्चश्रेणीच्या उत्पादनाची

मागणी वाढली आहे. पुनर्भरण घडून येण्याची ही तिरकस प्रवृत्ती ही उत्पन्न गटाची पिळवणूक करणारी आहे. म्हणून उच्च उत्पन्न गटाला चालना द्यावी लागते. यामुळे समग्र स्थिर भांडवल निर्माण होण्याला मदत होईल. २०२२-२३ मध्ये समग्र स्थिर भांडवल निर्मिती जीडीपीच्या २९.६ प्रतिशत होती. जो की गेल्या चार वर्षांमध्ये स्थिर भांडवल निर्मितीचा दर उत्तम पातळीवरचा आहे. मात्र हा मिळणारा लाभ शाश्वत असायला पाहिजे. परंतु यामधील अडथळा म्हणजे उपभोग मागणीमध्ये होणारी घसरण आहे.

**समग्र मूल्य वृद्धी आणि खाजगी अंतिम उपभोग खर्च :**

वार्षिक समग्र देशीय उत्पाद वित्तीय वर्ष २०२३-२४ च्या चौथ्या त्रैमासिकांमध्ये मजबूत कामगिरी दिसून आली. २०२२-२३ मध्ये आर्थिक वृद्धीचा दर ७ प्रतिशत होता. तो वाढून २०२३-२४ मध्ये ८.२ प्रतिशत झाला. वास्तव समग्र मूल्य वृद्धिदर २०२२-२३ मध्ये ६.७ प्रतिशत होता, तो २०२३-२४ मध्ये ७.२ प्रतिशत झाला. म्हणजे आर्थिक वृद्धीचा दर हा समग्र मूल्य वृद्धिदराला (Gross value added growth) प्रभावित करीत असतो. अर्थव्यवस्थेमध्ये २०२२-२३ ला निर्माणी क्षेत्राचा वृद्धिदर २.२ प्रतिशत होता, तो वाढून २०२३-२४ मध्ये ९.९ प्रतिशत झाला. खाण आणि उत्खनन क्षेत्रांमध्ये २०२२-२३ मध्ये वृद्धिदर १.९ प्रतिशत होता, तो २०२३-२४ मध्ये ७.१ प्रतिशत झाला.

अर्थव्यवस्थेमधील एकूण उपभोग खर्च, गुंतवणूक, शासकीय कृती आणि बाह्य व्यवहार यावर खाजगी अंतिम उपभोग खर्च (Private Final Consompation Expenditure - PFCE) अवलंबून असतो. खाजगी अंतिम उपभोग खर्च हा उपभोग मागणीचे चित्र प्रस्तुत करीत असतो. खाजगी अंतिम उपभोग खर्चाचा वृद्धिदर २०२३-२४ मध्ये ४ प्रतिशत होता. समग्र स्थिर भांडवल निर्मितीचा दर यालाच गुंतवणूक मागणीचा निर्देशांक म्हणतात. याचा वृद्धिदर ९ प्रतिशत होता. शासनाचा अंतिम उपभोग खर्च यामधील वृद्धिदर २.५ प्रतिशत होता. लक्षात घेतले पाहिजे की, बाह्य व्यवहार, वस्तू आणि सेवांची निर्यात यामधील वृद्धी २.६ प्रतिशत होती. तर निर्यातीपेक्षा आयातीचा वृद्धिदर जास्त असून तो १०.६ प्रतिशत होता. निर्यातीच्या तुलनेत आयातीच्या वृद्धीचा वेग जास्त असल्यामुळे व्यापार तूट २०२३-२४ मध्ये जीडीपीच्या २.३ प्रतिशतपेक्षा जास्त होती. २०२२-२३ मध्ये ही तूट जी.डी.पी.च्या केवळ ०.४ प्रतिशत होती.

क्षेत्रनिहाय समग्र मूल्यवर्धन (Gross value added) आणि खर्चाच्या घटकांनुसार जी.डी.पी. विभागला गेला आहे. त्याच्या विभागलेल्या भागांमध्ये अनेक प्रकारची भिन्नता आहे. खाजगी अंतिम उपभोग खर्चाच्या संदर्भात विचार केला तर याचे प्रमाण जीडीपीच्या ५८ प्रतिशत आहे. खाजगी अंतिम उपभोग खर्चातील सरासरी वृद्धी ४ प्रतिशत आहे. खाजगी अंतिम उपभोग खर्चातील वृद्धी मंद असण्याची प्रवृत्ती ही २००२-२००३ पासून आहे. खाजगी अंतिम उपभोग खर्चाचा प्रतिव्यक्ती वृद्धिदर ५.७ प्रतिशत २०२२-२३ मध्ये होता. तो घटून २०२३-२४ मध्ये ३.१ प्रतिशत झाला आहे. उपभोग खर्चामध्ये मंद वृद्धी असल्याचे इतरही घटकांवरून स्पष्ट होते. रेल्वे प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या भारतामध्ये (उपनगरीय रेल्वे सोडून) २०२३-२४ ला २.९९ अब्ज होती. महामारी पूर्वकाळामध्ये २०१८-१९ मध्ये रेल्वे प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या ३.६५ अब्ज होती. म्हणजे प्रवाशांची संख्या महामारीपूर्व काळापेक्षा कमी आहे. कारण लोकांचा उपभोग खर्च घटलेला आहे. मनरेगाअंतर्गत २०२२-२३ च्या तुलनेत २०२३-२४ मध्ये रोजगाराकरिता मागणी जास्त होती. घरगुती कर्ज आणि

मोफत धान्याची मागणी वाढली. कृषिक्षेत्रामध्ये मजुरांची संख्या वाढली आणि बेरोजगारीचे प्रमाण उच्चतम पातळीवर गेले. याचा परिणाम अर्थव्यवस्थेतील समग्र मागणीवर घडून आला. उत्पादनाचे मापन करीत असताना उपभोगामध्ये मंद वृद्धी दिसून आली. २०२३-२४ मध्ये वित्तीयेतर कंपन्यांचे मापन केले असता ३८०० कंपन्यांमधील वृद्धी ०.९८ प्रतिशत होती. याची तुलना २०२१-२२ शी केली असता वित्तीयेतर कंपन्यांमधील वृद्धी ३४.९ प्रतिशत होती. तर २०२२-२३ मध्ये २२.६ प्रतिशत होती. खाजगी अंतिम उपभोग खर्चामध्ये मंद वृद्धी दिसून येण्याचे कारण म्हणजे ग्रामीण भागामध्ये मागणी दुर्बळ आहे. शिवाय धक्के हे न्यून वेतन वृद्धी आणि स्फितीचे बसतात. शहरी उपभोक्त्यांचा खर्च हा स्थिर आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने भारताच्या प्रमुख १९ शहरांचा अहवाल प्रसिद्ध केला. या सर्वेक्षण अहवालानुसार एकूण खर्च येणाऱ्या वर्षात वाढणार आहे. न्यून उत्पन्न गटातील लोकांचा दृष्टिकोन भविष्यातील खर्चाविषयी निराशावादी आहे. महानगरातील दारिद्र्यातील लोकांमध्ये प्रचंड निराशावाद निर्माण झाला आहे.

जीडीपीमधील स्थिर गुंतवणुकीच्या प्रमाणावरून अर्थव्यवस्थेचा आर्थिक वृद्धीचा दर हा ठरत असतो. जीडीपीच्या प्रमाणावरून गुंतवणुकीचे प्रमाण ठरविले जाते. तंत्रज्ञानात्मक पद्धतीने विचार केला तर वाढीव भांडवल उत्पादन अनुपात (Incremental Capital Out Put Ratio-ICOR) एक प्रतिशत वृद्धिंगत होत आहे. भारतामध्ये खाजगी गुंतवणुकीतून वृद्धी घडून येते. याला घसरण २०११-१२ पासून निर्माण झाली आहे. खाजगी अंतिम उपभोग खर्चामधील गुंतवणूक अपयशी ठरली आहे. गेल्या दशकामध्ये खाजगी अंतिम उपभोग खर्चामध्ये न्यूनतम घट घडून आली आहे. खाजगी अंतिम उपभोग खर्चामध्ये न्यून वृद्धी घडून येणे म्हणजे खाजगी गुंतवणूक उपस्थित ठरले. ती गेल्या दशकात वेग घेऊ शकली नाही. सबळ उपभोग खर्चाची आवश्यकता आहे तरच व्यवसायांना सक्षमता प्राप्त होईल. ज्यामुळे उत्पादनाकरिता पुरेशी मागणी निर्माण होईल. २०२४-२५ मध्ये शासनाने भांडवली खर्च वाढविण्यावर भर दिला होता. कारण खाजगी गुंतवणुकीमध्ये अनेक प्रकारच्या उणिवा आहे. असे म्हटले जात होते की, उदारीकरण धोरणामुळे खाजगी गुंतवणूकदार भांडवलाचे आवंटन योग्य प्रकारे करू शकतात. मात्र प्रत्यक्षात विरोधी स्थिती पाहायला मिळते. प्रत्यक्षात सार्वजनिक गुंतवणूक वाढवून मागणीला धक्का देण्याची आवश्यकता आहे. खाजगी गुंतवणूकदारामुळे गर्दीचा प्रभाव (Crowding out) घडून येण्याची जोखीम असते.

भांडवली गुंतवणुकीमधून उत्पादकता मापन करणे आणि आर्थिक कृतीतून कार्यक्षमता निर्माण करणे व संधी उपलब्ध करून देणे यामध्ये वाढीव भांडवल उत्पादन अनुपात (Incremental Capital - Output Raito) हा निर्णायक भूमिका पार पाडतो. २०११-१२ च्या किमतीच्या आधारावर जीडीपीच्या ३३.५ प्रतिशत गुंतवणूक २०२३-२४ मध्ये झाली आहे. यामुळे जीडीपीचा वृद्धिदर ८.२ प्रतिशत राहाण्यास मदत झाली. भारताचा सध्याचा वाढीव भांडवल उत्पादन अनुपात ४.०८ आहे. भारताचा वाढीव भांडवल उत्पादन अनुपात ४ ते ४.५ दरम्यान असल्याचे आढळून आले आहे. आपण चीनपासून धडा घ्यायला पाहिजे की, त्याचा वाढीव भांडवल उत्पादन अनुपात गुंतवणुकीच्या रचनेवर अवलंबून असतो. तो गुंतवणुकीला प्रभावित करीत असतो. यामुळे घसरणदेखील निर्माण होऊ शकते. भांडवलाची सीमांत उत्पादकता भांडवली परताव्यामध्ये घसरण निर्माण करू शकते. प्रतिव्यक्ती भांडवली साठा उच्चतम असताना घसरण निर्माण होऊ शकते. सोबतच शाश्वत आर्थिक वृद्धी घडून येण्याकरिता गुंतवणुकीचा उपभोग आणि गुंतवणुकीची मालकी ही आवंटनाची

कार्यक्षमता ठरविण्यामध्ये महत्त्वपूर्ण असते. अर्थव्यवस्थेचे बाह्यक्षेत्र आर्थिक वृद्धीला प्रभावित करते. ज्याला वृद्धीचे इंजिन म्हटले गेले आहे. सार्वजनिक भांडवली खर्च आर्थिक वृद्धीचा दर वाढविण्याला सहाय्य करीत असते. याकरिता खाजगी गुंतवणूक आणि खाजगी उपभोग वाढविण्याची आवश्यकता आहे. तरच शाश्वत आर्थिक वृद्धी घडून येऊ शकते.

**घटता रोजगार आणि वाढती बेरोजगारी :**

अर्थव्यवस्थेमध्ये रोजगाराचा विचार केला तर नवीन रोजगार निर्माण होऊ शकला नाही. परिणामतः, प्रतिव्यक्ती उत्पन्न आणि रोजगार दर यांच्या सहसंबंधातून U वक्र निर्माण होतो. यामधून न्यून प्रतिव्यक्ती उत्पन्नाची निर्मिती होते. अर्थव्यवस्थेमध्ये आर्थिक क्रिया वाढल्या तर रोजगार संधी अधिक्याने निर्माण होतात. कार्यक्षम लोकसंख्येला रोजगार प्राप्त होतो. परिणामतः, प्रतिव्यक्ती उत्पन्न वाढते, उच्च शिक्षणाचा प्रसार होतो, पुढारलेल्या श्रमशक्ती कार्यस्थळामध्ये प्रवेश होतो, कार्यस्थळे रोजगाराकरिता सुरक्षित होतात, स्त्री श्रमशक्तीला रोजगारामध्ये प्रवेश मिळतो याचा परिणाम म्हणजे प्रतिव्यक्ती उत्पन्न वाढते. तरीसुद्धा भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये बेरोजगारी मोठ्या प्रमाणात दिसून येते. याचे कारण मोठ्या प्रमाणात श्रमशक्ती असंघटित क्षेत्रात कार्यरत आहे. तर कायमस्वरूपी वेतन रोजगार हा एकूण कार्यक्षम लोकसंख्येपैकी केवळ १/१० लोकसंख्येला प्राप्त आहे.

रोजगार आणि वृद्धी यामधील सहसंबंध ओकुन नियमाच्या (Okun's law) द्वारे प्रस्तुत करता येतो. ओकुन नियम हा ऑर्थर ओकुन यांनी मांडला. याद्वारे सर्वप्रथम जीडीपीमधील वृद्धिदर आणि बेरोजगारी यामधील सहसंबंध १९६० मध्ये सर्वप्रथम प्रस्तुत केला होता. ओकुन नियमाच्यानुसार जर १ प्रतिशतने बेरोजगारी वाढत असेल तर जी.डी.पी. वृद्धिदरातील घसरण २ प्रतिशतने होते. याउलट बेरोजगारी एक प्रतिशतने घटत असेल तर जी.डी.पी. वृद्धिदरामध्ये २ प्रतिशतने वाढ घडून येते. ओकुन नियमाचे सूत्र पुढीलप्रमाणे आहे.

$$\Delta GDP = -2 \times \Delta U$$

$\Delta$ जी.डी.पी. म्हणजे जी.डी.पी. वृध्दी दरामध्ये झालेला बदल तर $\Delta U$ म्हणजे बेरोजगारीच्या दरात झालेला बदल होय. ओकुन नियमानुसार दक्षिण एशियाई अर्थव्यवस्थेसाठी सहगुणक (Coefficient) मर्यादा ०.१७ ते - ०.११ दरम्यान आहे. यामध्ये भारताचा ओकुन सहगुणक - ०.११ आहे. जो दक्षिण एशियाई अर्थव्यवस्थेच्या तुलनेत न्युनतम पातळीवर आहे. भारताची तुलना विकसित देश अमेरिकेशी केली तर अमेरिकेचा ओकुन सहगुणक ०.७२ आहे. तर जर्मनीचा ०.५७ आहे. भारतामध्ये ओकुन सहगुणक न्युनतम पातळीवर असण्याचे कारण श्रमिकांना अस्थायी स्वरूपाचा रोजगार अनौपचारिक क्षेत्रामध्ये प्राप्त झाला आहे. म्हणून बेरोजगारीचा दर हा अत्यंत जास्त भारतामध्ये दिसून येतो.

भारतामध्ये रोजगारविहिन वृद्धी (Jobless growth) १९८० आणि १९९० च्या दशकापासून आहे. श्रम बाजाराच्या मर्यादा आणि श्रमिकाची मर्यादित गतिशीलता यामुळे औपचारिक क्षेत्रातील (Farmal Sector) श्रमिकाच्या दीर्घकालीन मागणीला अडथळे निर्माण झाले आहे. भांडवलप्रधान तंत्रज्ञान औपचारिक क्षेत्रात स्वीकारल्यामुळे श्रमिक मागणीमध्ये घसरण निर्माण झाली आहे. रोजगार सुरक्षितता अधिनियमाच्या आच्छादनाचा संकोच झाला आहे. अर्धकुशल आणि कुशल श्रमिकांच्या वेतन दरामध्ये स्थिरता निर्माण झाली आहे. नवउदारीकरणाच्या काळात रोजगारविहीन वृद्धी हे आर्थिक वृद्धीचे वैशिष्ट्य ठरले आहे. १९९१ नंतर उच्च आर्थिक वृद्धीमधून भांडवली संपदा निर्माण झाली मात्र रोजगार निर्माण होऊ शकला नाही. औपचारिक क्षेत्रातील रोजगार घटत जाऊन अनौपचारिक क्षेत्रातील रोजगार वाढत गेला आहे. अनौपचारिक क्षेत्रातील

रोजगाराची वैशिष्ट्ये बघितली तर न्यून वेतन, कामाचे जास्त तास आणि मर्यादित सामाजिक सुरक्षितता आहे. औपचारिक क्षेत्राच्या तुलनेत अनौपचारिक क्षेत्रामध्ये प्रतिकूल रोजगाराच्या अटी आहे. तर औपचारिक क्षेत्रामध्ये रोजगार निर्माण झाला नाही.

रोजगारनिर्मिती घडून येण्याकरिता श्रम प्रेरित अनौपचारिक क्षेत्रामध्ये सातत्याने गुंतवणूक वाढवावी लागणार आहे. औपचारिक क्षेत्रामधील स्थैर्यता दूर करून गतिशीलता निर्माण करावी लागणार आहे. औपचारिक व अनौपचारिक क्षेत्रामध्ये वेतन दरामध्ये तफावत आहे. वेतन दरातील तफावत कमी करणे आवश्यक आहे. अर्थातच औपचारिक व अनौपचारिक क्षेत्रात भांडवल गुंतवणूक वाढविल्यास रोजगारनिर्मिती होईल. यामुळे श्रमिकांचे उत्पन्न वाढवून ते उपभोग वाढवू शकतील. परिणामतः अर्थव्यवस्थेतील मागणीमध्ये वाढ घडून येईल.

**अस्थैर्यतेविरुद्ध तरतुदी :**

केंद्रीय अर्थसंकल्प २०२३-२४ हा आर्थिक आव्हानासाठी महत्त्वपूर्ण मानला जातो. २०२३-२४ चा केंद्रीय अर्थसंकल्प मांडण्यापूर्वी आर्थिक सर्वेक्षण प्रसिद्ध करण्यात आले होते. यावर चर्चा घडून येत असताना महामारीपूर्व काळातील उत्पन्न पातळी गाठण्यावर भर देण्यात आला होता. २०२३-२४ मध्ये उत्पन्न पातळी तर घटलेलीच होती; पण जी.डी.पी. वृद्धिदर हा ७ प्रतिशतपेक्षा कमी होता. यामुळे केंद्र सरकारने आर्थिक वृद्धीचा वेग वाढविणे याला सर्वोच्च स्थान दिले होते. मात्र याच कालावधीमध्ये एकूण उत्पन्न प्राप्तीपैकी ४० प्रतिशत केवळ व्याजापोटी दिले जात होते. केंद्र आणि राज्याची राजकोषीय तूट ९ ते १० प्रतिशत दरम्यान होती. घरगुती क्षेत्र (Household Sector) यामध्ये वित्तीय बचत जीडीपीच्या ८.५ प्रतिशत होती. यामुळे क्वचितच खाजगी क्षेत्राला कर्ज घेण्यासाठी संधी उपलब्ध होती. समष्टी आर्थिक पातळीवर स्थैर्यता निर्माण करण्याकरिता राजकोषीय एकत्रीकरण (Fiscal consolidation) आणि वेगवान वृद्धीमध्ये संतुलन साध्य करण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले होते.

गेल्या तीन वर्षांपासून भारतीय अर्थव्यवस्थेला देशीय आणि जागतिक पातळीवरचे धक्के बसत आहे. यामुळे आर्थिक वृद्धीचे पुनर्भरण करण्याकरिता धोरणात्मक तरतुदीचे आव्हानात्मक कार्य शासनाला करायचे आहे. याकरिता अर्थव्यवस्थेमधील सार्वजनिक उपभोग आणि गुंतवणूक वाढविण्याची आवश्यकता आहे. अर्थव्यवस्था खुली करीत असताना निर्यात वाढ घडून येणे अपेक्षित आहे. गुंतवणुकीची प्रेरणा वाढली तर कर्ज घेण्याचे प्रमाण वाढेल. कर्जपुरवठा करण्याकरिता घरगुती बचतीचा उपयोग राजकोषीय एकत्रीकरणाकडून करता येतो.

भारतीय अर्थव्यवस्थेत संतुलन साध्य करण्याकरिता २०२३-२४ च्या अर्थसंकल्पामध्ये अर्थमंत्र्यांनी विविध घटकांमध्ये संतुलन साध्य करण्याचा प्रयत्न केला होता. याला चौथे वृद्धी इंजिन म्हणून संबोधले गेले होते. खाजगी उपभोग वाढविण्याकरिता सार्वजनिक गुंतवणूक वाढविण्यावर भर देण्यात आला होता. सार्वजनिक गुंतवणूक वाढविल्यास त्याचे गुणक परिणाम घडून येईल. सोबतच खाजगी गुंतवणुकीचा प्रवेग वाढविणे आवश्यक आहे. याला जोडून निर्याती वाढविणे आवश्यक आहे. कोविड-१९ आणि रशिया-युक्रेन युद्धामुळे जागतिक पातळीवर निर्बंध निर्माण झाले आहे. यामुळे पुरवठा साखळीमध्ये व्यत्यय निर्माण झाले होते. याचा प्रतिकूल परिणाम निर्माणी क्षेत्रावर घडून आला आहे. कोव्हिड-१९ ला लढा देण्याकरिता अर्थव्यवस्थेत अधिक्याने तरलता निर्माण करण्यात आली होती. यामुळे वास्तव उत्पादनाच्या किंमतीमध्ये वाढ घडून आली. परिणामतः व्याजदर वाढवावे लागले आहे. याचा परिणाम विदेशी गुंतवणुकीवर होऊन विदेशी गुंतवणुकीचा प्रवाह

अर्थव्यवस्थेच्याबाहेर जाऊ लागला आहे. विनिमय दरामध्ये घसरण निर्माण झाली आहे. स्फितीचा दर वाढला यामधून अस्थैर्य वाढत गेले आहे.

अर्थव्यवस्थेसमोरील आव्हानाचा सामना करीत असताना उपाय म्हणून राजकोषीय धोरणाबरोबर मौद्रिक धोरण, व्यापार धोरण आणि गुंतवणूक धोरणामध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे. कारण राजकोषीय धोरणांना मर्यादा आहे. कारण अर्थसंकल्पाची मांडणी करताना उत्पन्न प्राप्ती १/३ असते तर खर्च हा २/३ असतो. शिवाय राज्यकोषीय धोरणाचा प्रभाव हा केंद्र आणि राज्य सरकारच्या अंमलबजावणीवर अवलंबून असतो. अंमलबजावणीवरून परिणामकारकता निर्माण होते. यामधून अर्थव्यवस्थेची वृद्धी आणि स्थैर्यतेची दिशा कळते. धोरणकर्त्यांना पुनरुजीवन देणारे गुंतवणूक वातावरण आणि राजकोषीय एकत्रीकरण यादरम्यान संतुलन प्राप्त करणे आवश्यक आहे. हे संतुलन केवळ भांडवली खर्च वाढवून निर्माण करता येणार नाहीत तर भांडवली खर्चातून संपत्ती निर्माण झाली पाहिजे. संपत्तीचा विस्तार घडून लोककल्याण साध्य करणारे संतुलन सरकारला साध्य करता येणे आवश्यक आहे.

**समारोप :**

आर्थिक वृद्धिदराच्या अस्थैर्याला प्रभावित करणाऱ्या विविध कारकाचा आढावा आपण घेतला आहे. यावरून स्पष्ट होते की, या कारकाचा परिणाम घडून अर्थव्यवस्थेमध्ये खाजगी उपभोगाचा संकोच घडून आला आहे. यामुळे अर्थव्यवस्थेतील मागणी घटत गेली आहे. परिणामतः लोकांच्या जीवनमानाचा दर्जा खालावला आहे. याचा सर्वात जास्त परिणाम न्यून उत्पन्न गटातील लोक व ग्रामीण भागावर झाला आहे. ग्रामीण भागातील मागणी दुर्बळ ठरली आहे. याला जोड स्फितीच्या धक्क्याची बसून उपभोग खर्च आणखी घटत गेला आहे. तर शहरी उपभोक्त्याचा खर्च स्थिर झाला आहे. खाजगी गुंतवणुकीतून उपभोग वाढणे अपेक्षित होते. मात्र खाजगी गुंतवणुकीतून उपभोग वाढू शकला नाही. कारण खाजगी गुंतवणुकीतल्या उणिवा प्रभावी ठरल्या. म्हणून सार्वजनिक गुंतवणूक वाढवून मागणीला धक्का देण्याची आवश्यकता आहे. शासनाची धोरणे स्फितीला नियंत्रित करणारी असावी. प्रतिव्यक्ती उत्पन्न वाढत असताना स्फितीला नियंत्रित केले तरच अर्थव्यवस्थेतील खाजगी उपभोग वाढून मागणी वाढू शकते. रोजगारनिर्मितीवर भर देण्याची आवश्यकता आहे. याकरिता श्रमप्रेरित अनौपचारिक क्षेत्रात गुंतवणूक वाढविण्याची आवश्यकता आहे. औपचारिक क्षेत्रात गतिशीलता निर्माण करण्याची आवश्यकता आहे. औपचारिक आणि अनौपचारिक क्षेत्रातील वेतन तफावत कमी करण्याची आवश्यकता आहे. भांडवल गुंतवणूक वाढवून रोजगार वाढविण्यावर लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता आहे. रोजगार वाढला तर उत्पन्न वाढून उपभोग वाढेल. परिणामतः अर्थव्यवस्थेतेतील मागणीमध्ये वृद्धी घडून येईल.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


1) Anand Ishan and Azad Rohit (2019) : India's slowdown – what it is and what can be done, Economic & political weekly Vol-LIV, No 41 Oct-12.
2) Balkrishishnan Pularper, Das Mausumi, Pramesharan (2021) : Growth transitions in India – Myth and Reality, Economic & Political weekly Vol-LIV, No.11, March 13.
3) Editorial (2022) : Can Growth Be sustained ? Economic & Political weekly Vol – LVII, No. 24 June 11.
4) Editurial (2023) : GDP Growth ? Economic & Political weekly Vol – LVII, No. 24, June 11.
5) Editorial (2023) : Heading toward a W-shaped Recovery ? Economic &

Political weekly, Vol – LVII No.2, June 14.

6) Kannan K.P. & Ravendran G. (2019) : From Jobless to Jobloss Growth, Economic & Political weekly, Vol-LIV No. 44, Nov.-9.

7) Mondal Rimu and Chattopadhyay Subhasunkar (2023) : Jobless Growth in the Informal Sector Economic & Political Weekly Vol-LVIII, No. 25/26, June 24 & July 1.

8) RAO M. Govinda (2023) : Concerns about Balancing Growth and Stability Economic & Political weekly Vol – LVII, No. 12, March 25.

9) Saratchand C. (2019) : Seme macro thereotical foundations of jobless growth, Economic and Political weekly Vol - LIV, No.13, march 30.

10) Sing Lakhwinder (2021) : From Devloping to developed Nations, Economic and Political weekly, Vol-LVI No.2 January 9.

11) Sureshbabu M (2024) : GDP Growth : The Tymanny of numbers. Economic and Poltical weekly, Vol-LIX, No. 24, June 15.

◆

## मराठी अर्थशास्त्र परिषद

## मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महिला ग्रंथ पारितोषिक

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने महिला लेखिकेने लिहिलेल्या सर्वोत्कृष्ट अर्थशास्त्रीय संदर्भग्रंथास रु. ११०००/-, प्रमाणपत्र व मानचिन्ह देण्यात येते. १ जानेवारी, २०२४ ते ३१ डिसेंबर, २०२४ या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या मराठीतील अर्थशास्त्रीय संदर्भग्रंथांच्या महिला लेखिकेस (मराठी अर्थशास्त्र परिषदेचे आजीव सभासद असणे आवश्यक) स्पर्धेत सहभागी होता येईल. नमुन्यातील अर्ज, संबंधित ग्रंथाच्या चार प्रती कार्यवाहांकडे ३० ऑगस्ट २०२५ पर्यंत पोहचतील या बेताने पाठवावे. ०२,०३ व ०४ नोव्हेंबर, २०२५ रोजी शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला येथे संपन्न होत असलेल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४८ व्या राष्ट्रीय अधिवेशनात हे पुरस्कार प्रदान केले जातील.

**पत्रव्यवहारासाठीचा पत्ता**

कार्यवाह - खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद, डॉ. मारोती तेगमपुरे, 'संगाई', घर क्रमांक २२, भालचंद्र पेट्रोल पंपाच्या मागे, शहीद भगतसिंग नगर, पारनेर रोड, अंबड, जि. जालना ४३१२०४ (भ्रमणध्वनी: ९४२३९९३१३७)

**- डॉ. मारोती तेगमपुरे**

कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,

# कृषी व्यवसायाचे सोनेरी भविष्य: कृषी जोखीम व्यवस्थापन

**विजय अ. पवार** †

**प्रस्तावना :**

स्वातंत्र्यपूर्व काळात शेतमाल किंमत धोरण ग्राहक आणि उद्योजक यांना महत्त्व देत असल्याने शेतमालाच्या किंमती फारच कमी राहिल्या. १९२८ मध्ये रॉयल ॲग्रीकल्चरल कमिशनने बाजार पेठ नियंत्रणासाठी नियंत्रित बाजारपेठा व्यवहार आणि स्थापना धोरण जाहीर केले. शेतीमालाची अल्प किंमत, उच्च विपणन खर्च आणि पीक हंगाम पूर्व व पश्चात धोके लक्षात घेऊन स्वातंत्र्योत्तर काळात शेतमालाला योग्य दर मिळवून शेतीचे लाभ शेतकऱ्यांनाही मिळण्यासाठी धोरण आखण्यात येऊन नियंत्रित प्राथमिक घाऊक बाजारपेठांचा विचार सुरू झाला. स्वातंत्र्योत्तर काळात शेतीशी संबंधित अनेक कायदे करण्यात आले. ज्यांचा उद्देश कृषि व्यवसायातील अस्थिरता आणि जोखीम कमी करणे हा देखील होता.

महाराष्ट्र राज्यात हवामान बदल, ओला, कोरडा दुष्काळ, नापिकी, कर्जबाजारीपणामुळे २०२४ मध्ये रोज सरासरी ०७ याप्रमाणे वर्षभरात २७०६ शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या असल्याची माहिती नुकतीच शासनाकडून प्रसिद्ध झाली आहे. भारतातील इतर राज्यातही याहून वेगळी परिस्थिती नाही. २०२२ च्या आकडेवारीनुसार गेल्या दहा वर्षांत भारतामध्ये शेतीक्षेत्रात काम करणाऱ्या शेतकरी आणि शेतमजूर यांच्या आत्महत्येची संख्या १,१२,००० इतकी होती. तर २०२२ मध्ये भारतामध्ये १२,२९० शेतकरी व शेतमजुरांनी आत्महत्या केल्याची नोंद आहे. शेतकरी आत्महत्येची ही स्थिती गंभीर आहे. नैसर्गिक आपत्ती, शेतीमधील वाढता खर्च, हमीभाव नाही, सिंचनाचा अभाव, तुटपुंज्या सरकारी योजना, खाजगी सावकारांचा तगादा अशा अनेक संकटांमुळे अंततः शेतकऱ्यांना हा टोकाचा निर्णय घ्यावा लागत आहे.

भारतामध्ये, १९५३ ते २०११ या कालावधीत पुरामुळे कृषी पिकांचे दरवर्षी सुमार ३.७९ दशलक्ष हेक्टर नुकसान झाले आहे, ज्याचे भारतीय रुपयात मूल्य रु. ११.१५ अब्ज इतके होते. हवामान बदलाच्या प्रतिकूलतेसंदर्भात, अनेक अभ्यासकांनी पीक उत्पादकतेवर आणि त्यानंतर शेतकऱ्यांच्या उपजीविकेवर त्याचा विपरीत परिणाम होण्याचा अंदाज लावला आहे. हवामान बदलामुळे देशातील कृषी उत्पादन २०५० पर्यंत २५ टक्के ने कमी होण्याची अपेक्षा आहे आणि जे

† विभाग प्रमुख व सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग कला व वाणिज्य महाविद्यालय, सातारा
आजीव सभासद क्र. १५१०, भ्रमणध्वनी : ८६०००४११२२, ईमेल: vijaypawareco@gmail.com

२१०० पर्यंत १० टक्केपासून ४० टक्के दरम्यान असेल. एकंदरीतच कृषिक्षेत्रातील या नैसर्गिक आणि मानवीनिर्मित जोखीम किंवा अनिश्चिततेचा प्रतिकूल परिणाम शेतीक्षेत्रातील उत्पादन आणि उत्पन्नावर होतो. भारतातील कृषी आणि अन्नप्रक्रिया क्षेत्राचा जोखीम निर्देशांक २०२२ वर्षाशी तुलना करता ५९ वरून २०२३ मध्ये ६३ पर्यंत वाढला आहे. अधिकतम खर्च व कमी उत्पादकता यासारख्या अकार्यक्षमतेबरोबर जोखीम व्यवस्थापनातील अज्ञान याचा देखील कृषिक्षेत्राला कराव्या लागणाऱ्या आव्हानांमध्ये समावेश होतो. कृषी आणि अन्नप्रक्रिया क्षेत्र जोखीम अहवाल २०२३, जोखीम व्यवस्थापन स्कोअर २०२२ मध्ये ६८ वरून ६६ इतका कमी झाला. नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती, हवामान बदल, पाणी टंचाई, उपद्रवी किटक, क्षारपड जमिनी, आणि जागतिक बाजारपेठेतील अनिश्चितता इ. त्याची महत्त्वाची कारणे आहेत.

एकंदरीतच, भारतीय शेती आणि त्यावर परिणाम करणारे अनेक घटक पाहाता भारतामध्ये कृषिक्षेत्रातील जोखीम हा एक गहन चिंतेचा विषय बनतो. त्यामुळे कृषी जोखीम व्यवस्थापन हा केवळ शेतकऱ्याचीच नव्हे तर पूर्ण कृषी आणि कृषी संबंधित व्यवसाय व व्यावसायिक तसेच शेतीस वित्तपुरवठा करणाऱ्या व्यवस्था म्हणजेच अर्थव्यवस्थेतील सर्वच क्षेत्रांसाठी महत्त्वपूर्ण ठरतो. थोडक्यात, कृषी जोखीम व्यवस्थापन अभ्यास संपूर्ण भारतीय अर्थव्यवस्थेसाठी काळाची गरज बनला आहे. या कारणांमुळेच, प्रस्तुत शोधनिबंधामध्ये कृषी जोखीम व्यवस्थापन हा विषय संशोधन अभ्यास म्हणून निवडला गेला आहे.

**कृषी जोखीम व्यवस्थापन म्हणजे काय?**

कृषी जोखीम किंवा धोकाव्यवस्थापन ही संकल्पना अर्थातच शेती व शेतीव्यवसायाशी संबंधित आहे. हवामान बदल, उत्पादन, किंमती, शासकीय धोरणे, जागतिक बाजारपेठा आणि शेतीवर परिणाम करणारे इतर घटक यांच्यातील अनिश्चिततेमुळे शेतीच्या व्यवसायात व्यापक बदल होऊ शकतात. जोखीम व्यवस्थापनात अशा अनिश्चिततेमुळे उद्‌भवू शकणारे आर्थिक प्रभाव कमी करणारे पर्याय निवडणे समाविष्ट असते.

शेती व्यवसायामधील ही जोखीम आणि अनिश्चितता ही त्या संदर्भात व्यवस्थापन करून कमी करता येऊ शकते, उदा. शेतमाल कुशल मानवी भांडवल, साठवणूक, वाहतुक व लॉजिस्टिक अशा मूलभूत सुविधा क्षेत्रात आधुनिकीकरण, वाढत्या सिंचन सुविधा, धोका पूर्वसूचना प्रणाली, वैविध्यपूर्ण बाजारपेठा, लवचिक पतसुविधा या क्षेत्रात वैशिष्ट्यपूर्ण होणारे बदल तसेच माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल क्रांती, ब्लॉकचेन, रिअल टाईम मॉनिटरिंग, पारदर्शक पुरवठा साखळी, जीपीएस तंत्रज्ञान, कृत्रिम उपग्रहांमार्फत मिळणारी हवामान संदर्भातील माहिती, अनेक शेतीसंबंधित वेबसाईट्स, सॉफ्टवेअर्स आणि मोबाईल ॲप इ. मुळे शेतकऱ्यांची मध्यस्थ व अडत्यांमार्फत होणारी फसवणूक याला आळे बसत आहे. पीक विमा, हवामान आधारित विमा, तुकडीकरणास पर्याय म्हणून सहकारी शेती पद्धती, कंत्राटी शेती अशा विविध कृषी जोखीम व्यवस्थापन अंतर्गत उपायांमुळे कृषिक्षेत्रातील अनेक संभाव्य धोके नियंत्रित करण्यात यश मिळत आहे, हे अनेक संशोधक अभ्यासकांनी सिद्ध केले आहे.

कृषिक्षेत्रातील जोखमींना संबोधित करण्यासाठी कृषी जोखीम व्यवस्थापन हा पारंपारिक आणि नवकल्पना यांचा मिलाफ साधणारा एक व्यापक दृष्टिकोण आहे. स्मार्ट शेती, पिकांवरील रोग किंवा दुष्काळ, प्रतिरोधक व उच्च उत्पादन देणारी बियाणे, कृषी वनीकरण आणि शेती संवर्धन; तसेच शेतीसाठी आणि पर्यायाने देशासाठी शाश्वत विकास प्रदान करणारे उपाय हे कृषी जोखीम व्यवस्थापनामधून प्राप्त होऊ शकतात.

**कृषी जोखीम किंवा धोका मूल्यमापन प्रक्रिया**

**अ. संभाव्य जोखीम ओळख :** ऐतिहासिक घटना व माहिती यांचे अवलोकन आणि विश्लेषण, स्थानिक परिस्थिती आणि निर्माण होणारी आव्हाने यांचा विचार करून संभाव्य धोके ओळखता येतात. त्यानुसार जोखीम व्यवस्थापन केल्यास होणाऱ्या नुकसान टाळता किंवा त्याची तीव्रता कमी करता येऊ शकते.

**ब. जोखीम तीव्रतेचे विश्लेषण :** प्रत्येक संभाव्य धोक्याचे शेती उत्पादन आणि शेती उत्पन्न यावर होणाऱ्या परिणामांचे मूल्यांकन करता येऊ शकते. संभाव्य जोखमीमुळे होणाऱ्या नुकसानीचे पैशाच्या स्वरूपात मूल्यांकन करून त्यावरून जोखमीची तीव्रता समजू शकते.

**क. जोखमींची प्राथमिकता :** दुष्काळ, महापूर, पिकांवरील रोगराई, सिंचन व्यवस्थेतील अडचणी, वित्तीय समस्या, मानवी व इतर नैसर्गिक आपत्ती यांमुळे होणाऱ्या नुकसानींची तीव्रता व नुकसानीचे कृषी उत्पादनावर होणारे संभाव्य परिणाम पाहून व त्याचे मूल्यांकन करून धोक्यांना प्राथमिकता लक्षात घेऊन किंवा क्रमवारी लावून धोका व्यवस्थापनाच्या उपायांची अंमलबजावणी करणे.

**कृषी जोखीम व्यवस्थापनाची आवश्यकता**

**१. हवामानात बदल** : भारतात २०१५ ते २०२१ पर्यंत भारतामध्ये ३३.९ दशलक्ष हेक्टर पीक क्षेत्र महापूर व अतिरिक्त पावसामळे तर ३५ दशलक्ष हेक्टर पीक क्षेत्राचे नुकसान दुष्काळामुळे झाल्याचे दिसून येते. हवामानातील होणाऱ्या बदलांच्या धोक्यांमुळे २०५० पर्यंत भारतीय शेतीस एकूण स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या अंदाजे २.८ टक्के ते ८.७ टक्के उत्पन्नाला मुकावे लागेल असा अंदाज आहे. या आकडेवारीवरून हवामानातील बदल हे भारतीय कृषी व्यवसायास सर्वाधिक प्रभावित करतो. त्यामुळे हवामान बदल जोखीम हा घटक कृषी जोखीम व्यवस्थापनात सर्वप्रथम मानता येईल.

**२. अल्प उत्पादकता :** भारतामध्ये शेतकऱ्यांची आत्महत्या हा एक ज्वलंत विषय आहे. शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा हे त्यापाठीमागील मुख्य कारण आहे. शेतीमधील तुटपुंजे भांडवल, साधनसामग्रीचा अभाव, पारंपारिक शेती पद्धती, अल्प धारण क्षेत्र, गुंतवणुकीमधील परताव्याचा अल्प दर, अकुशल मनुष्यबळ, इ. अशा अनेक कारणांमुळे भारतीय शेतीची उत्पादकता अल्प राहाते, यामध्ये भर पडते ती शेतीक्षेत्रातील आपत्तींची, अशा वेळी जोखमींचे व्यवस्थापन करून संभाव्य नुकसानीची खबरदारी घेतल्यास उत्पादकतेमध्ये वाढ घडवून आणणे शक्य आहे.

**३. कृषिविकास दर :** भारतीय कृषिविकास दर हा वर्षानुवर्षे घटत चालल्याचे पाहायला मिळते. १९९० मध्ये कृषिविकास दर ४.५ टक्के होता तो नजिकच्या काळात २ टक्क्यांपर्यंत घसरल्याचे पाहायला मिळते. त्यामुळे कृषिक्षेत्राच्या विकासाचा दर वाढविणे हा देखील कृषी जोखीम व्यवस्थापनाचा एक अविभाज्य घटक आहे.

**४. तणावग्रस्त शेतकरी :** भारतामध्ये शेतकऱ्यांची आत्महत्या हा एक ज्वलंत विषय आहे. दारिद्र्य, कर्जबाजारीपणा, निरक्षरता, आधुनिकतेचा अभाव, वित्तीय तुटवडा, यांत्रिकरणाचा अभाव, अल्पभूधारणा क्षेत्र अशा अनेक कारणांमुळे भारतीय शेती आणि शेतकरी नेहमीच तोट्यात असल्याचे दिसून येते. पिढ्यान्पिढ्या आणि वर्षानुवर्षे शेती करूनही अद्यापही भारतीय शेती फायद्याची ठरताना दिसून येत नाही. अर्थातच यामुळे चिंतातुर, शोकाकूल, तणावग्रस्त शेतकऱ्याच्या मनात आत्महत्येचा विचार आला तर यात नवल वाटण्यासारखे काही नाही, आत्महत्येमुळे हा प्रश्न सुटणारा नाही तर यासाठी उपाययोजना म्हणून योग्य ती पावले उचलणे गरजेचे आहे.

**५. बाजारपेठा :** देशामध्ये शेती व्यापार आणि

वाणिज्य क्षेत्रातील निष्पक्ष आणि पारदर्शक वातावरणासाठी निर्मिती १९६० ते १९७० च्या दशकामध्ये देशातील सर्व राज्यांनी सर्व घाऊक बाजारपेठा आपल्या कक्षेत आणण्यासाठी शेती उत्पादन बाजारपेठा नियंत्रण (APMR) कायदा केला गेला. प्रत्येक बाजारपेठ क्षेत्रासाठी एक शेती उत्पादन बाजारपेठ समिती (APMR) बनविली गेली. १९५० मध्ये देशामध्ये जवळपास २३६ नियंत्रित बाजारपेठा होत्या, त्यांची संख्या आज अंदाजे ७००० झाली आहे आणि देशामध्ये जवळपास २२००० पेक्षा अधिक ग्रामीण पाक्षिक बाजारपेठा आहेत जेथे सोयी-सुविधांची कमतरता आहे. बाजारपेठाच्या विकास आणि ज्ञान यामुळे कृषी जोखीम मोठ्या प्रमाणात कमी करण्यात यश मिळविता येते.

**६. नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती :** दुष्काळ, महापूर, टोळधाड, पिकांवरील रोग, वादळे, ढगफुटी, शेतीमधील अपघात, आग लागणे, मागणी कमी होणे, क्षारपड जमिनी, किंमतीमधील अस्थैर्य, बाजारपेठांमधील फसवणूक, इ. नैसर्गिक किंवा मानवनिर्मित आपत्तींचे मूल्यांकन आणि व्यवस्थापन केल्यास शेतीमधील नुकसानीचे रूपांतर शेतकऱ्याच्या उत्पन्नवाढीमध्ये करणे यादृष्टीने कृषी जोखीम व्यवस्थापनाचा अभ्यास महत्त्वपूर्ण ठरतो.

**कृषी जोखमीचे पाच प्रकार**

**१. उत्पादन व उत्पन्न जोखीम :** हवामान,पाऊस, रोग, किटक आणि इतर घटक, पूर, दुष्काळ, गारपीठ, किंमत किंवा बाजारपेठेतील धोके, पुरवठा नियंत्रण, किंमतीत नियंत्रण, ग्राहकांच्या आवडीत बदल, पर्यायी वस्तूंच्या किंमती, इ. संबंधित जोखमींचा समावेश जोखमीमध्ये होतो.

**२. वित्तीय जोखीम :** बँक आणि सावकारी कर्ज त्याची मुद्दल व त्यावरील व्याज, चक्रवाढ व्याज, परतफेड करण्याची जोखीम, इ. संबंधित जोखमींचा समावेश वित्तीय जोखीम यामध्ये होतो.

**३. संस्थात्मक जोखीम :** कर कायदा, रासायनिक वापरासाठी नियम, शेतीतील कचरा विल्हेवाट, इ. संबंधित जोखमींचा समावेश संस्थात्मक जोखीम यामध्ये होतो.

**४. मानवी किंवा वैयक्तिक जोखीम :** मानवी आरोग्य समस्या, अपघात, आजारपण, मृत्यू, कौटुंबिक समस्या, इ. संबंधित जोखमींचा समावेश मानवी जोखीम यामध्ये होतो.

**५. विपणन जोखीम :** किंमतीतील चढ-उतार, अनिश्चित बाजारपेठ प्रवेश, मध्यस्थ, साठवणूक व गुदामे, वाहतूक आव्हाने इ. संबंधित जोखमींचा समावेश विपणन जोखीम यामध्ये होतो.

**कृषी उत्पादन जोखीम व्यवस्थानामधील प्रमुख घटक**

१. हवामान बदल व नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन अभ्यास.
२. शेतजमिनीचे व्यवस्थापन आणि पीक पद्धती बदलांचा अभ्यास.
३. शेतीस योग्य सिंचन सुविधा उपलब्ध करून देणे.
४. कृषी उत्पादनातील गुणवत्ता आणि संख्यात्मक वाढ.
५. योग्य आणि आधुनिक शेती उपकरणांचा वापर.
६. शेतीस पुरेशी आणि माफक दरात वीज पुरवठा.
७. शेतीस योग्य वेळी, योग्य दरात व पुरेसा वित्तपुरवठा.
८. शेतमालाची प्रतवारी, गुणवत्ता आणि पॅकिंगकडे लक्ष पुरविणे.
९. शेतमालासाठी वाहतूक आणि शीतगृह, गोदाम साखळी निर्माण करणे.
१०. शेतमालाच्या किंमतीत पारदर्शकता आणि हमीभाव.
११. शेतकऱ्यास माफक दरात पीक विमा उपलब्धता आणि त्याची अंमलबजावणी करणे.
१२. शेती संशोधन आणि विकास विभाग यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देणे.

१३. शेतीत खते, किटकनाशके आणि पाण्याचा योग्य आणि प्रमाणात वापर करणे.

१४. शेतमाल प्रक्रिया उद्योगांच्या निर्मितीवर भर देणे.

१५. शेतीतील अतिरिक्त नफ्याचा योग्य विनियोग.

१६. सर्वांगीण कृषिविकासासाठी योग्य सरकारी यंत्रणा उभारणी.

१७. व्यावसायिक सिद्धांत आणि प्रतिमानांची शेतीमधील व्यावहारिकता व उपाययोजना.

१८. शेतमाल निर्यात वाढीसाठी प्रयत्न, देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय बाजारपेठ सर्वे, इ.

**कृषी जोखीम / धोका व्यवस्थापन व्यूहरचना**

**१. पीक विमा :** पीक विमा हे शेतकऱ्यासाठी धोका व्यवस्थापनाचे प्रमुख साधन आहे. हवामानातील बदल, विविध नैसर्गिक व मानवनिर्मित धोक्यांमुळे शेतकऱ्याचे नुकसान होते. यासाठी सरकार तसेच काही खाजगी संस्था शेतकऱ्यांसाठी पीक विमा योजनेची तरतूद करतात. मात्र पीक विमा पद्धतीमधील नुकसानीचे अचूक मोजमाप, तात्काळ आणि योग्य नुकसान भरपाई या घटकांकडे लक्ष दिल्यास शेतकरी संभाव्य नेटाने नुकसानीस तोंड देऊ शकतो.

**२. विविधता :** Don't put all your eggs in one basket अशी एक इंग्रजी म्हण आहे, याचा अर्थ आपली सर्व आदाने किंवा परतावे हे एकाच ठिकाणी न गुंतविता वेगवेगळ्या ठिकाणी थोडे थोडे गुंतवावे. गुंतवणूक क्षेत्रातील हे उदाहरण शेतीक्षेत्रासाठीदेखील उपयुक्त ठरते. शेतजमिनीत एकाचवेळी अनेक पिकांची लागवड केल्याने धोक्याच्यावेळी सर्वच पिकांचे एकदम नुकसान होत नाही व हानी टाळता येते. शेतीमध्ये विविध जैविक प्रजातींच्या प्राण्यांचे संगोपन व संवर्धन केल्यास जैविक गोष्टींचा वापर करूनही संभाव्य नुकसान कमी करता येते. जसे उंदरांसाठी साप, जमीन भुसभुशीत करण्यासाठी गांडुळे इ. जैविक प्रजाती शेती उत्पादनातील धोके कमी करतात. भौगोलिक विविधता लक्षात घेऊन त्याप्रमाणे विविध भौगालिक क्षेत्राचा विचार करून लागवड करता येते. विविधतेमुळे साधनसामग्री पर्याप्त वापर होतो. मिश्र शेतीमुळे शेतीतील चढ-उतार नियंत्रण करता येते.

**३. आदान व्यवस्थापन :** कुशल मनुष्यबळ, उच्चप्रतिची बियाणे, योग्य व अचूक खतांचा आणि किटकनाशकांचा वापर, आधुनिक कृषी यंत्रे इ. सुदृढ आदानांमुळे शेतीमधील संभाव्य धोके मोठ्या प्रमाणात कमी करता येऊ शकतात.

**४. बांध व्यवस्थापन :** शेतामधील बांध हा भारतीय शेतीमधील एक कळीचा मुद्दा आहे. शेतीच्या तुकडीकरणामुळे बहुतांश शेती ही बांधाखाली गेलेली दिसून येते. ज्यामुळे शेती उत्पादनात घट, शेतीच्या यांत्रिकीकरणामध्ये अडथळे, शेतकऱ्यांमधील कलह आणि लवाद इ. समस्या व तणाव उद्भवून वेळेचाही अपव्यय होतो. शेतीमध्ये असणाऱ्या बांधांचे योग्य व्यवस्थापन झाल्यास शेतीमधील अनेक समस्या कमी होऊन उत्पादकतेत वाढ तसेच शेतकरी आणि पर्यायाने गाव आणि देशामध्ये शांतता आणि सौहार्दाचे वातावरण निर्माण होऊ शकते.

**५. सुधारित शेती सराव / व्यवस्था :** सुधारित शेती या संकल्पनेत अनेक घटकांचा समावेश होतो. जसे, जलसंवर्धन तंत्र वापर, मृदा संवर्धन व्यवस्थापन, वित्तीय व्यवस्थापन, मानव संसाधन व्यवस्थापन, आपत्ती व्यवस्थापन, आधुनिक माहिती आणि तंत्रज्ञानाचा वापर आणि व्यवस्थापन इ. या सर्व संकल्पना आणि त्यांचे व्यवस्थापन यांची माहिती शेती करणाऱ्या प्रत्येकास माहिती असणे ही काळाची गरज आहे.

**६. एकात्मिक कीड व्यवस्थापन :** (IPM) एकात्मिक कीड व्यवस्थापनामध्ये वातावरणाशी समन्वय साधून किडींची संख्या आर्थिक नुकसान पातळीखाली जाते. या व्यवस्थापनामध्ये तांत्रिक, भौतिक, रासायनिक,

जैविक, अनुवांशिक पर्यावरण पद्धतीचा वापर केला जातो. शेती परागीकरणासाठी आवश्यक मित्र कीटक व उपद्रवी कीटक यांचा विचार करून एकात्मिक कीड व्यवस्थापन पद्धतीचा वापर करायला हवा.

**७. लवचिकता :** शेतकऱ्यांनी शेतीतील जोखमींचा विचार करता शेतीउत्पादन नियोजनामध्ये लवचिकता ठेवणे आवश्यक आहे. यामुळे जोखमींना सामोरे जाताना नियोजनामध्ये बदल करून नुकसान टाळता येणे शक्य होते. संभाव्य धोक्यांची तीव्रता तपासून त्याप्रमाणे आदान किंवा सामग्रीचा पर्याप्त वापर होतो व होणारे नुकसान कमी करता किंवा टाळता येऊ शकेल. दीर्घमुदतीची व अल्प मुदतीची पिके, नगदी व जीवनावश्यक पिके, कमी पाण्यात व जास्त पाण्यात येणारी पिके यांच्या लवचिक व्यवस्थापनामुळे शेतीक्षेत्रातील चढउतार कमी होऊन शेतीमधील परतावा दरात वाढ होईल आणि शेती म्हणजे जुगार ही भारतीय शेतीवरील मिश्कील टिपणी पुसून टाकता येईल.

**८. तरलता :** भारतीय शेतकऱ्यासमोरील तरल भांडवल हे सर्वात मोठे आव्हान आहे. या संकल्पनेला अद्याप म्हणावे एवढे महत्त्व दिले जात नाही. परिणामी, जोखीमसमयी तरल भांडवलाअभावी शेतीला फार मोठ्या नुकसानीस सामोरे जावे लागेते. संभाव्य धोक्यांना सामोरे जात असताना तद्संबंधी आवश्यक रोख रक्कम पुरवठ्यामुळे संभाव्य मोठे नुकसान नियंत्रणात आणता येते. त्यामुळे जोखीम व्यवस्थापनामध्ये तरल भांडवल या संकल्पनेकडे अधिक महत्त्व देण्याची आवश्यकता आहे.

**९. भांडवल वाटप :** शेतकऱ्यांनी आपली गुंतवणूक किंवा भांडवलाचे वाटप करताना पिके आणि सामग्री यांच्या आवश्यकतेचा विचार करणे आवश्यक आहे. वैयक्तिक गुंतवणूक करताना भांडवलाचे वाटप ही एक क्लिष्ट प्रक्रिया असली तरी या संकल्पनेचे सामान्य ज्ञानदेखील जोखीम व्यवस्थापनात मोठी भूमिका पार पाडू शकते.

**सारांश:**

भारतीय अर्थव्यवस्था ही कृषी आधारित आहे हे सर्वश्रुत आणि सर्वमान्य आहे. मात्र याच कृषिक्षेत्रात काम करणारे लोक देशामध्ये सर्वात अधिक दरिद्री आहेत हे वास्तव स्वीकारणेदेखील क्रमप्राप्त आहे. भारतीय शेती हा एक जुगार आहे. या धारणेमागे शेती व्यवसायातील अनिश्चितता आणि जोखीम हे यामागील एक कारण आहे. कृषिक्षेत्रातील या जोखीम प्रमाण कमी करण्यात यश मिळाल्यास, शेती उत्पादन व उत्पन्न यामध्ये वाढ होऊन शेतकरी व शेतमजूर यांचा आर्थिक कारणांमुळे निर्माण होणारा मानसिक तणाव कमी होऊन शेतकऱ्यांना आत्महत्येसारख्या टोकाच्या निर्णयापासून परावृत्त करण्यास मदत होईल. नैसर्गिक आणि मानवनिर्मित अशा अनेक आव्हानांना तोंड देणारा, प्रतिकूल परिस्थितीत तग धरून देशामध्ये रोजगार, अन्न आणि आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या माध्यमातून देशाला परकीय चलन मिळवून देणाऱ्या अशा कृषी व्यवसायासाठी कृषी जोखीम व्यवस्थापन हा अभ्यास विषय या क्षेत्राची आधारशिला होऊ बनतो.

कृषी जोखीम व्यवस्थापनातील सकारात्मक घटक जसे, कृषिक्षेत्रात सक्रिय जोखीम व्यवस्थापन, वेअर हाउसिंगसारख्या पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक आणि कृषी संशोधन मजबूत करणे आणि कृषी संशोधन आणि विकासामध्ये देशांतर्गत सामर्थ्य वाढविणे या क्षेत्राच्या लवचिकता आणि वाढीसाठी महत्त्वपूर्ण आहेत. कार्यक्रम तंत्रज्ञान हस्तांतरणासाठी डिजिटल तंत्रज्ञान स्वीकारणे आणि स्मार्ट शेती पद्धतीचा अवलंब आणि जोखीम व्यवस्थापन या बाबींवर भर दिल्यास शेतीक्षेत्रातील शाश्वतता टिकून राहील. एकंदरच कृषी जोखीम व्यवस्थापन हे कृषिक्षेत्रात नवी क्रांती घडण्याचे अभ्यास साधन आहे. भविष्यकालीन कृषिक्षेत्राच्या समृद्धीसाठी हा एक आशेचा किरण दिसत आहे. ज्यामुळे देशातील

लाखो शेतकऱ्यांचे जीवन समृद्ध होईल व भारत हा देश खऱ्या अर्थाने कृषिप्रधान देश होईल.

**संदर्भ ग्रंथ सूची:**


१. बोरके दिवाकर : शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवायच्या कशा?, डायमंड प्रकाशन, पुणे, २००८.

२. पाटील जे. एफ. भारतीय शेतीचे अर्थकार, अक्षर प्रकाशन, कोल्हापूर, २०१५.

३. पाटील सुरेश आणि जैन नितीन, कोविड - १९ चा भारतीय कृषिव्यवस्थेवर होणारा परिणाम आणि कृषिव्यवस्थेला सावरण्यासाठी व्यूहरचनात्मक उपाय योजना, अर्थसंवाद, जुले-सप्टेंबर, खंड ४५, अंक २, २०२१.

४. GoI, Reports of the 'Working Group on Agriculture, Risk Management in Agriculture', 11th Year Plan (2007-2012), Planning Commission, New Delhi.

५. GoI, 'Report of Taskforce on Agricultural Marketing Reforms', https://dmi.gov.in/Documents/Report Task Force AMR.pdf.

६. GoI, Final Reports of Committees of State Ministry, In-charge of Agriculture Marketing to Promote Reforms, Ministry of Agriculture, 2013.

७. ICICI Lombard, Sector Report, 'Agriculture & Food Processing', 2023.

८. Jagdeeshaiah J. M., 'Agricultural Market System in India', JETIR, Vol. 5, Issue 4, 2018.

९. Kahan David, 'Managing Risk in Farming, Farm Management Extension Guide', Food and Agriculture Organisation of the United Nations, Rome, 2008.

१०. OECD Report, 'Managing Risk in Agriculture : A Holistic Approach', OECD, 2009.

११. Sankhayan P. L.,'Introduction to the Agricultural Production', Prentice Hall of India, Pvt. Ltd., 1988.

१२. Pudhari, 'News related to Farmers suicide in Maharashtra', 12th March 2025.

१३. The World Bank, 'Agricultural Sector Risk Assessment : Methodological Guidance for Practitioners', World Bank Group Report No. 100320-GNB, 2016.


◆

लोक मुर्ख किंवा आळशी असल्यामुळे गरिब नव्हते, दिवसभर कष्ट?? शारिरिक काम करून सुद्धा गरिब होते कारण देशातील वित्तीय संस्थांनी लोकांच्या अर्थिक पायाची व्याप्ती वाढविण्यास मदत केली नाही.

**- मुहम्मद युनुस**

# भारतीय आर्थिक सुधारणांचे पितामहः डॉ. मनमोहन सिंग..!

**गजानन चंद्रकांत खामकर** †
**मारुती बाबुराव राठोड** ††

**प्रस्तावना :**

डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनामुळे भारताने देशाचा एक थोर सुपुत्र, एक सभ्य सनदी अधिकारी, मितभाषी धोरण कर्तापुरुष, सुसंस्कृत राजकारणी, जागतिक कीर्तीचा अर्थतज्ज्ञ लौकिक अर्थाने जरी आपण गमावला असला, तरी त्यांनी केलेल्या प्रशासकीय, राजकीय व धोरणात्मक कार्यातून आकाराला आलेल्या आर्थिक बदलांनी मात्र डॉ. मनमोहन सिंग एक अलौकिक कार्यशिल्प म्हणून भारतीय इतिहासात अजरामर राहातील. कारण मनमोहन सिंग यांच्या कुशल नेतृत्व आणि धोरणात्मक निर्णयांनीच भारतीय अर्थव्यवस्थेला दिवाळखोरीच्या गर्तेतून सावरले आणि जागतिक स्तरावर महत्त्वाची, गतिमान अर्थव्यवस्था म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेला स्थान प्राप्त झाले. डॉ. मनमोहन सिंग हे असे एक अर्थ राजनीतिज्ञ होते की, ज्यांनी अर्थव्यवस्थेला अर्थपूर्ण वळण देऊन सर्वसामान्यांना विकासाची फळे अनुभवास दिली. ते एक असे विचारवंत होते की, ज्यांच्या दूरगामी परिणाम करणाऱ्या प्रभावशील योजनातून भारताने सातत्याने आपल्या विकासाची जागतिक पटलावर छाप सोडली. अशा अत्यंत संयमी, सहनशील असणाऱ्या चारित्र्यसंपन्न व्यक्तीला पूर्वग्रहदूषित व पूर्वनियोजित टीकेची वादळे सहन करावी लागली. त्यातूनच त्यांना 'इतिहासच माझे योग्य, समंजस मूल्यमापन करू शकेल', अशी भूमिका घ्यावी लागली. नेमके डॉ. मनमोहन सिंग कसे होते, त्यांच्यावर धोरण लकव्याचा व 'मौनी बाबा' म्हणून टीका करणाऱ्यांना आपल्या कार्यातून उत्तर देणारे अर्थतज्ज्ञ डॉ. मनमोहन सिंग केवळ भारतातच नव्हे, तर सर्व विकसनशील देशांना धोरणात्मक मार्गदर्शन देणारे दीपस्तंभ ठरतात. त्यांचा वैचारिक परिचय व कार्यप्रभाव सर्वच क्षेत्रातील अभ्यासकांना व विशेषतः समाजातील गरीब, शोषणाचे बळी असणारे लोकांना न्याय देण्यासाठी धडपडणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांना मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरत राहील.

**डॉ. सिंग यांची जडणघडण :**

सध्याच्या पाकिस्तानातील 'गाह' या छोट्या खेड्यात २६ सप्टेंबर १९३२ रोजी जन्मलेले डॉ.

† संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्र अधिविभाग, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा.
आजीव सभासद क्र.२०९९, भ्रमणध्वनी : ९८२२८१३६७२, ईमेलः gajanankhamkar27@gmail.com

†† संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्र अधिविभाग, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा.
आजीव सभासद क्र. २०६८, भ्रमणध्वनी : ९५४५३०७२००, ईमेलः rathodmaruti86@gmail.com

मनमोहन सिंग यांनी कुशाग्र बुद्धिमत्ता, चिकाटी व प्रयत्नात सातत्य या भांडवलावर शैक्षणिक प्रगतीसोबत आपली प्रशासकीय व राजकीय कारकीर्द उंचावत नेली. भारतीय प्रशासकीय सेवेत येण्यापूर्वी त्यांनी पंजाब विद्यापीठातून आपले पदवीचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर केंब्रिज विद्यापीठामधून पदव्युत्तर शिक्षण घेऊन ऑक्सफर्ड येथून अर्थशास्त्रातील D. Phil. म्हणजेच पीएच.डी. पदवी प्राप्त केली. त्यांचा पीएच.डी.चा प्रबंध आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्रातील होता. त्यांनी "India's export trends and prospects for self sustained growth." म्हणजेच 'भारताच्या निर्यातीतील प्रवृत्ती आणि शाश्वत वाढीच्या संधी' या विषयावर संशोधन प्रबंध सादर करून आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्रातील पीएच.डी. ही अतिउच्च पदवी आंतरराष्ट्रीय नामांकित विद्यापीठातून संपादन केली. पुढे त्यांनी पंजाब युनिव्हर्सिटी तसेच दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथे प्राध्यापक म्हणून महत्त्वाचे योगदान दिले. त्यांच्या आर्थिक विचारातून व संशोधनातून भारताच्या अंतर्मुखी धोरणावर त्यांची विरोधी भूमिका स्पष्ट होते व हाच सैद्धांतिक आधार त्यांच्या आर्थिक धोरणाच्या मूलगामी बदलाचा पाया ठरला. १९७१ मध्ये भारताचे अर्थसल्लागार व नंतर १९७२ मध्ये वित्तमंत्रालयात मुख्य आर्थिक सल्लागार म्हणून त्यांची नियुक्ती झाली. वित्तमंत्रालयातील सचिव, नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे गव्हर्नर, पंतप्रधानाचे सल्लागार, युनिव्हर्सिटी ग्रांटस कमिशनचे (UGC) अध्यक्ष अशा महत्त्वाच्या राष्ट्रीय पातळीवरील जबाबदाऱ्या त्यांनी पार पाडल्या. अंक्टाड या आंतरराष्ट्रीय संस्थेतही त्यांनी योगदान दिले. १९८७ ते १९९० या काळात साऊथ कमिशनचे सचिव म्हणून त्यांनी कार्य केले. भारताच्या आत्यंतिक अडचणीच्या काळात वित्तमंत्री म्हणून त्यांनी अर्थव्यवस्थेस दिवाळखोरीच्या उंबरठ्यावरून वेगवान वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेकडे नेण्याचे सर्वात मोठे कार्य केले. त्यातूनच भारताने आत्यंतिक संकटातून जोमाने प्रगतीपथावर नेणारे उदारीकरण, जागतिकीकरण व खाजगीकरण यातून देशाचा चेहरा बदलला. 'भारताच्या वैभवाचा कालखंड आता आला आहे आणि आता तो कोणीही रोखू शकत नाही', हे अत्यंत संकटात असताना ठामपणे जगाला सांगून ते सिद्ध करणारे डॉ. मनमोहन नावाचे अर्थपुरुष पुढे २००४ ते २०१४ अशी १० वर्षे खंडप्राय भारताचे १४ वे पंतप्रधान पहिले शीख धर्मीय पंतप्रधान ठरले. त्यांना पद्मविभूषणसहित एकूण २५ पुरस्कारांनी सन्मानित केले गेले, तर जगभरातील तब्बल १६ विद्यापीठांनी त्यांना 'डी.लिट.' या मानद पदवीने सन्मानित केले. आजही जग त्यांना एक आंतरराष्ट्रीय कीर्तीचे अर्थतज्ज्ञ म्हणून ओळखते.

**एक यशस्वी आणि संस्मरणीय राजकीय कारकीर्द :**

अराजकीय पंतप्रधान अशा व्यक्तिमत्त्वाचे डॉ. सिंग यांनी  सलग दोन वेळा पंतप्रधानपद केवळ सांभाळले नाही, तर जागतिक पटलावर सर्वाधिक शिकलेला पंतप्रधान, आर्थिक आजारपणावरील डॉक्टर व अमेरिकन राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी म्हटल्याप्रमाणे, 'सिंग बोलतात तेव्हा जग ऐकते', असा चढत्या भाजणीचा प्रवास करणारे ते एक यशस्वी व संस्मरणीय राजकीय कारकीर्द असणारे काँग्रेसीयन ठरले. २००४ मध्ये 'इंडिया शायनिंग' या कथित भ्रमाचा पसारा बाजूला सारत काँग्रेस सरकार सत्तेवर आले व सोनिया गांधी यांनी युपीए-१ साठी मनमोहन सिंग यांच्यावर जबाबदारी दिली. 'आपल्या पदापेक्षा देशहितासाठीचे निर्णय महत्त्वाचे' हे सूत्र समोर ठेवून त्यांनी कार्य केले. याचा एक उत्तम दाखला म्हणजे 'अणुकरार'. त्या प्रसंगी सिंग किती कणखर होऊ शकतात, याचा भक्कम पुरावा देशानेच नव्हे तर जगाने पाहिला. या करारामुळे भारताचे अमेरिकेशी असणारे पूर्वीचे साशंकतेचे वातावरण बदलून मैत्रीचे वातावरण निर्माण होऊन पुढे परकीय गुंतवणूक

वाढीस पोषक वातावरण तयार झाले. 'माहितीचा अधिकार' यासाठी मनमोहन सिंग सरकारने केलेला कायदा म्हणजे लोकशाही बळकटी करण्याच्या दिशेने टाकलेले एक मजबूत पाऊल होते. त्यांनी त्या काळात आधार हा सामान्य माणसाच्या डिजिटल ओळखपत्रासाठीच्या मोहिमेचा केलेला शुभारंभ म्हणजे आज सुरू असलेल्या अनेक योजनांच्या यशस्वितेसाठीची कोनशीलाच होती. अवकाश संशोधनामध्ये इस्रोला त्यांनी दिलेली बळकटी याचे आजचे फलित चांद्रयानसारख्या मोहिमेतून पाहायला मिळते. शिक्षणहक्क कायद्याची त्यांनी केलेली पेहेल ही एका मूलभूत गरजेच्या परिपूर्ततेसाठीचा एक मैलाचा दगड ठरलेली आहे. भारतातून विदेशामध्ये शिक्षणाकरिता व नोकरीकरिता जाणाऱ्या बौद्धिक वर्गाची वाढती संख्या हा प्रश्न प्राधान्य क्रमाने विचारात घेऊन तत्कालीन राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या मार्गदर्शनाखाली भारतातून होणारे बौद्धिक वहन (Brain Drain) या संदर्भात त्यांनी तज्ज्ञ गटाला अभ्यासासाठी नेमून त्यावर प्रभावी अशा उपाययोजना आखल्या. आज ८० कोटी लोकांना दिले जाणारे मोफत धान्य ही पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी २०१३ साली संमत केलेल्या अन्नसुरक्षा विधेयकाची फलनिष्पत्ती म्हणावी लागेल. मात्र या सर्व सकारात्मक बाबींच्या पलीकडे डॉ. सिंग यांची पंतप्रधानपदाची दुसरी टर्म म्हणजे प्रणव मुखर्जी यांचा अंतर्गत विरोध, सोनिया गांधी यांचा हस्तक्षेप व विरोधकांची कोल्हेकुई यांनी झाकोळलेले पर्व असे असले तरी त्यांनी आपल्या संयत व शांत वृत्तीतून पूर्ण कालखंडात आपल्या पदास न्याय कसा देता येईल यासाठी अविश्रांत मेहनत घेतली. याच काळात 'दुबळे पंतप्रधान', 'धोरण लकवा', 'मौनी पंतप्रधान' अशा खोट्या कथनाचे ते शिकार ठरले. यातून त्यांचे कार्य दुर्लक्षित झाले असले तरी त्यांनी घेतलेले अनेक निर्णय, राबवलेली धोरणे यामुळे इतिहासास त्याची योग्य ती दखल घ्यावीच लागेल. वेगवान विकासास अडथळा आणणारे विरोधक सिंग यांना अडचणीत आणण्याच्या प्रयत्नात देशास अडचणीत आणणारे ठरले. विनोद राय सारख्या काल्पनिक घोटाळ्याचे व नुकसानीचे सूत्रधार म्हणून सिंग यांना आरोपांच्या पिंजऱ्यात उभे करणारे 'स्पेक्ट्रम'चे कथानक त्यांना उलटवता आले नाही. सरळपणा, सभ्यपणा ही राजकीय गुणवत्ता नव्हे, तर अडचणीचा घटक असते हे चाणक्य यांनी 'उंच व सरळ झाडेच प्रथम कापली जातात', या त्यांच्या वचनातून सांगितले होते. मात्र चाणक्यांच्या त्या वचनासाठी डॉ. सिंग हे एक चपखल असा पुरावा ठरावेत हा एक भारतीय राजकारणाचा दैवदुर्विलास म्हणावा लागेल.

**भारतीय आर्थिक सुधारणांचे पितामह -**

डॉ. मनमोहन सिंग यांच्या संपूर्ण आर्थिक निर्णयांचे दूरगामी परिणाम आजही अनुभवास येत आहेत. त्यांची ओळख फक्त आर्थिक महासंकट-१९९१ यातून देशाला सावरणारे वित्तमंत्री एवढ्याने पूर्ण होत नाही. नरसिंहराव पंतप्रधान असताना विदेशी चलनसाठ्याने तळ गाठलेला होता. केवळ १५ दिवसांच्या आयातीला पुरेल इतकाच विदेशी चलनसाठा होता. दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर भारत असताना अत्यंत धाडसपूर्वक व आत्मविश्वासपूर्वक त्यांनी १९९१ चा अर्थसंकल्प मांडला. त्यावेळी देशातील विदेशी ठेवी वेगाने घटत होत्या. परकीय मदत मिळणे दुरापास्त झाले होते अशावेळी जर डॉ. मनमोहन सिंग यांनी आर्थिक धोरणात आवश्यक ते बदल केले नसते, तर भारताचे पतमानांकन घसरून आपली अर्थव्यवस्था पुढील १० वर्षे अडचणीत आली असती. हे महासंकट, वाढती महागाई व विदेशी मदतीचे घटलेले प्रमाण यातून गुंतागुंतीचे झाले होते. अशा बिकट पार्श्वभूमीवर डॉ. सिंग यांनी २४ जुलै १९९१ रोजीचा ऐतिहासिक अर्थसंकल्प मांडला. कोणतीही अर्थव्यवस्था आपल्या साधनांच्यापेक्षा अधिक खर्च करीत वर्षानुवर्षे राहू शकत

नाही. (Neither the Government nor the economy can live beyond its means year after year) हा निकष समोर ठेवून आर्थिक घडी बसवण्यासाठी अत्यंत धाडसपूर्ण असे खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाचे (खाउजा) (Privatisation, Liberalisation and Globalisation) धोरणाचा प्रारंभ केला.

**बंदिस्त अर्थव्यवस्थेकडून खुल्या व विकसनशील अर्थव्यवस्थेची पायाभरणी -**

स्वातंत्र्योत्तर काळातील धोरण हे मुख्यत्वे अंतर्मुखी स्वरूपाचे होते. मर्यादित साधनांचा वापर मुख्यत्वे प्राधान्यक्रमाने व नियंत्रित पद्धतीने करण्यासाठी पंचवार्षिक योजना, उद्योगासाठी परवाना पद्धती, कोटा पद्धती असे 'लायसेन्सराज' निर्माण करण्यात आले. यातून नोकरशाही ही 'बाबूराज' निर्माण करणारी व प्रत्येक कामासाठी 'दाम' मागणारी झाली. उत्पादन चांगल्याप्रकारे स्पर्धात्मक पद्धतीने देण्याऐवजी टंचाई निर्माण करून 'रेशनिंग' तंत्र स्वीकारले. बंदिस्त अर्थव्यवस्था कुडमुडी भांडवलशाही (Crony Capatalism) तयार झाली. विकासाचा दर ३.५% म्हणजे हिंदू ग्रोथ रेट ठरला. या धोरणाचे परिणाम डॉ. मनमोहन सिंग यांनी आपल्या अभ्यासातून स्पष्टपणे पाहिले व अर्थव्यवस्था गतिमान करण्यासाठी हे धोरण मूलतः बदलून बहिर्मुखी व स्पर्धात्मक असले पाहिजे, हे त्यांना माहीत होते. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी १९९० च्या विदेशी चलनसंकटाची वाट पाहावी लागली. आर्थिक संकटातून बाहेर पडण्यासाठी पी.व्ही. नरसिंहराव यांनी डॉ. मनमोहन सिंग यांची वित्तमंत्री म्हणून नियुक्ती केली आणि धोरणात्मक सुधारणा घडवून आणणारे खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाचे धोरण स्वीकारले. याला अर्थातच स्वपक्षातूनही विरोध झाला. परंतु खंबीरपणे हे धोरण पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव आणि वित्तमंत्री डॉ. सिंग या जोडगोळीने खंबीरपणे राबवले. सार्वजनिक उद्योगातील सरकारी हिस्सा खाजगी क्षेत्रास विकण्यात आला. बँकांचे शेअर्स बाजारात सूचीबद्ध करण्यात आले. पूर्वीची राखीव क्षेत्रे खाजगी क्षेत्रास उपलब्ध करून देण्यात आली. आयातकर ३०० टक्केवरून ५० टक्के तर सीमाशुल्क २२० टक्केवरून १५० टक्के करण्यात आले. रुपयाचे अवमूल्यन १८% ने करण्यात आले व ४७ टन सोने ब्रिटनच्या बँकेत गहाण ठेवण्यात आले. डॉ. सिंग यांनी केलेल्या या विविध उपायांतून भारताची आर्थिक तूट भरून निघण्यास मदत झाली. जागतिक आर्थिक मंचावरील विविध संस्था व संघटनांनी तसेच विकसित देशांच्या समूहांनी भारतासाठी मदत व सहकार्य करण्यास त्यामुळेच आपली द्वारे खुली केली. यातून जागतिक बाजारपेठेला भारत नावाची एक बहुव्याप्त अशी बाजारपेठ खुली झाली. तर भारतासाठी जगाचे संपूर्ण आसमंत खुले झाले. जागतिक बाजारपेठेतील आधुनिक उपभोग्य वस्तूच नव्हे तर तंत्रज्ञान व वैविध्यपूर्ण सेवा भारतीय अर्थव्यवस्थेला मुक्तपणे उपलब्ध झाल्या. तर उत्पादन, उपभोग, वस्तू व सेवांची निर्मिती, कला-क्रीडा, संगीत अशा अनेकविध क्षेत्रांमध्ये भारतीय गुणवत्ता, उपक्रमशीलता व नावीन्यशीलतेला कधी नव्हे ती संधी उपलब्ध झाली.

म्हणूनच डॉ. मनमोहन सिंग हे सर्वसामान्य व गरीब भारतीयांच्या आर्थिक स्वातंत्र्याचे शिल्पकार ठरतात. जागतिक पटलावरील त्यांच्या अर्थनीतीबरोबरच त्यांच्या रोजगार हमी देणाऱ्या 'मनरेगा' योजनेतून ते नेहरूप्रणित लोकशाही समाजवादाचे पुरस्कर्तेदेखील ठरतात. तर शिक्षणाचा हक्क कायद्याच्या अंमलबजावणीतून ते मानवी जीवनास आवश्यक मूलभूत अटीची पूर्तता करणारे अंत्योदयी गांधीवादीदेखील ठरतात. तर त्यांच्याच कारकिर्दीत आकाराला आलेला माहितीच्या अधिकाराचा कायदा लोकशाहीत उत्तरदायित्व असणारी शासनव्यवस्था निर्माण करणारा ठरला. हे सर्व महत्त्वाचे निर्णय तत्कालीन परिणामापेक्षा दीर्घकालीन

परिवर्तनाचे कारक घटक ठरतात हे आजचा वर्तमान व उद्याचा भविष्यही साक्षीत्वाने मान्य करत राहील.

**ग्रामीण रोजगाराची संजीवनी : मनरेगा (२००५) :**

'महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना' (मनरेगा) ही महाराष्ट्राच्या वि.स. पागे यांनी सुरू केलेल्या रोजगार हमी योजनेची राष्ट्रीय स्वीकृती होती. ग्रामीण भागातील कुटुंबांना वर्षातील १०० दिवस रोजगार देणारी योजना दारिद्र्य निर्मूलनाचा महत्त्वाचा घटक डॉ. मनमोहन सिंग यांनी पंतप्रधान काळात सुरू केली. यातून ग्रामीण भागात कायमस्वरूपी पायाभूत सुविधा निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. या योजनेवर टीका करीत असताना पंतप्रधान मोदी यांनी २०१५ मध्ये या योजनेस काँग्रेसच्या अपयशाचे स्मारक म्हटले, परंतु ही योजना लोकांच्या कल्याणाची असल्याने आपण ती बंद करणार नाही, अशी स्पष्ट मान्यता त्यांना द्यावी लागली. इतकेच नव्हे, तर २०२१ च्या अंदाजपत्रक मांडणीच्या प्रसंगी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी गेल्या १५ वर्षात आपण सर्वाधिक खर्च या योजनेवर केल्याचे स्पष्ट केले. अत्यंत अभ्यासपूर्वक तयार केलेले दारिद्र्य कमी करण्याची मनमोहन सिंग यांची ही योजना आता २०२५-२६ मध्ये १३.३१ कामगारांना काम देते व त्यातून ९ कोटींच्या मालमत्ता निर्माण झाल्या असून, २९३ कोटी मनुष्यदिन रोजगार निर्माण झाला असून ३४ कोटींचा निधी लाभार्थींच्या खात्यावर (DBT) जमा केला आहे.

**देशाचे मानव संसाधन बळकट करणारा शिक्षणहक्क कायदा (२००५) -**

डॉ. मनमोहन सिंग यांनी स्वतः खूप टोकाच्या गरिबीतून संघर्ष करत आपल्या प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंतचा टप्पा पूर्ण केला व त्याच जोरावर त्यांनी देशनिर्मितीमध्ये प्रशासकीय पदांपासून सुरुवात करत देशाच्या अतिउच्च पदापर्यंत कार्य केले. परिणामी, 'शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे आणि ते जो पितो तो गुरगुरल्याशिवाय राहात नाही', या युक्तीची त्यांनी स्वतः घेतलेली प्रचिती व अशा शिक्षणातून देशनिर्मितीकरता तयार होणारे मानवी भांडवल व त्याची मौलिकता त्यांना माहीत असल्यामुळेच त्यांनी आपल्या कार्यकाळात 'मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण' कायदा ही देशाला दिलेली एक महत्त्वाची भेट ठरली. आज या कायद्याच्या अंतर्गत ६ ते १४ या वयोगटातील सर्व मुलांचे प्राथमिक शिक्षण (RTE-Right To Education) द्वारे मूलभूत हक्कात अंतर्भूत झाले आहे. शिक्षणास मूलभूत अधिकार म्हणून दिल्याने राज्य सरकार व केंद्र सरकार यांनी कोणती जबाबदारी घ्यावी याची स्पष्टता आली. या कायद्याद्वारे फक्त बालकांचेच नव्हे तर अपंगत्व असणाऱ्या मुलांचेदेखील प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याची जबाबदारी शासनावर आली. प्रचंड मोठी लोकसंख्या असणाऱ्या लोकशाही देशात निरक्षरांचे मोठे प्रमाण हे मोठे आव्हान सोडवणारी कायदेशीर चौकट याद्वारे देशात निर्माण झाली. या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी ५ वर्षांत १७५ लाख कोटींची तरतूद आवश्यक होती. शालेय स्तरावर अपुरे मनुष्यबळ, आवश्यक मूलभूत सुविधांची टंचाई हे प्रश्न आहेतच. येत्या काळात आपण त्यावर मातदेखील करू. मात्र त्यासाठीची कायदेशीर चौकट व शासनाचे उत्तरदायित्व या बाबी डॉ. मनमोहन सिंग यांनी संविधानाच्या कक्षेत आणल्या.

**लोकशाहीचा आत्मा ठरलेला माहितीचा हक्क कायदा (२००५) :**

शासकीय व्यवहारात, निर्णयात पारदर्शीपणा व उत्तरदायित्व निर्माण करून नागरिकांना सक्षम बनविणारा कायदा डॉ. मनमोहन सिंग यांच्या कालखंडात झाला. १५ जूनपासून अंमलात असणाऱ्या या कायद्याने भ्रष्टाचार कमी करण्यात व लोकशाही समृद्ध करण्यात महत्त्वाचा वाटा उचलला. नागरिकांना हवी असलेली शासकीय व्यवस्थेकडील माहिती कालबद्धरीत्या देण्याचे बंधन आहे. त्याचबरोबर शासनाच्या सर्व कार्यालयांची माहिती

अधिकार संबंधित माहिती ऑनलाईन उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. जर नागरिकाच्या जीविताशी अथवा स्वातंत्र्यावर संबंधित माहिती असल्यास ती ४८ तासांत देणेचे बंधन आहे. इतर माहितीसाठी ३० दिवसांची मुदत असते. या कायद्यामुळे आणि त्यातील तरतुदींमुळे सर्वसामान्य माणसांना त्यांच्या संबंधित शासकीय सेवा-सुविधा यासंबंधीची योग्य ती दाद मागता येणे व माहिती मिळवणे शक्य झाले आहे. यासोबतच व्यक्तिगतच नव्हे तर सार्वजनिक हिताशी संबंधित विविध योजना, शासकीय संस्था, आस्थापना यांच्याद्वारे केली जाणारी कामे, राबविल्या जाणाऱ्या योजना यांबाबतची कार्यवाही नेमकी योग्य व पारदर्शकरीत्या होते का? सार्वजनिक मालमत्ता व पैसा यांचा वापर योग्य त्या गोष्टींसाठी होतो का? मालमत्ता व पैसा यांचा झालेला वापर व त्यांची फलनिष्पत्ती नेमकी झाली किंवा काय? अशा अनेक बाबी या नागरिकांना हव्या तेव्हा उपलब्ध करून देणे हे बंधनकारक झाले आहे. यातून पारदर्शी व वेळेवर शासकीय कामकाज होण्यास एक विश्वासार्ह वातावरण निर्माण झाले आहे.

**आत्महत्याग्रस्त व संकटातील शेतकऱ्यांना कर्जमाफी (२००८) :**

शेतकऱ्यांना कर्जसापळ्यातून सोडवण्यासाठी डॉ. मनमोहन सिंग यांनी २००८-०९ च्या अंदाजपत्रकात कर्जमाफीची योजना जाहीर केली. या योजनेस त्यांचा महाराष्ट्रातील विदर्भ दौरा कारणीभूत होता. या दौऱ्यात त्यांनी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा स्त्रियांना समक्ष भेट देऊन त्यांच्याशी संवाद साधला व शेतकऱ्यांचे दुःख प्रत्यक्ष जाणून घेतले. शेतकऱ्यांचे ते दैन्य व दुःख पाहून सर्व अल्पभूधारक शेतकऱ्यांचे १००% कर्ज त्यांनी माफ केले, तर मध्यम व मोठ्या शेतकऱ्यांना कर्जसवलत जाहीर केली. एकूण ७१००० कोटींची कर्जमाफी डॉ. सिंग यांनी दिली. त्यातील महाराष्ट्राचे शेतकऱ्यांना ३००० कोटी रुपयांची कर्जमाफी देऊन या योजनेचा त्यांनी शुभारंभ केला. नाबार्डमार्फत ही योजना राबवण्यात आली. तत्कालीन परिस्थितीची अनिवार्यता लक्षात घेऊन त्यांनी ही कर्जमाफी दिली असली तरी त्याचवेळी आपल्या यासंदर्भातील भाषणांमध्ये त्यांनी वारंवार एक गोष्ट उद्धृत केली ती म्हणजे कर्जमाफी ही फक्त वरवरची मलमपट्टी आहे. ते शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा व आत्महत्या यावरील काही कायमस्वरूपी उपाय नाही. आपल्याला जर शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा आणि आत्महत्या रोखायच्या असतील तर शेती क्षेत्रामध्ये वाढत चाललेल्या अनिश्चितता यांवर दीर्घकालीन उपाय करायला हवेत. हे उपाय जसे शासकीय पातळीवरील असतील तसेच ते सामाजिक व वैयक्तिक पातळीवरसुद्धा करणे गरजेचे आहे, यावर त्यांचा ठाम विश्वास होता.

**भूक, उपासमार, कुपोषण यांच्या निवारणासाठीचा राष्ट्रीय अन्नसुरक्षा कायदा**
(National Food Security Act, 2013) -

भारत कृषिप्रधान देश असूनही सर्व भारतीयांना पुरेसे अन्न उपलब्ध करण्यात अद्यापि यश मिळाले नाही. या समस्येवर डॉ. सिंग यांनी २०१३ मध्ये राष्ट्रीय अन्नसुरक्षा कायदा केला. आपल्या नागरिकांना मूलभूत हक्क म्हणून अन्नधान्य उपलब्धता व त्याला परवडेल अशा किमतीला देण्याची बांधिलकी सरकारवर ठेवण्यात आली. सध्या ८० कोटी नागरिकांना मोफत धान्य देण्याची योजना हे या कायद्याचेच फलित आहे. जागतिक स्तरावर ५ व्या क्रमांकाच्या व सर्वात वेगवान आर्थिक वृद्धिदर असणाऱ्या देशात 'भूक' पूर्ण करणे शक्य झाले नाही. जागतिक भूक निर्देशांकात २०२३ मध्ये आपण १२७ देशांच्या क्रमवारीत १०५ व्या स्थानावर होतो. अद्यापि, अन्नसुरक्षा देऊ न शकल्याने आपल्या देशात कुपोषित असलेल्या पालकांची वाढ कुंठित झालेली आहे व परिणामी अकार्यक्षम लोकसंख्येचा मोठा भार आपल्यावर वाढत आहे. सध्या आपली भारतीय अर्थव्यवस्था हे एका विचित्र द्वंद्वातून प्रवास करत आहे

की, ज्यामध्ये सेवाक्षेत्राची आक्राळविक्राळ वाढ होत आहे तर तुलनेने औद्योगिक क्षेत्र आजारपणाचा सामना करत आहे आणि शेतीक्षेत्र आर्थिक संकटांनी वेढलेले आहे. अशावेळी आर्थिक विकासाचा दर एका बाजूला वाढत आहे, तर दुसऱ्या बाजूला बेरोजगारी आणि महागाईचा दरदेखील वाढत चालला आहे. त्यातून संपत्तीचे केंद्रीकरण, संसाधनांचे विषम वाटप अशा अनर्थिक घटकांमध्ये वाढ होत आहे. शहरे फुगत चालली आहेत आणि खेडी ओस पडत आहेत. परिणामी, फार मोठ्या लोकसंख्येचा भाग हा न्यून उत्पन्नाचा सामना करत आहेत. परिणामी, त्यांचे पोषण व अन्नधान्याची पूर्तता हा फार मोठा गंभीर प्रश्न निर्माण झालेला होता. तो सोडविण्याकरता मनमोहन सिंग सरकारने दहा वर्षांपूर्वी घेतलेला अन्नसुरक्षितता कायद्याच्या अंमलबजावणीचा निर्णय देशाला कोरोना महामारी व त्यानंतर आजच्या समकालीन परिस्थितीतदेखील उपयुक्त ठरत असलेला दिसून येतो.

**भारतीय अर्थकारणाला आधारभूत ठरलेली आधार योजना :**

सर्व भारतीयांना एकमेव व खात्रीशीर ओळख आधारकार्डमार्फत करून देण्याच्या योजनेचे जनक डॉ. मनमोहन सिंग आहेत. नंदन निलकेनी यांच्यासारख्या द्रष्ट्या तज्ज्ञाच्या संकल्पनेला शासकीय धोरणाचा सढळ पाठिंबा देऊन मनमोहन सिंग सरकारने या योजनेचा शुभारंभ केला. या योजनेला विरोध करणाऱ्यांनीच सत्ता प्राप्त होताच हीच योजना राबविणे अग्रक्रमाने ठरविले. सध्या सर्व शासकीय योजना व अनेक प्रकारच्या सुविधा प्राप्त करण्यासाठी 'आधार' आधारभूत आहे. आज विविध शासकीय योजनांद्वारे लोकांना आर्थिक मदत करणे असो, शेतकऱ्यांच्या, महिलांच्या, अपंगांच्या अशा सर्व समाजघटकांच्या खात्यामध्ये थेट निधीचे हस्तांतरण करणे असो किंवा शासकीय योजनांचा दस्ताऐवजांचा, कागदपत्रांचा, आर्थिक व्यवहारांचा खरेपणा तपासण्याचा खात्रीशीर मार्ग असो, नागरिकत्वाची ओळख पटविण्यासाठीचा एक हमखास असा दस्ताऐवज असो, अशा अगणित गोष्टींमध्ये आधार हाच एकमेव आधार मानला जात आहे. कोरोना काळामध्ये लोकांपर्यंत योग्य ती मदत, माहिती व उपचार पोहोचविण्यामध्ये आधार, आधारशी लिंक असणारा मोबाईल नंबर व बँक खाते या तीन गोष्टींची अत्यंत मोलाची मदत झाली. भारतासारख्या जगातील सर्वाधिक लोकसंख्या असणाऱ्या देशाला या सर्व बाबी राबविताना आधार क्रमांक व आधार ओळखपत्र यांची आज होत असलेली मदत ही शब्दातीत अशीच आहे.

**भारताच्या परराष्ट्र धोरण व अणुऊर्जा स्वयंपूर्णतेतील मैलाचा दगड (भारत-अमेरिका अणुकरार) :**

देशाच्या इतिहासाचा वळणबिंदू ठरणारा अमेरिका-भारत अणुकरार डॉ. मनमोहन सिंग यांनी आपल्या पदाची जोखीम घेऊन पूर्ण केला. प्रसंगी ते त्यासाठी विश्वासदर्शक ठरावास सामोरे गेले. सरकार पडेल का यापेक्षा देशाचे हित सावरणे यास महत्त्व देणारे डॉ. सिंग किती कठोर निर्णय घेऊ शकतात, याचा परिचय त्यांनी यातून दिला. या यशस्वी अनुकरारामुळेच भारताची अमेरिकेशी वाढलेली मैत्री पुढे विदेशी गुंतवणूक वाढीस व तांत्रिक सहकार्य वाढीस उपयुक्त ठरली. त्याचबरोबर भारताने आपल्या ऊर्जा सक्षमीकरणाकरिता टाकलेले पाऊल व त्यातून शस्त्रास्त्र सज्जतेसाठी दाखवून दिलेला प्राधान्यक्रम जगाला एक वेगळा संदेश देऊन गेला. एका बाजूला रशिया, जपान व चीन यांच्याशी असणारे राजकीय संबंध व दुसऱ्या बाजूला अनेक वर्ष तणावपूर्ण व संदिग्ध राजकीय वातावरण राहिलेल्या अमेरिकेशी अनुकराराद्वारे नव्याने केलेली मैत्रीपूर्ण पेहेल या सर्वांमुळे डॉ. सिंग यांनी आपल्या विदेशी नीतीतील आपली निर्णय क्षमतेतील चपखलता दाखवून दिली.

**दिवाळखोरीच्या उंबरठ्यावरील अर्थव्यवस्थेकडून जगातील तिसऱ्या क्रमांकाची वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था:**

डॉ. मनमोहन सिंग यांच्या स्वरूपात अत्यंत संकटाच्यावेळी तारणहार मिळाला. देश आर्थिक पारतंत्र्यात व दिवाळखोरीच्या नामुष्कीत जाण्यापासून वाचवला. खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण असे नवीन आर्थिक सुधारणांचे पर्व त्यांनी सुरू केले व चलनाचे १९% अवमूल्यन, बँकांना सूचीबद्ध करणे, सेबी, आरबीआय या संस्थांचे कार्य देश गतिमान करणेस वापरणे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे देशातील सर्वसामान्य जनतेस विकासाचा भागीदार व हक्कदार बनवण्यासाठी शिक्षणहक्क कायदा, मनरेगातून रोजगार हक्क, अन्नसुरक्षा कायदा, माहितीचा अधिकार यातून नवभारताचे शिल्पकार म्हणून डॉ. मनमोहन सिंगाच्या कार्याची दखल इतिहासास घ्यावीच लागेल. भारतीय इतिहासात त्यांचा कालखंड हा समृद्धी, विकास यासोबत सामाजिक न्यायाचा सुवर्ण कालखंड ठरेल. दिवाळखोरीच्या टप्प्यातून खरेदीशक्ती समता (Purchasing Power Parity) निकषावर भारत तिसऱ्या क्रमांकावर २०१३ मध्ये नेऊ शकले. ICU मधून देशाला बाहेर काढून महासत्तेच्या वाटेवर नेणारे ते डॉक्टर ठरले. डॉ. मनमोहन सिंग यांनी १९९१ साली जेव्हा अर्थमंत्री म्हणून आपल्या राजकीय कारकिर्दीला सुरुवात केली तेव्हा देशाच्या तिजोरीमध्ये परकीय गंगाजळी ही फक्त तीन बिलियन अमेरिकी डॉलरएवढी होती. आज ती ३०० बिलियन अमेरिकी डॉलरएवढी झाली आहे. नव्वदच्या दशकानंतर या देशाने टेलिकॉम, ऑटोमोबाईल, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, सॉफ्टवेअर अशा अनेकविध क्षेत्रांमध्ये नेत्रदीपक अशी प्रगती केली. एक काळ असा होता की, विदेशी कंपन्या भारतीय कंपन्यांना विकत घेत मात्र ९० च्या दशकानंतर भारतातील खाजगी क्षेत्राने स्वतःचा आवाज एवढा वाढवला की टाटा, मित्तल यांसारखे भारतीय उद्योजक नामांकित विदेशी कंपन्यांना व त्यांचे ब्रँड्स विकत घेऊ लागले. अमेरिकेच्या सिलिकॉन व्हॅलीमधील सॉफ्टवेअर उत्पादनांवर भारतीय बुद्धिमत्तेची मक्तेदारी कधी नव्हे एवढी प्रभाव पाडू लागली.

**डॉ. मनमोहन सिंग यांच्या सामान्य अशा असामान्य गोष्टी :**

डॉ. मनमोहन सिंग यांच्या निर्णयप्रक्रियेत गरिबांच्याबाबत विशेष बांधिलकी दिसते. त्यामागे त्यांची वैयक्तिक जडणघडण, अनुभवांचे संचित जमा आहे. मात्र त्यापैकी अनेक बाबी अज्ञात आहेत. कारण त्यांनी आपल्या व्यक्तिगत आयुष्यातील प्रसंग, घटना यांचे कधीही सार्वजनिक भांडवल केले नाही. मनमोहन सिंग यांनी १० वी पर्यंत पायात चपला न घालता आपले शालेय शिक्षण पूर्ण केले. शालेय शिक्षणासाठी त्यांनी मैलोन्मैल पायपीट केली. त्यांच्या बालपणी त्यांच्या घरात अभ्यासासाठी वीज व पिण्यासाठीचे पाणी देखील उपलब्ध नव्हते. पुढे जेव्हा ते उच्च शिक्षणासाठी इंग्लंडमध्ये गेले तेव्हा तेथे त्यांना पंजाब युनिव्हर्सिटीकडून मिळणारी शिष्यवृत्तीदेखील अपुरी होती. त्यांना वर्षाकाठी १५० पाउंड एवढी शिष्यवृत्ती मिळायची. मात्र तेथील वार्षिक खर्च हा ६०० पौंडांच्या घरात होता. त्यामुळे ते बऱ्याचदा दुपारी फक्त सर्वात स्वस्त असणाऱ्या चॉकलेट बारवर आपली भूक भागवत असत.

पंतप्रधानपद स्वीकारल्यानंतरही आपली मारुती ८०० हीच आपली खरी गाडी आहे असे मानून ती BMW शेजारी आपली तीच मारुती ८०० गाडी ठेवत. पंतप्रधानपद स्वीकारल्यानंतर त्यांना परदेश दौऱ्यावर जायचे होते. दौऱ्याची तारीख जवळ आली होती. आपल्या सचिवाला त्यांनी विचारले, 'अद्याप माझी तिकिटे आली नाहीत.' सचिवाने सांगितले, 'आपणास तिकीट नसते. भारत सरकारचे विशेष विमान आपणासाठी असते.' जेएनयुमध्ये प्राध्यापक असताना

सायकलवरून ते जात असत. २६ सप्टेंबर १९३२ रोजी अविभाजित भारतात पंजाबमधील गाह या खेड्यात त्यांचा जन्म झाला. जेथे ना पाणी होते, ना वीज पोहचली होती. शेतकऱ्यांसाठी ७१००० कोटींची कर्जमाफी दिली. त्याची सुरुवात महाराष्ट्रातील विदर्भातील शेतकऱ्यांना ३००० कोटी देऊन केली. मनमोहन सिंग यांचे जन्मस्थळ गाह पाकिस्तानने जतन केले आहे. फुरसदीच्या वेळेमध्ये ते सर्वाधिक जास्त कोठे रमत असत तर दिल्लीमधील व मुंबईमधील पुस्तकांच्या दुकानांमध्ये. एका निवडणुकीतील खर्चासाठी त्यांनी खुशवंतसिंह यांच्याकडून घेतलेले २५ लाख रुपये देखील त्यांनी न विसरता परत केले. यावर खुशवंत सिंह यांनी आपल्या चरित्रामध्ये असा उल्लेख केला आहे की, माझ्याकडून उसने पैसे घेऊन परत देणारे एकमेव राजकीय नेते म्हणून डॉ. मनमोहन सिंग यांचा उल्लेख करावा लागेल. ते ३३ वर्षे राज्यसभेचे सदस्य राहिले आहेत. आपल्या एकूण कार्यकाळात त्यांनी वीस वर्षे प्रशासकीय सेवेत विविध पदांवर काम केले तर दहा वर्षे ते राज्यसभेचे विरोधी पक्ष नेते म्हणून देखील कार्यरत होते. ते आपल्या कुटुंबीयांसमवेत असताना अमृता प्रीतम यांची गाणी व कविता म्हणत असत. त्यांना शायरी व गझल यांचाही छंद होता. त्यांच्या तेहत्तीस वर्षांच्या राजकीय कारकिर्दीत त्यांच्यावर कधीही कोणताही आरोप झाला नाही. म्हणजे काही आरोप राजकीय आकसातून व गैरसमजातून केले गेले ते कधीही सिद्ध झाले नाहीत.

**समारोप :**

भारताच्या राजकीय इतिहासात ज्यांना वडिलोपार्जित अथवा वारसा हक्काने राजकीय कारकिर्दीचा वसा प्राप्त झाला, असे अनेक नेते होऊन गेले. काहींना अंगभूत असे गुणवैशिष्ट्य लाभल्याने राजकारणात नशीब आजमावून मोठ्या पदापर्यंत पोहोचता आले. अशीही उदाहरणे अनेक पाहायला मिळतात, काहींची सुरुवात ही अगदी गावगाड्यातील राजकारणापासून सुरू होऊन तिला क्रमाक्रमाने राज्य व देशपातळीपर्यंत नेतृत्वाची धार मिळत गेली. मात्र यापैकी कोणतीही सकारात्मक बाब नसताना केवळ देशाची एक राजनैतिक गरज म्हणून ज्यांना राजकारणात यावे लागले, आल्यानंतर एका नैसर्गिक क्रमाने त्या व्यवस्थेचा एक अविभाज्य भागच नव्हे तर देशाच्या एका अतिउच्च अशा राजकीय पदापर्यंत ज्यांचा प्रवास घडला असे डॉ. मनमोहन सिंग हे राजकीय वर्तुळामध्ये एक अव्याभिचारी, धोरण व्यासंगी व कार्यप्रचूर असे नेतृत्व म्हणून इतिहासामध्ये ओळखले जाईल. 'निष्कलंक व सुसंस्कृत राजकारणी म्हणजे काय?' असे जेव्हा वर्तमानातील पिढी भूतकाळाला विचारेल तेव्हा भूतकाळाने एक राखून ठेवलेले उत्तर म्हणजे डॉ. मनमोहन सिंग.....

**संदर्भ ग्रंथ सूची :**


१) Baru Sanjay : Accidental Prime Minister 22 March 2017.

२) Singh Daman : Strictly Personal Manmohan and Gurusharan- February 2014.

३) ककडे विजय - डॉ. मनमोहन सिंग: परिवर्तनाचे शिल्पकार- प्रबोधन प्रकाशन ज्योती, इचलकरंजी, वर्ष ३६, अंक ४४६, जानेवारी २०२५, पृष्ठ १२ ते १८.

४) कांबळे पी. एस. - आंतरराष्ट्रीय कीर्तीचे अर्थशास्त्रज्ञ आणि विकास धोरणकर्ते : डॉ. मनमोहन सिंग-प्रबोधन प्रकाशन ज्योती, इचलकरंजी, वर्ष ३६, अंक ४४६, जानेवारी २०२५, पृष्ठ १९ ते २२.

५) केसरी व्यंकटेश - मृदुभाषी...कणखर..-महाराष्ट्र टाइम्स - ३० डिसेंबर २०२४.

६) कुबेर गिरीश : मार्दवी मार्तंड- दैनिक लोकसत्ता, संपादकीय, २८ डिसेंबर २०२४.


◆

# भारतीय श्रमदलातील लिंगभाव असमानतेचे चिकित्सक अध्ययन

**कुंडलिक भिमराव चौगुले** †

**प्रस्तावना :**

भारतातील महिलांच्या रोजगाराच्या स्थितीचे विश्लेषण करताना स्त्रियांचा सहभाग अत्यंत अल्प असल्याचे दिसते. विविध क्षेत्रांत महिलांना श्रमसहभागापासून डावलले जाते. भारतातील वर्तमान श्रमदल सहभागातील लिंगभाव अंतर (GG) ३७.१% आहे. याचा अर्थ स्पष्ट आहे की, भारतीय श्रमदलात लिंगभाव असमानता आहे. खरे पाहता, श्रमदलात महिलांना समान संधी मिळणे ही सामान्य बाब आहे, असे अनेक अभ्यासकांनी नमूद केले आहे. सामाजिक-आर्थिक क्रियांमधील महिला श्रमिकांचा सहभाग हा जगातील विकसित आणि विकसनशील देशातील सामान्य व्यवहार आहे. (Mamorial/2005) समाजशास्त्रज्ञांच्या मते, महिलांचा श्रमदलातील सहभाग राष्ट्राच्या विकासाची दिशा दर्शवितो (देशपांडे/२०१९). विकसित देशातील श्रमदलातील महिलांचा सहभाग वरील विधानाला दुजोरा देतो. जगातील सकल देशांतर्गत उत्पादनाच्या (GDP) बाबतीत उच्चस्थानी असलेल्या नऊ देशांमधील श्रमदलातील महिलांच्या सहभागाचे प्रमाण जवळपास ४३% ते ४९% एवढे आहे. पण भारतात हेच प्रमाण २८.७% एवढेच आहे (Gender data worldbank.org). याचा अर्थ, भारतात महिलांना संधीपासून वंचित ठेवले जाते.

२०२३ मधील जागतिक म.श्र.द.स.द ४८.७% आणि पु.श्र.द.स.द. ७३.००% आहे. लिंगभाव अंतर (G.G.) २४.०३ % आहे. (ILO/२०२४) याउलट २०२२-२३ चा भारताचा म.श्र.द.स.द. ३७% आणि पु.श्र.द.स.द. ७८.५% आहे. श्रमदलातील लिंगभाव अंतर (G.G.) ४१.५% एवढे आहे. (PLFS/२०२४).

भारतातील २०२२-२३चा ग्रामीण भागातील म.श्र.द.स.द. ४१.५% असल्याचे सरकारी आकडेवारी दर्शविते. याची चिकित्सा करता ४१.५% या म.श्र.द.स. दरामध्ये १४.८% एवढ्या बिनपगारी (Unpaid) महिला श्रमिक आहेत (Ravi and Kapoor/2024). आकडेवारीतील बिनपगारी महिलांचे प्रमाण वजा करता, ग्रामीण भागातील प्रत्यक्षातील म.श्र.द.स.द. २६.७% एवढाच आहे. शहरी भागातील महिला श्रमिकांमध्ये बिनपगारी महिलांचे प्रमाण कमी असल्याचे आढळते. वस्तुत: भारत सरकार महिलांचा श्रमदलातील सहभाग वाढत असल्याचा आभास निर्माण करताना

† सहयोगी प्राध्यापक, जे.एस.एम. कॉलेज, अलिबाग, जि. रायगड.
आजीव सभासद क्र. ११४८, भ्रमणध्वनी : ९४२२५९४००७, ईमेल : chougulekb@gmail.com

दिसते. आपल्या विवेचनामध्ये भारतीय श्रमदलातील लिंगभाव असमानतातेची चिकित्सा करण्याचा प्रयत्न केला आहे.

**अभ्यासाची उद्दिष्ट्ये :**

भारतीय श्रमदलातील लिंगभाव असमानतेचे विवेचन करणे.

श्रमदलातील लिंगभाव अंतराचे (GG) चिकित्सक अध्ययन करणे.

**परिकल्पना :**

भारतीय श्रमदलात अधिक लिंगभाव असमानता अनुभवास येते.

**साहित्याचा आढावा :**

देशाच्या श्रमदलातील श्रमिकांची संख्या वाढती असणे हे देशाच्या आर्थिक वाढीचे लक्षण मानले जाते. त्यासाठी देशात रोजगारवाढीचा दर अधिक असणे आवश्यक आहे. सर्व क्षेत्रांसाठीची क्षमता आणि पात्रता स्त्रियांकडे असल्याने श्रमदलातील त्यांचा सहभाग वाढणेही तेवढेच महत्त्वाचे असते. श्रमदलातील महिलांच्या सहभागाची चिकित्सा अनेक अभ्यासकांनी केली आहे. हिंदुस्थान लिव्हर या बहुराष्ट्रीय कंपनीच्या मुंबईतील कारखान्यात १९६० च्या दशकात जवळपास १५०० कामगार होते. त्यात ६०० स्त्री कामगार होत्या. १९९३ मध्ये मात्र एकूण कामगारांची संख्या घटून ८०० पर्यंत खाली आली आणि त्यात फक्त ३ महिला कर्मचारी शिल्लक राहिल्या होत्या. तसेच १९९६ साली शासकीय नोकऱ्यांमधील एकूण कर्मचाऱ्यांपैकी महिलांचे प्रमाण फक्त ५.८% इतकेच होते (धनागरे/२००५). भारताच्या म.श्र.द.स. दरातील घट स्थिर आणि ठळक निदर्शनास येणारी अशी आहे. २०१३ ला म.श्र.द.स.द. २५.००% होता. तो २०२३ मध्ये २०.०० टक्केपर्यंत घटला आहे (पाहा, James/२०२४). Deloitte Report नुसार २००५ ते २०१८ या काळात श्रमदलातील महिलांच्या प्रमाणात ३६.७% वरून २६% एवढी घट झाली आहे (Desai/2020). कार्पोरेट क्षेत्रात ८१.१% पुरुष काम करतात, तर ३३.१% महिला काम करतात (Choudhary/2013). भारत हे जगातील श्रमदलात सर्वात कमी महिलांचा सहभाग असलेल्या राष्ट्रांपैकी एक आहे (Bhalla and Kaur/२०२१). एकूण अर्थार्जनात (नोकरी करून पैसे कमविण्यात) भारतीय स्त्रियांची परिस्थिती दारुण आहे. भारतीय पुरुष जे कमावतात, त्याच्या ३०% उत्पन्नही भारतीय स्त्रिया आजमितीला कमावू शकत नाहीत. याबाबत भारतीय स्त्रियांची परिस्थिती बांगलादेश, सुदान, इराण, पाकिस्तान आणि मोरक्को या देशातील स्त्रियांप्रमाणे दिसून येते (रेगे-नित्सुरे/२०२५). वरील तज्ज्ञांच्या विवेचनांमध्ये मर्यादा दिसून येतात. उदा. भारतीय श्रमदलातील महिलांच्या सहभागाचा घटता दर, लिंगभाव अंतर (GG), ग्रामीण भागातील महिला श्रमिकांमधील पगारी (Paid) महिला श्रमिक आणि बिनपगारी (Unpaid) महिला श्रमिक हा भेद, श्रमदलातील बिनपगारी महिलांच्या मापनामुळे ग्रामीण भागातील महिलांचा श्रमदलातील वाढता सहभाग. या अनुषंगाने भारतीय श्रमदलातील लिंगभाव असमानतेची चिकित्सा करण्याचा प्रयत्न या लेखात केला आहे.

**सैद्धांतिक मांडणी :**

बेरोजगारीच्या दराची गणना आणि त्याचे विश्लेषण यामधील श्रमिक सहभाग दर हा निर्णायक घटक आहे. श्रमिक दल सहभाग दराची व्याख्या पुढीलप्रमाणे देता येते.

$$\text{श्रमिक दल सहभाग दर} = \frac{\text{नोकरदार व्यक्तींची संख्या + बेरोजगार व्यक्तींची संख्या}}{\text{एकूण लोकसंख्या}} \times १००$$

(Ravi and Kapoor/2024)

**संशोधन पद्धती :**

हा शोधनिबंध संपूर्ण दुय्यम सामग्रीवर आधारित आहे. त्यामध्ये अभ्यासासाठी पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे, संशोधन लेख, Periodic Labour Force Survey (PLFS) from 2017-18 to 2022-23, December, 2024, Statistical Brief ILO, Annual Report, Periodic Labour Force Survey (PLFS) (July 2023-June 2024) Ministry of Statistics and Programme Implementation 23 September 2024, विविध संकेतस्थळे यांचा वापर केला आहे. विश्लेषणासाठी गणितीय मध्याचा वापर केला आहे. सादरीकरण आकृत्यांच्या साहाय्याने केले आहे.

**सैद्धांतिक विश्लेषण :**

भारतीय श्रमदलातील लिंगभाव असमानतेचे चिकित्सा करताना, जगातील सकल देशांतर्गत उत्पादनाच्या (GDP) निकषानुसार उच्चस्थानी असलेल्या (भारतासह) देशांचा म.श्र.द.स.द. विचारात घेतला आहे. १९७१ ते १९९१ आणि २०१४ ते २०२३ या काळातील म.श्र.द.स. दरासंबंधी तौलनिक मांडणी केली आहे. २००४-०५ ते २०२२-२३ या काळातील ग्रामीण आणि शहरी म.श्र.द.स.द., ग्रामीण भागातील म.श्र.द.स. दराची वाढती प्रवृत्ती, या वाढीव दरातील पगारी (Paid) महिला श्रमिक आणि बिनपगारी (Unpaid) महिला श्रमिकांचा सहभाग, शहरी भागातील म.श्र.द.स.द. यासंबंधीची चिकित्सा केली आहे.

**शिखरावरील १० देश आणि म.श्र.द.स.द. :**

२०२३ च्या आकडेवारीनुसार भारतासह जगातील सकल देशांतर्गत उत्पादनाच्या (GDP) संदर्भात उच्चस्थानी असणारे दहा देश आणि त्या देशातील श्रमदलातील महिलांचे प्रमाण यांचे तौलनिक विश्लेषण आकृती क्रमांक १ च्या आधाराने केले आहे.


आकृती क्र. १ मध्ये दर्शविल्याप्रमाणे भारत वगळता नऊ देशातील श्रमदलातील म.श्र.द.स. दरावरून असे प्रतिपादन करता येते की, सर्वच देशांचे श्रमदलातील महिलांचे प्रमाण ४५% पेक्षा अधिक आहे. फक्त इटलीचे प्रमाण ४२.१% आहे. भारतीय श्रमदलातील महिलांचे प्रमाण फक्त २८.७% आहे. भारताचे सकल देशांतर्गत उत्पादनाच्या बाबतीतील पाचवे स्थान लक्षात घेता भारताने आर्थिक वाढ साध्य केली असा अर्थ होतो. परंतु त्याला आर्थिक विकास मानता येत नाही. आर्थिक विकासात सामाजिक न्याय महत्त्वाचा असतो.

**भारतातील श्रमिक सहभाग दराची स्थिती :**

१९१७ ते १९९१ आणि २०१७-१८ ते २०२३-२४ या काळातील भारतीय श्रमिक सहभाग दर, पु.श्र.द.स.द., म.श्र.द.स.द. व लिंगभाव अंतर (GG) याचे तुलनात्मक विश्लेषण आकृती क्रमांक २ व ३ द्वारे केले आहे.

आकृती क्र. २ प्रमाणे तीन दशकांत श्रमिक सहभाग दर वाढता आहे. फक्त पुरुषांचा श्रमदलातील सहभाग १.१९% कमी झाला आहे. पण महिलांचा श्रमदलातील सहभागाचा दर वाढता असल्याचे अनुभवास येते. त्याच काळात सरासरी लिंगभाव अंतर (GG) ३३.४३% एवढे होते. परंतु लिंगभाव अंतराची प्रवृत्ती घटती

**आकृती क्र. १**




स्त्रोत- १) GDP नुसार क्रमवारी www.360tt.trade

२) FLFPR- Genderdada.worldbank.org.

अनुभवास येते. भारताच्या दृष्टीने ही जमेची बाजू होती.


आकृती क्रमांक ३ नुसार भारताचा श्रमिक सहभाग दर (स्त्री-पुरुष), पुरुषांचे श्रमदलातील प्रमाण आणि महिलांचे श्रमदलातील प्रमाण अनुक्रमे १०%, ३% आणि १८.४% याप्रमाणे वाढल्याचे दिसते. साहाजिक लिंगभाव अंतर (GG) काही प्रमाणात कमी झाल्याचे दिसते. तथापि, भारताचे २०२३-२४ चे लिंगभाव अंतर (GG) ३७.१% आहे. जागतिक क्रमवारीमध्ये पाचव्या स्थानी असलेल्या भारताच्या बाबतीत हे चिंताजनक आहे.

भारतीय म.श्र.द.स.द., पगारी (Paid) आणि बिनपगारी (Unpaid) महिला श्रमिकांची स्थिती.

भारतातील ग्रामीण आणि शहरी म.श्र.द.स.द., त्यातील पगारी आणि बिनपगारी महिला श्रमिकांच्या स्थितीचे विश्लेषण आकृती क्रमांक ४ व ५ द्वारे केले आहे.


आकृती क्रमांक ४ व ५ मधील ग्रामीण आणि शहरी म.श्र.द.स. दराबाबत असे निरीक्षण नोंदविता येते की, २००४-०५ ते २०१७-१८ या काळात ग्रामीण म.श्र.द.स.द. २४.८% व शहरी म.श्र.द.स.द. ४% एवढा कमी झाला आहे. पण त्यानंतर मात्र या दरात सतत वाढ होत गेली आहे. आकृती क्र. ४ नुसार २०१७-१८ ते २०२२-२३ या काळात ग्रामीण म.श्र.द.स. दरात १६.९% एवढी वाढ झाली आहे. यात विशेष निर्देर्शित करण्यासारखे म्हणजे ६.६% बिनपगारी महिलांचा सहभाग आहे. प्रत्यक्षातील (Actual) वाढ १०.३% एवढीच आहे. म.श्र.द.स.दरातील १६.९% ही वाढ आभासी आहे, खरी वाढ नाही. उलट शहरी भागातील म.श्र.द.स. दरातील वाढ ५% आहे यामध्ये बिनपगारी महिलांचे प्रमाण फक्त ०.९% आहे (आकृती क्र. ५). शहरी भागातील या वाढीला खरी वाढ म्हणता येईल. वास्तविक, भारतात ग्रामीण आणि शहरी भागातही लिंगभाव असमानता अधिक अनुभवास येते. भारतात विविध क्षेत्रातही लिंगभाव असमानता अनुभवास येते. आजच्या कृत्रिम बुद्धिमत्तेचे प्राबल्य असण्याच्या काळातही स्त्री-पुरुष असमानतेबाबतचे पूर्वग्रह जसेच्या तसे पाझरत आहेत (दै. लोकसत्ता/२०२५). भारतात 'कृत्रिम बुद्धिमत्ता' या क्षेत्रात केवळ २२% स्त्रिया कार्यरत

### आकृती क्र. २ : भारतातील श्रमिक सहभाग दर, १९७१ ते १९९१




स्रोत- NT Bhagoliwal-Page-626


### आकृती क्र. ३ : भारतातील श्रमिक सहभाग दर
### २०१७-१८ ते २०२३-२४ १५ वर्षे आणि वरील





Source : Annual Report, Periodic Labour Forrce Survey (PLFS) (July2023-June2024) Ministry of Statistics and Programme Implementation-23 September 2024.

आहेत (दै. लोकसत्ता/ २०२५). सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना यांचे मते, केंद्र आणि राज्य सरकारांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या विधी अधिकाऱ्यांमध्ये किमान ३०% महिला असणे आवश्यक

**आकृती क्र. ४ : महिला श्रमदल सहभाग दर (ग्रामीण)**




**आकृती क्र. ५ :महिला श्रमदल सहभाग दर (शहरी)**




Source: Female Labour Force Particpiation Rate, An Observational Analysis of the Periodic Labour Force Survey (PLFS) from 2017-18 to 2022-23, Economic Advisory Council to the PM December, 2024.

आहे. याचा अर्थ, या क्षेत्रातही महिलांचा सहभाग कमी आहे (दै. लोकसत्ता/२०२५). थोडक्यात, भारतातील लिंगभाव असमानता, हे वास्तव आहे.

**निष्कर्ष :**

श्रमिक सहभाग दर आणि बेरोजगारीचा दर यामध्ये परस्परसंबंध आहे. साहाजिक लिंगभाव असमानतेवरून महिला बेरोजगारीबाबत अंदाज येतो. सकल देशांतर्गत उत्पादनाच्या (GDP) निकषानुसार शिखरावरील आठ देशांचा म.श्र.द.स.द. ४५% पेक्षा अधिक आहे. याच निकषाबाबत पाचव्या स्थानी असणाऱ्या भारताचा म.श्र.द.स.द. फक्त २८.७% आहे. १९९१ ला लिंगभाव अंतर (GG)२८.८% होते तर २०२३-२४ ला ते ३७.१% एवढे आहे. अर्थात, १९७१ ते १९९१ ची २०२३-२४ या काळाशी तुलना करता लिंगभाव अंतर (GG) वाढल्याचे निदर्शनास येते.

२०१७-१८ ते २०२३-२४ या काळात श्रमिक सहभाग दर, पु.श्र.द.स.द. आणि म.श्र.द.स. दरात अनुक्रमे १०.३%, ३% आणि १८.४% याप्रमाणे वाढ झाली आहे. त्यामुळे २०२३-२४ ला म.श्र.द.स.द. ४१.७% याप्रमाणे वाढलेला दिसतो. पण या वाढीव दरामध्ये बिनपगारी (Unpaid) महिलांचे प्रमाण ७.५% एवढे आहे. बिनपगारी महिलांचे प्रमाण वजा करता प्रत्यक्ष (Actual) म.श्र.द.स.द. ३४.२% एवढा मिळतो. तथापि, प्रत्यक्ष श्रमदरातील लिंगभाव अंतर ४४.३% एवढे आहे.

भारतीय श्रमदलात लिंगभाव समता प्रस्थापित करण्यासाठी सरकारी प्रयत्न अपुरे आहेत. आजही सरकार, राजकीय पक्ष यांची परंपरागत पुरुषप्रधान मानसिकता बदललेली नाही. त्यामुळे देशातील विवेकी, परोपकारी आणि उच्चपदी काम करणाऱ्या स्त्रियांनी, सर्व स्त्रियांना संघटित करण्याचे काम करावे. संघटित लढा उभा करावा. तसेच सरकारनेही महिलांचा श्रमदलातील सहभाग वाढविण्यासाठीचे प्रयत्न चालू ठेवावेत. राजकीय पक्षांना आपली पुरुषप्रधान मानसिकता बदलावी लागेल, असे परिवर्तन घडून आले तर काही प्रमाणात का होईना श्रमदलातील महिलांचा सहभाग वाढण्यास मदत होईल.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


१. Mamorial C. B., Satish Mamoria and S.V. Gankar, 'Dynamics of Industrial Relations', Himalaya Publishing House, Girgaon Mumbai -400004, Page-35.

२. देशपांडे ज्योत्स्ना, 'श्रमाचे अर्थशास्त्र', पिंपळापुरे अँड कं. पब्लिशर्स, नागपूर.

३. Gender Data worldbank.Org.

४. International Labour Organization Statistical Brief 'The impact of Care Responsibilities on Women's Labour Force Particpiation', October, 2024, P-3.

५. Periodic Labour Force Survey (PLFS) July 2023-June2024. Ministry of Statistical and Programme Implementation - 23 Sept. 2024.

६. Ravi Shamiksha and Kapoor Mudit, 'Female Labour Force Particpiation Rate', An Observational Analysis of The Periodic Labour Force Survey (PLFS) from 2017-18 to 2022-23 December, 2024. P-26.

७. धनगारे द.ना. 'संकल्पनांचे विश्व आणि सामाजिक वास्तव', प्रकाशक, अरुण वि. पारगावकर, सदाशिव पेठ, पुणे, (२०२५), पृ. ११२,११४.

८. James Jaimol, 'Decoding Declines: An In-Depth Analysis of India's Labour Force Particpiation Trends' (2013-2023) R.A. P-3368.

९. Desai Meghnad 'A Regional Analysis of Female workforce

particpiation Across Indian States' Oct. 2020, P-3.

१०. Choudhary Soma, State of Women workforce in Corporate Sector with Reference to Gender Inequality In workplace and provision of companies Act, 2013. P-102.

११. Bhalla Surjit and Kaur Ravinder 'Labour Force Particpiation of Women in India', Some facts, some queries' LSE Asia Research Centre, Working papers, July, 2021, P-21.

१२. रेगे-नित्सुरे रूपा, 'जेंडर बजेटिंगचा लेखाजोखा', नवभारत (मासिक) अंक ५,६/फेब्रुवारी-मार्च २०२५, पृ.- २९.

१३. तत्रैव/२०२४ पृ. ५.

१४. www.360 tf trade d gender data worldbank.org.

१५. Bhagoliwal T.N., Economics of Labour and Industrial Relations Sahitya Bhavan Publications, Agra-282003 (2005), Page 626.

१६. फणसे पंकज 'तंत्रज्ञान स्त्रीवादी नाही, कारण'... दैनिक लोकसत्ता, ५ मार्च २०२५, पृ. ७.

१७. पालकर अपूर्वा, 'कृत्रिम बुद्धिमत्ता स्त्रियांच्या वाढत्या सहभागाची गरज', दैनिक लोकसत्ता, २२ मार्च २०२५, पुरवणी, पृ. २.

१८. नागरत्ना बी.व्ही., 'विधी अधिकाऱ्यांमध्ये ३०% महिला आवश्यक', दैनिक लोकसत्ता, १६ मार्च २०२५, पृ. ९.

परिशिष्टे- लेखातील संक्षिप्त रूपातील संज्ञांचे विस्तारित रूप पुढीलप्रमाणे दिले आहे.

पु.श्र.द.स.द. - पुरुष श्रमदल सहभाग दर.

म.श्र.द.स.द. - महिला श्रमदल सहभाग दर.

GG- Gender Gap

FLFPR – Female Labour Force Participation Rate.

◆

## Dr. Ravindra Sabnis Memorial Prize

Marathi Arthshatra Parishad has considered an Endowment Fund for the award, on an annual basis of Dr. Ravindra Sabnis Memorial Prize of Rupees Four Thousand Only for outstanding contribution in form of an article published during the calendar year 2024 in standard accredited journals an themes belonging to the areas of Banking, Industrial Finance and General Industrial Economics.

Last date for Submission of the articles (Four Copies) for this year contest is 30 Augest 2025, For further details, contact the undersigned at this address.

Prof. (Dr.) Vikas Vinayakrao Sukaale
03, Aaryvihaar Apartment,
Tilak Nagar, Vidhyut Nagar Stop,
Shahu Nagrar Side, Nanded. 431602
Cell. 9423345145

# NEP - २०२० ची प्रभावी अंमलबजावणी

**सोनल सुभाषराव डगवार** †

**प्रस्तावना :**

जगात भारताची अर्थव्यवस्था पाचव्या क्रमांकावर आहे. ही अर्थव्यवस्था अधिक सक्षम करण्याचे ध्येय असून, ज्ञानावर आधारित अर्थव्यवस्थेला अधिक महत्त्व आहे. देशाच्या विकासात उच्च शिक्षणाचे सर्वाधिक महत्त्व दिसून आले आहे. त्यामध्ये महाराष्ट्राचा मोठा वाटा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एन.ई.पी.) २०२० तयार केले आहे. हे एकविसाव्या शतकातील जागतिक पातळीवर देशाला ज्ञान महासत्ता बनविणे हे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्ट आहे. या धोरणानुसार बौद्धिक विकास व अध्ययनाच्या तत्त्वावर आधारित अभ्यासक्रम व अध्ययन शाखांची रचना संधी, समानता, समावेशकता आणि दर्जा ही उद्दिष्ट्ये ठेवून भारतीय शिक्षण पद्धतीत अनेक बदल घडवून आणण्याच्या उद्देशाने नवीन शैक्षणिक धोरण तयार करण्यात आले आहे.

राज्यातील शैक्षणिक क्षेत्रात स्वायत्तता आणि उत्कृष्टता वाढविणे, शाळापासून कौशल्य विकास तसेच उच्च आणि तांत्रिक शिक्षणापर्यंतच्या सर्व शैक्षणिक बाबींवर लक्ष केंद्रित करणे, यासाठी कार्यगट स्थापन करण्यात आला आहे. राज्यस्तरावर पूर्वप्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षण संपेपर्यंत यशस्वी २०२० मधील दृष्टिकोनानुसार गुंतवणूक आणि संसाधने हे या मागचे उद्दिष्ट आहे. राज्यात नवीन शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी सुरू करण्यात आली असून, त्याला अधिक गती देण्यासाठी सुकाणू समिती स्थापन करण्यात आली आहे.

राष्ट्रासमोर असणाऱ्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी मनुष्यबळ हे सर्वात महत्त्वपूर्ण संसाधन आहे. याचाच अर्थ, जर राष्ट्रातील नागरिक सक्षम असतील, तर ते राष्ट्र आव्हानांचे रूपांतर संधीमध्ये करू शकते. त्यामुळे राष्ट्रातील नागरिक हे सक्षम बनविणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यासाठीचे एकमेव साधन म्हणजे शिक्षण होय. याच उद्देशाने प्रत्येक राष्ट्र आपले स्वतंत्र असे 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' ठरवत असते.

आपल्या राष्ट्रासमोर बेरोजगारी, पेयजल, भ्रष्टाचार, महागाई, ऊर्जा, पर्यावरण प्रदुषण, वाढते शहरीकरण इत्यादी अनेक समस्या आहेत. या सर्व समस्यांचे मूळ हे कुठेतरी शिक्षणात असलेले आपल्याला दिसून येते.

† संशोधक विद्यार्थिनी, अर्थशास्त्र विभाग, अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ.
आजीव सभासद क्र. : २०६२, भ्रमणध्वनी : ७९७२६९०२३६, ई-मेल- sonaldagwar1989@gmail.com

त्यासाठीच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० ची पायाभरणी करण्यात आलेली आहे. भारतात सर्वात पहिले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९६८ साली, तर दुसरे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ साली राबविण्यात आले. याच धोरणात १९९२ साली काही सुधारणा करण्यात आल्या आणि ते आजतागायत कार्यरत आहे. मागील ३४ वर्षांपासून राष्ट्राच्या शैक्षणिक धोरणामध्ये आमूलाग्र बदल झालेला दिसून येत नाही. याउलट देशाच्या व नागरिकांच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक गरजा मात्र क्रांतिकारी रूपाने बदलत आहेत. त्यातूनच राष्ट्रासमोर अनेक आव्हाने आणि संधी निर्माण होत आहेत. भविष्यातील या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आणि येणाऱ्या संधीचा उपयोग करून घेण्यासाठी राष्ट्रातील नागरिकांना कुशल बनविणे अत्यंत गरजेचे आहे. याबाबी लक्षात घेऊन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२२ ची मांडणी करण्यात आलेली आहे.

डॉ. के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० चा मसुदा तयार करण्यात आला. प्रदीर्घ कालावधीनंतर भारताच्या शैक्षणिक धोरणामध्ये एवढा मोठा आमूलाग्र बदल होताना दिसतो आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० हे मुख्यत: सहा घटकांमध्ये विभागले आहे. १) शालेय शिक्षण २) उच्च शिक्षण ३) भाषा ४) तंत्रज्ञान ५) अर्थविषयक बाबी ६) अंमलबजावणी.

यातील प्रत्येक टप्प्यावर मूलभूत बदल करण्यात आले आहेत. जसे की, शिक्षणाच्या आकृतीबंधामध्ये झालेला बदल, अभ्यासक्रमातील बदल, अध्यापन पद्धतीत अपेक्षिलेले बदल, शिक्षक भरती व पात्रतेविषयीचे बदल आणि शिक्षणप्रक्रियेस तंत्रज्ञानाची जोड इ.

शिक्षण व्यवस्थेतील घटक म्हणून प्रशासन, शिक्षक, विद्यार्थी, पालक, व्यवस्थापन इत्यादींना अनेक बदलांना सामोरे जावे लागणार आहे. अर्थातच नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० हे आपल्यासोबत काही संधी आणि आव्हाने घेऊन आले आहे.

**पार्श्वभूमी**

स्वातंत्र्योत्तर काळात १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानंतर जवळपास ३४ वर्षांनंतर देशाचे चौथे राष्ट्रीय शिक्षण धोरण सादर केले गेले. हे शैक्षणिक धोरण भारताच्या केंद्रस्थानी मानून सर्वांना उच्च दर्जाचे शिक्षण प्रदान करून आपल्या राष्ट्राला सातत्याने न्याय व चैतन्यमय ज्ञानी समाजामध्ये परिवर्तित करण्यात योगदान देण्याची दूरदृष्टी ठेवते. त्यामुळे येणाऱ्या काळात शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल अपेक्षित आहे. या प्रशिक्षणाच्या निमित्ताने शिक्षण प्रणालीतील प्रमुख घटक असलेल्या शिक्षक, अध्यापकाचार्यांनी हे धोरण प्रत्यक्षात येण्याआधी समजून घेणे गरजेचे आहे.

डॉ. के.कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने, पूर्वप्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत तसेच व्यावसायिक शिक्षणापर्यंत विस्तृतपणे अनेक गोष्टींचा विचार करून ४८४ पृष्ठांचा मसुदा आराखडा ३१ मे २०१९ रोजी सादर केला. त्यावर साधकबाधक विचारविनिमय करून सुधारणा सुचविण्यासाठी समाजातील सहभागीदारांना संधी दिली. आलेल्या सूचनांच्या विचाराअंती ६६ पृष्ठांच्या धोरणाच्या दस्तऐवजाला २९ जुलै २०२० रोजी केंद्रीय मंत्रिमंडळाकडून मान्यता मिळाली. यामध्ये एकूण चार विभाग केलेले आहेत :

१) शालेय शिक्षण, २) उच्च शिक्षण, ३) लक्ष्य करावयाचे इतर काही मुद्दे, ४) प्रत्यक्षात धोरण अंमलबजावणी होण्यासाठीच्या बाबी.

उपरोक्त चार विभागांत मांडणी करण्यात आलेल्या धोरणाच्या दस्तऐवजामध्ये शिक्षणात होणाऱ्या बदलांचे एकत्रित प्रतिबिंब पाहावयास मिळते.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -२०२० प्रस्तावनेमध्ये पुढील बाबी नमूद केलेल्या आहेत.**

- शिक्षण अधिक अनुभवात्मक, सर्वसमावेशक, एकात्मिक, जिज्ञासू, संशोधन केंद्रीत लवचिक आणि अर्थातच आनंददायक होण्यासाठी अध्यापनशास्त्र उत्क्रांत होण्याची गरज आहे.
- प्राचीन भारतीय ज्ञान आणि विचारांची समृद्ध परंपरा लक्षात घेऊन हे धोरण तयार करण्यात आले आहे.
- शिक्षण व्यवस्थेतील मूलभूत सुधारणांच्या केंद्रस्थानी शिक्षक असला पाहिजे. नवीन शिक्षण धोरणाने शिक्षकाला सर्व पातळ्यांवर आपल्या समाजातील सर्वात आदरणीय आणि आवश्यक सदस्य म्हणून पुनर्स्थापित करण्यासाठी मदत करणे आवश्यक आहे.
- नवीन शैक्षणिक धोरणाने सर्व विद्यार्थ्यांना, ते कुठेही राहात असले तरीही दर्जेदार शिक्षणव्यवस्था पुरवली पाहिजे आणि उपेक्षित, वंचित व अल्प प्रतिनिधित्व असलेल्या गटांवर विशेष लक्ष केंद्रित केलेले पाहिजे. (१) सर्वांना सहज शिक्षण (२) समता (३) गुणवत्ता (४) परवडणारे शिक्षण (५) उत्तरदायित्व या पाच मूलभूत स्तंभांवर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० आधारित आहे. शालेय शिक्षणाची ५ + ३ + ३ + ४ अशी नवीन रचना असेल आणि प्रत्येक स्तराची गुणवत्ता सुनिश्चित करण्यावर हे धोरण भर देते. कौशल्य शिक्षणास प्रोत्साहन, घोकंपट्टी आधारित शिक्षण कमी करण्यास अभ्यासक्रम व अध्यापनशास्त्रात बदल करणे व त्यासाठी शालेय शिक्षणाचा आराखडा व राष्ट्रीय शिक्षण प्रशिक्षण अभ्यासक्रम आराखडा २००९ मध्ये बदल करण्यात येणार आहे. शालेय शिक्षण, शिक्षक प्रशिक्षण, मूल्यांकन पद्धती, पाठ्यपुस्तके, अध्ययन - अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर यामध्ये या धोरणामुळे होणारे बदल या सर्व बाबींचा अभ्यास या घटकातून आपणास करावयाचा आहे.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० निर्मितीप्रक्रिया**

- **३१ ऑक्टोबर २०१५ :** टी. एस. आर. सुब्रमण्यम यांच्या अध्यक्षतेखाली नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण निश्चिती करण्यासंदर्भात समिती गठीत करण्यात आली.
- **२७ मे २०१७ :** समितीचा पहिला मसुदा सादर करण्यात आला.
- **२४ जून २०१७ :** डॉ. के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली ९ सदस्यीय समिती स्थापन केली.
- **मे २०१९ :** नवीन शैक्षणिक धोरण मसुदा सादरीकरण करण्यात आले.
- **३१ मे २०१९ :** रमेश पोखरीयाल समिती गठीत करण्यात आली. सदर समिती नवीन शैक्षणिक धोरण मसुद्यावर आपली मते नोंदविली आणि त्यानंतर मसुदा प्रक्रियेसाठी चर्चा करण्यात आली.
- **२९ जुलै २०२० :** कॅबिनेटची मान्यता मिळाली.
- **राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० अंमलबजावणी आराखडा :** SARTHAQ भाग १ व भाग २ निर्गमित करण्यात आले (२०२१).

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० वैशिष्ट्ये**

**१) मुक्त शिक्षणप्रणालीचा विचार** (NIOS, SIOS)

सर्व विद्यार्थ्यांकरिता शिक्षणाची सोय उपलब्ध करण्यासाठी, सामाजिक -अर्थिकदृष्ट्या वंचित घटकांवर विशेष भर देवून शालेय शिक्षणाची व्याप्ती मोठ्या प्रमाणात केली जाईल, ज्यामध्ये औपचारिक आणि अनौपचारिक अशा दोन्ही शिक्षण पद्धतींचा समावेश असलेल्या शिक्षणाच्या अनेक मार्गांची सोय असेल. महाविद्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहू न शकणाऱ्या भारतीय मुलांच्या शिक्षणविषयक गरजा पूर्ण करण्यासाठी

नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ओपन स्कूल (NIOS) आणि स्टेट इन्स्टिट्यूट ऑफ ओपन स्कूल (SIOS) यांनी देवू केलेले मुक्त आणि दुरुस्त शिक्षण कार्यक्रम ओपन अँड डिस्टंस लर्निंग (ODL) यामुळे या संस्थांना शैक्षणिक धोरणातून विस्तारित आणि बळकट केली जातील.

**राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा - शालेय शिक्षण**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताचे शैक्षणिक धोरण निर्माण करत असताना स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९४८ साली डॉ. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठातील शिक्षणामध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने एका आयोगाची निर्मिती करण्यात आली. त्यानंतर १९५२ मध्ये मुदलीयार यांच्या अध्यक्षतेखाली भारतातील माध्यमिक शिक्षणामध्ये सुधारणा करण्यासाठी एक आयोग नेमला गेला होता. शिक्षणाचा सर्वांगीण विचार करण्याच्या दृष्टीने डॉ. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली १९६४ ते १९६६ या कालावधीमध्ये एका आयोगाची निर्मिती केली गेली. या आयोगाच्या शिफारसीनुसार १९६८ साली भारताचे पहिले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहीर केले गेले. या धोरणावर आधारित १९७५ मध्ये राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा तयार करण्यात आला. त्यानंतर १९८६ मध्ये जनतेतील विविध हक्काच्या आशा-आकांक्षा लक्षात घेवून आणि त्यानुसार राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहीर केले गेले. या सर्वांचा सारासार विचार करून राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ मध्ये तयार केला गेला. यामध्ये अभ्यासक्रम व अध्ययन पातळीवर नवीन गोष्टी स्वीकारल्या गेल्या. जसे की, ज्ञानरचनावाद. १९८६ ते २००० या कालावधीमध्ये संपूर्ण जगात झालेले एक विशेषत: शिक्षणक्षेत्रात झालेले बदल, समाजाच्या बदलत्या गरजा आणि भारतासमोर निर्माण झालेल्या नवीन समस्या त्याचप्रमाणे तंत्रज्ञानातील आव्हाने सहन करण्याच्यादृष्टीने शिक्षणातही बदल होणे अपेक्षित होते. डॉ. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली एक आयोग नेमून त्या आयोगाच्या शिफारसीनुसार आपले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० निर्माण करण्यात आले.

या धोरणानुसार एकूण चार प्रकारचे राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडे तयार करण्यात येत आहे. १) पायाभूत शिक्षण २) शिक्षक शिक्षण ३) प्रौढ शिक्षण ४) शालेय शिक्षण. राष्ट्रीय पातळीवरील राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, पायाभूत स्तर २०२२. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा - शालेय शिक्षण २०२३ तयार करण्यात आले. या आराखड्याच्या अनुषंगाने राज्य अभ्यासक्रम आराखडा पायाभूत स्तर निर्माण केला गेला असून राज्य अभ्यासक्रम आराखडा, शालेय शिक्षण तयार करण्याचे काम हाती घेतलेले आहे. ते येणाऱ्या काळामध्ये पूर्णत्वाकडे जाईल.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० व व्यवसाय शिक्षण**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० मध्ये आत्मनिर्भर भारताच्या निर्मितीचे स्वप्न यामध्ये शाळा व शिक्षकाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शालेय शिक्षणातून विद्यार्थी भविष्यासाठी तयार होणे आवश्यक आहे. व्यावसायिक शिक्षणाच्या अनुषंगाने तसेच जागतिक स्तरावर विविध क्षेत्रात होणारे नवनवीन बदल व संशोधनाचा विचार करता नव्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी व्यवसाय शिक्षणाची ही काळाची गरज आहे.

माध्यमिक शिक्षणानंतर विद्यार्थ्यांच्या जीवनातील एक महत्त्वाच्या टप्प्याला सुरुवात होत असते. अशा या टप्प्यावर विद्यार्थ्यांना खऱ्या अर्थाने करिअर मार्गदर्शनाची आवश्यकता असते. त्या अनुषंगाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० मध्ये नमूद केलेल्या इयत्ता ६ वी ते ८ वी साठी पूर्व व्यावसायिक शिक्षण व ९ वी

ते १२ वी साठी व्यावसायिक शिक्षण या अनुषंगाने व्यवसाय मार्गदर्शन व मानसशास्त्रीय समुपदेशन ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे.

**व्यावसायिक कौशल्य** (Soft Skills) **संकल्पना व महत्त्व**

संपूर्ण मानवी क्षमतेचा विकास करण्यासाठी, समन्यायी आणि न्याय समाजाच्या विकासासाठी आणि राष्ट्रीय विकासास प्रोत्साहन देण्यासाठी सर्वांना शिक्षण देणे अतिशय आवश्यक आहे. भारत हा जगात तरुण लोकसंख्येचा देश असून या तरुणांना उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे, त्यांच्या क्षमतेचा विकास करणे यावर भारताचे भविष्य अवलंबून आहे. ही संधी उपलब्ध करून देण्यासाठी शाश्वत विकासाच्या कार्य आराखड्यातील एस.डी.जी. - ४ नुसार २०३० पर्यंत सर्वांसाठी सर्वसमावेशक आणि समन्यायी गुणवत्तेचे शिक्षण आणि निरंतर शिक्षणाच्या संधीला चालना देणे या ध्येयाचा नवीन शैक्षणिक धोरणमध्ये प्रकर्षाने स्वीकार केला आहे.

**व्यावहारिक कौशल्याचे महत्त्व**

नवीन शैक्षणिक धोरणातील २३३ व्या टास्कअन्वये विद्यार्थ्यांमध्ये यशस्वी उद्योजक होण्यासाठी व्यावहारिक




कौशल्य आत्मसात करण्यासाठी त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी त्यांना प्रशिक्षित करावे असे नमूद केले आहे.

व्यावहारिक कौशल्यात खालील कौशल्याचा समावेश होतो.

**संवाद कौशल्य**

याला इंग्रजीमध्ये कम्युनिकेशन असे म्हणतात. याचा उगम लॅटिन भाषेतून झालेला असल्याने कम्युनिकेशन म्हणजेच टू - शेअर. चांगला संवाद साधणे हे एक जीवनकौशल्य आहे. स्पष्ट आणि संक्षिप्त व योग्य संवाद साधता येणे ही सुंदर कार्य करण्यासाठी महत्त्वपूर्ण बाब आहे आणि या बाबीचा विचार करूनच शैक्षणिक धोरण - २०२० मध्ये प्रामुख्याने शिक्षण क्षेत्रामध्ये भर देण्यात आलेला आहे.

**स्वअध्यापन**

स्वअध्यापन कौशल्य हे व्यवसाय किंवा नोकरी करतानाच उपयोगात येत नाही, तर मानवी जीवन जगत असताना अतिशय महत्त्वपूर्ण कार्य करते. स्वत:च्या भावभावना, व्यवहार, विचार व वागणे यावर विविध परिस्थितीमध्ये नियंत्रण ठेवता येणे यालाच स्वअध्ययन असे म्हणतात. शैक्षणिक धोरण अंमलबजावणी करताना स्वव्यवस्थापन या घटकाचा फार उपयोग झालेला दिसून येतो.

**माहिती संप्रेषण व तंत्रज्ञान**

ज्ञानाच्या क्षेत्रात होणारे बदल स्वीकारण्याची क्षमता निर्माण होते. माहिती मोठ्या प्रमाणात संकलित करून त्यावर प्रक्रिया करणे शक्य होते. मोठ्या प्रमाणात माहिती प्राप्त करणे ही या तंत्रज्ञानामुळे सहज आणि सोपी पद्धत या शैक्षणिक धोरणामध्ये नमूद केल्यामुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये त्याचप्रमाणे शिक्षकांना आपले ज्ञान विद्यार्थ्यांना देण्याकरिता एक समाधानाची पातळी प्राप्त होते.

**उद्योजकता**

आजच्या युगात भारतात मोठ्या प्रमाणात वापरले जाणारे शब्द म्हणजे उद्योजकता आहे. लोकांच्या गरजाची पूर्तता करण्यासाठी व स्वत:च्या प्रगतीसाठी स्वयंरोजगाराची निर्मिती करणे म्हणजे उद्योजकता होय. उद्योजकतामध्ये पुढील गुणवैशिष्ट्ये दिसून येतात. नवीन कल्पना शोधक, संयमी, आत्मविश्वास, वेगवेगळ्या पद्धतीने विचार करणारे, मेहनत करणारे व स्वत:ची जबाबदारी ओळखणारे व घेणारे अशा या उद्योजकीय कौशल्याचा समावेश NEP २०२० च्या प्रभावी अंमलबजावणी करताना राष्ट्रीय धोरणात महत्त्वाची भूमिका स्पष्ट करते.

**राष्ट्रीय शिक्षण धोरण - २०२० शी सुसंगती आणि निष्कर्ष**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (NEP 2020) चे उद्दिष्ट शालेय आणि उच्च शिक्षण या दोन्ही क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर, परिर्वतनात्मक सुधारणासाठी मार्ग तयार करणे आहे. NEP 2020 हे एकविसाव्या शतकातील पहिले शैक्षणिक धोरण आहे. हे धोरण शाश्वत विकासासाठी २०३० च्या अजेंडाशी समरूप आहे आणि पूर्वप्राथमिक शिक्षण ते महाविद्यालयीन शिक्षण अधिक समग्र, लवचचिक आणि बहुविद्याशाखीय, एकविसाव्या शतकातील गरजांना अनुकूल बनवून आणि प्रत्येकाच्या विद्यार्थ्याच्या अद्वितीय क्षमतांना समोर आणण्याचा त्यांचा उद्देश आहे. शिक्षण आणि तंत्रज्ञानाचा संबंध द्वी-दिशात्मक आहे. NEP - 2020 मध्ये विविध तांत्रिक बाबींची शिफारस करते.

सर्वांसाठी उच्च गुणवत्तेच्या शिक्षणात समान आणि सार्वत्रिक प्रवेशाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी, NEP 2020 ने विविध मूलभूत तत्त्वे मांडली आहेत. या मूलभूत तत्त्वांपैकी एक म्हणजे अध्यापन आणि शिक्षणामध्ये तंत्रज्ञानाचा व्यापक वापर शिक्षणामध्ये तंत्रज्ञानाचा वापर सर्व स्तरांवर शिक्षणात एकात्मतेच्या मर्यादेपर्यंत वाढवणे होय. शिक्षणाची सुसंगत आणि लवचिक प्रणाली तयार करण्यासाठी NEP 2020 मध्ये रेखाटलेली दृष्टी भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने (MoE) पूर्ण करण्याचे ध्येय म्हणून हाती घेतले आहे आणि MoE च्या तत्त्वाखाली CIET - NCERT संस्था मिशन प्रत्यक्षात आणण्यासाठी सर्वतोपरी प्रत्यत्न करीत आहे. मिशन प्रत्यक्षात आणण्यासाठी, CIET - NCERT त्याच्या स्थापनेपासून विविध तंत्राचा समावेश असलेले शैक्षणिक प्रशिक्षण आणि संसाधनांचा विकास, संशोधन आणि विस्तारामध्ये गुंतलेले आहे. CIET - NCERT संस्था तंत्रज्ञानाच्या जगात तसेच शैक्षणिक क्षेत्रातील प्रगतीच्या अनुषंगाने विविध संसाधने विकसित करीत आहे.

NCERT, नवी दिल्ली ही शिक्षणक्षेत्रातील सर्वोच्च संस्था आहे. ज्याला विविधतेने परिपूर्ण असलेल्या

देशाच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी जबाबदारी शिक्षण मंत्रालय, भारत सरकारने सोपविली आहे. देशातील विविधता केवळ भौगोलिक, सांस्कृतिक आणि भाषिक यापुरती मर्यादित नाही तर सामाजिक - लोकसंख्येबाबतच्या आव्हानांनाही सामोरे जावे लागते. म्हणून, देशाच्या शैक्षणिक गरजांसाठी विविध प्रकारच्या तांत्रिक हस्तक्षेपांची आवश्यकता आहे.

युनोने २०१५ मध्ये मांडलेल्या शाश्वत विकास ध्येयांपैकी (SDGs) ध्येय क्र. ४ मध्ये परिणामकारक निष्पत्ती गाठण्यासाठी भारताने राष्ट्रीय शिक्षण धोरणात विशेष लक्ष दिले आहे. २०३० पर्यंत 'जागतिक शिक्षण विकास कृतिकार्यक्रम' यशस्वी करण्यासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करून आजीवन शिक्षण देणे महत्त्वाचे आहे. यासाठी देशातील सर्व स्तरावरील शिक्षणप्रणालीची पुनर्रचना करून आपल्या शिक्षणसंस्थांचा अभ्यासक्रम, आशय, शिक्षणाच्या पद्धतीद्वारे मूलभूत कर्तव्ये, घटनात्मक मूल्यांची रुजवणूक, पर्यावरण संरक्षण तसेच स्वजाणीव अशा बदलत्या जगातील स्वतःच्या भूमिका व जबाबदाऱ्या ओळखण्याचा मार्ग म्हणजे शाश्वत विकास ध्येयांची जाणीवजागृती. शाश्वत विकास ध्येयांद्वारे मानवी हक्क, जीवनमान उंचावणे, लिंग समानता तसेच सर्व स्तरावरील असमानता दूर करून जबाबदारीपूर्ण बांधिलकीचे ज्ञान, कौशल्ये, मूल्ये, स्वभाव विकसित करणे. जेणेकरून प्रत्येक विद्यार्थी हा वैश्विक नागरिक बनेल.

**संदर्भ ग्रंथ सूची:**

१. कपोली अरविंद लो., पंडीत ब. बि., (२००६), कृतिसंशोधन व नवोपक्रम, निराली प्रकाशन, पुणे.
२. जगताप ह. ना., (१९९७), प्रगत शैक्षणिक तंत्रविज्ञान, नूतन प्रकाशन, पुणे.
३. टेली कॉन्फरन्स प्रशिक्षण, प्राथमिक शिक्षण स्तरावरील कृतिसंशोधन (SCERT) रूना ग्राफिक्स, पुणे.
४. दैनिक लोकसत्ता :- शिक्षण क्षेत्रातील महासत्ता होण्यासाठी दिनांक ११ फेब्रुवारी २०२५, पान क्रमांक ६.
५. पंडित ब. बि., (१९९५), शैक्षणिक कृतिसंशोधन - टेली कॉन्फरन्सद्वारा प्रशिक्षण पुस्तिका, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
६. मुळे संदीप, (२०१२), शैक्षणिक संशोधनाची ओळख, इन्साइट पब्लिकेशन, नाशिक.
७. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० ची राष्ट्रीय शिक्षण धोरण मराठी आवृत्ती.

◆

शेती हा आमच्या सगळ्यांच्या बुद्धीचा प्रयत्न आहे. कारण अखेरीज ती खरी संपत्ती, चांगली नैतिकता आणि आनंदी बनवते.

**- थॉमस जेफर्सन**

# महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासात नाबार्डने केलेल्या कामगिरीचा अभ्यास

**जयश्री पंढरीनाथ जाधव** †
**निलेश भगवान महाजन** ††

**प्रस्तावना :**

ग्रामीण विकास हा भारताच्या समग्र विकासाचा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. भारतातील बहुसंख्य लोकसंख्या ग्रामीण भागात राहाते आणि ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास केल्याशिवाय देशाच्या एकूण प्रगतीची कल्पनाही असंभव आहे. ग्रामीण भागात मुख्यतः कृषी, कृषिपूरक व्यवसाय, अन्नधान्य उत्पादन, पशुपालन आणि लघुउद्योगांवर आधारित अर्थव्यवस्था असते. त्यामुळे ग्रामीण भागाच्या विकासाला केवळ अर्थव्यवस्थेचाच नाही, तर सामाजिक, सांस्कृतिक आणि पर्यावरणीय दृष्टीनेही महत्त्व आहे. ग्रामीण विकासामध्ये नाबार्डचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. 'सामाजिक न्यायासह विकास' हे स्वातंत्र्यानंतर भारतातील विकास नियोजनाचे मूळ उद्दिष्ट आहे. नियोजनबद्ध विकासाच्या सुरुवातीपासून सरकारने पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून ग्रामीण भारताच्या विकासात लक्षणीय प्रगती केली. राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँकेची (नाबार्ड) स्थापना १२ जुलै १९८२ मध्ये झाली. नाबार्ड ही देशातील ग्रामीण बँकिंग प्रणालीतील मुख्य नियामक संस्था आहे आणि ती भारत सरकारची स्थापना आणि मालकीची सर्वोच्च विकास वित्तसंस्था मानली जाते. या बँकेचे उद्दिष्ट ग्रामीण भागाचे नियमन आणि पतपुरवठा करणे, कृषी, लघुउद्योग, कुटीरउद्योग, ग्रामोद्योग, हस्तद्योग व इतर ग्रामीण अर्थव्यवस्थांना वित्तपुरवठा होण्याच्या उद्देशाने पतनियोजन करणे हे आहे. नाबार्डचे मुख्यालय मुंबई, महाराष्ट्र येथे आहे. नाबार्डचे प्रारंभिक भांडवल १०० कोटी रुपये होते. आज नाबार्डची संपूर्ण मालकी भारत सरकारकडे आहे. ३१ मार्च २०२२ रोजी १७,०८० कोटी रुपये भांडवल होते.

महाराष्ट्र हे भारतातील समृद्ध नैसर्गिक संसाधनांसह संपन्न असे सर्वात औद्योगिक आणि दुसऱ्या क्रमांकाचे लोकसंख्या असलेले राज्य आहे. महाराष्ट्र भौगोलिक क्षेत्राच्याबाबतीत तिसरे मोठे राज्य आहे. महाराष्ट्र हे भारतातील एक उच्च औद्योगिक राज्य असले तरी शेती हा राज्याचा मुख्य व्यवसाय आहे. राज्यातील निम्म्याहून अधिक ग्रामीण लोकसंख्या त्यांच्या उदरनिर्वाहासाठी

† सहाय्यक प्राध्यापक व संशोधक मार्गदर्शक, अर्थशास्त्र विभाग, के.आर.टी. कला, बी.एच.वाणिज्य आणि ए.एम. विज्ञान (के.टी.एच.एम.) महाविद्यालय नाशिक.
आजीव सभासद क्र. १७३३, भ्रमणध्वनी : ९८८१९३८८५८, ईमेल : jayashrijadhav@kthmcollege.ac.in
†† संशोधक विद्यार्थी, सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे.
आजीव सभासद क्र. २०३३, भ्रमणध्वनी : ८१४९३६२९०५, ईमेल : nilesh.mahajan20@gmail.com

कृषी आणि कृषिसंलग्न व्यवसायावर अवलंबून आहे. महाराष्ट्राच्या उत्पन्नात कृषिक्षेत्राचा वाटा कमी दिसून येत असला, तरी रोजगारामध्ये वाटा सर्वात जास्त आहे. उत्पन्नात वाढ होण्यासाठी कृषिक्षेत्राचा विकास होणे आवश्यक आहे. नाबार्ड महाराष्ट्राच्या विकासात, विशेषतः कृषी, ग्रामीण पायाभूत सुविधा आणि आर्थिक समावेशन क्षेत्रात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. राज्याच्या विकासात नाबार्डचे प्रमुख योगदान आहे.

बीजशब्द : नाबार्ड, ग्रामीण विकास, पतपुरवठा, उपक्रम.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

अ) महाराष्ट्रातील ग्रामीण विकासातील नाबार्डमार्फत केलेल्या कार्याचा अभ्यास करणे.

ब) महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यात नाबार्डमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचा आढावा घेणे.

क) महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासात नाबार्डने केलेल्या कामगिरीचा आढावा घेणे.

**गृहीतके :**

अ) महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासासाठी नाबार्डमार्फत आर्थिक साहाय्य दिले जाते.

ब) नाबार्डमार्फत महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात विविध उपक्रम राबविले जातात.

**संशोधन पद्धती :**

संशोधनासाठी लागणारी माहिती मिळविण्यासाठी द्वितीय सामग्रीचा आधार घेऊन माहितीचे तथ्यसंकलन करण्यात आले आहे. यामध्ये संदर्भ पुस्तके, नाबार्डचे वार्षिक रिपोर्ट, प्रकाशित प्रबंध, मासिके, साप्ताहिके, दैनिक वर्तमानपत्रे, प्रत्यक्ष निरीक्षणे आणि संकेतस्थळांचा वापर करण्यात आलेला आहे.

**अभ्यासविषयाची मांडणी / स्पष्टीकरण :**

महाराष्ट्राच्या विकासात विशेषतः शेती, ग्रामीण पायाभूत सुविधा आणि सूक्ष्मवित्त क्षेत्रात नाबार्ड महत्त्वाची भूमिका बजावते. महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासात नाबार्डद्वारे विविध उपक्रमांसाठी करण्यात आलेले आर्थिक साहाय्य पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**अ. कर्जपुरवठा :**

नाबार्डने महाराष्ट्रात केलेल्या कर्जवाटपात सुरुवातीच्या वर्षात (१९८२-८३) १२३ कोटी रुपयांवरून २०२१-२२ मध्ये २८,३५५.१६ कोटी रुपयांपर्यंत वाढ झाली आहे. ३१ मार्च २०२२ पर्यंत नाबार्डने राज्याच्या विकासासाठी २,११,३५५ कोटी रुपयांहून अधिक निधी वितरित केला आहे. २०२१-२२ मध्ये महाराष्ट्रात नाबार्डने एकूण ४,७०८.१८ कोटी रुपयांचे अल्पकालीन पुनर्वित्त केले. २०२१-२२ मध्ये महाराष्ट्रातील वित्तीय संस्थांना १९,५९७.६५ कोटी रुपयांचे दीर्घकालीन पुनर्वित्त देण्यात आले.

**ब. ग्रामीण पायाभूत सुविधा विकास :**

नाबार्ड ग्रामीण रस्ते, पूल, पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि विद्युतीकरण सिंचन, रस्ते आणि पूल यांसारख्या सार्वजनिक क्षेत्रातील प्रकल्पांना पाठिंबा देण्यासाठी ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधी (RIDF) मधून कर्ज प्रदान करते. २०२१-२२ दरम्यान, महाराष्ट्रात ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधीअंतर्गत १,३६४.६९ कोटी रुपये २२,५३४ प्रकल्पांमध्ये वितरित करण्यात आले. सध्या विविध क्षेत्रांतर्गत २६७७ प्रकल्प मंजूर करण्यात आले आहेत आणि हे अंमलबजावणीच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर आहेत.

**क. सूक्ष्मवित्त आणि स्वयं-मदत गट (SHGs):-**

नाबार्ड स्वयं-मदत गटांच्या निर्मिती आणि बळकटीकरणाला प्रोत्साहन देते आणि त्यांना सूक्ष्मवित्त सहाय्य प्रदान करते. तसेच महिला आणि उपेक्षित समुदायांना सक्षम बनवते आणि तळागाळात सामाजिक आणि आर्थिक विकासाला चालना देते. महाराष्ट्रात १३.३४ लाख स्वयंसहाय्यता गट आहेत, ज्यांची बचत २,७४२.७६ कोटी रुपये आहे. महाराष्ट्रात ६,६५५ सहभागींना समाविष्ट करणारे १५३ प्रशिक्षण कार्यक्रम आणि २०,५३६ स्वयंसहाय्यता गट सदस्यांना समाविष्ट करणारे १५३२ गावपातळीवरील कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

**ड. पायाभूत सुविधा विकास सहाय्य :**

नाबार्डचा व्यवसाय उपक्रम विभाग महाराष्ट्रातील पायाभूत सुविधा प्रकल्पांना पाठिंबा देण्यासाठी पायाभूत सुविधा विकास सहाय्य (NIDA) प्रदान करतो. महाराष्ट्रात पायाभूत सुविधा विकास सहाय्यअंतर्गत २०१८-१९ मध्ये बळीराजा जलसंजीवनी योजना या योजनेच्या ९१ प्रकल्पांपैकी ६८ प्रकल्प पूर्ण करण्यासाठी ६,६५५.०० कोटी रुपयांचे एकूण मुदत कर्जमंजूर करण्यात आले. ३१ मार्च २०२२ रोजीपर्यंत ३,२८५.६९ कोटी रुपयांचे कर्ज वितरित करण्यात आले.

**इ. दुग्धप्रक्रिया आणि पायाभूत सुविधा विकास निधी (DIDF) :**

महाराष्ट्रामध्ये पुणे दूध संघ (५९.५१ कोटी रुपये), गोदावरी खोरे दूध संघ (४१.५८ कोटी रुपये) आणि पंचमहल जिल्हा सहकारी दूध संघ (१५५.२६ कोटी रुपये) असे एकूण २५६.३५ कोटी रुपये मंजूर करण्यात आले. ३१ मार्च २०२२ पर्यंत महाराष्ट्रात राष्ट्रीय दुग्धविकास मंडळामार्फत १४०.४० कोटी रुपयांचे मुदत कर्ज वितरित करण्यात आले आहे.

**ई. पाणलोट विकास कार्यक्रम (WDP) :**

नाबार्डने महाराष्ट्रात इंडो-जर्मन पाणलोट विकास कार्यक्रम, राष्ट्रीय पाणलोट कार्यक्रम आणि पाणलोट विकास निधीकार्यक्रमांतर्गत ३६१ पाणलोट विकास प्रकल्प राबवले आहेत, ज्यामुळे ४.५२ लाख हेक्टर क्षेत्रात जलसंपत्ती विकास वाढला आहे. राज्यातील १६ जिल्ह्यांमध्ये ५० पाणलोट प्रकल्प सुरू असून पाणलोट विकास निधीमधून एकूण ३५,९६६.५० लाख रुपयांचे अनुदान देण्यात आले आहे, ज्याचा फायदा ३१ मार्च २०२२ पर्यंत ३.०४ लाख कुटुंबांना झाला आहे.२०२१-२२ दरम्यान अहमदनगर, बीड, परभणी, सोलापूर, अकोला आणि नाशिक जिल्ह्यांमध्ये पाणलोट विकास निधीअंतर्गत ८ नवीन पाणलोट प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली. याशिवाय नाबार्डने महाराष्ट्रातील पाणलोट प्रकल्पांमध्ये राबविण्यात येणाऱ्या शाश्वत विकास योजनेअंतर्गत १३,९२२ कुटुंबांना लाभ देणाऱ्या ६० प्रकल्पांना मंजुरी दिली आहे.

**उ. आदिवासी विकास उपक्रम :**

आदिवासी कुटुंबांसाठी शाश्वत उपजीविकेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांचे त्रासदायक स्थलांतर कमी करण्यासाठी आदिवासी विकास निधीची निर्मिती करण्यात आली. महाराष्ट्रात नाबार्डने आतापर्यंत ५५ आदिवासी विकास प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. ३१ मार्च २०२२ पर्यंत राज्यातील ८ जिल्ह्यांमध्ये १५ प्रकल्प सुरू आहेत, ज्यांचे एकूण अनुदान १८४.६४ कोटी रुपये आहे आणि १५२.३६ कोटी रुपये वाटप करण्यात आले आहेत. ४७,७९७ कुटुंबांना आदिवासी विकास निधी प्रकल्पांतर्गत समाविष्ट करण्यात आले आहे आणि वाड्यांखालील एकूण क्षेत्र सुमारे ४३,४७८ एकर आहे.

**ऊ. शेतकरी उत्पादक संघटना :**

महाराष्ट्रातील नाबार्डने आतापर्यंत राज्यात ४२० शेतकरी उत्पादक संघटनांच्या विकासाला पाठिंबा दिला आहे, ज्यापैकी २०२१-२२ दरम्यान १२० शेतकरी उत्पादक संघटनांला उत्पादन निधीअंतर्गत २६.६७ लाख रुपये अनुदान सहाय्य देऊन प्रोत्साहन देण्यात आले आहे. उत्पादक संघटना विकास निधी-व्याज भिन्नता अंतर्गत २०२१-२२ मध्ये महाराष्ट्रात २२ शेतकरी उत्पादक संघटनांना १९२.४० लाख रुपये अनुदान सहाय्य मंजूर करण्यात आले.

**ए. शेतीबाह्य विकास :**

२०२१-२२ या वर्षात नाबार्डने राज्यात भौगोलिक संकेत (Gl), कौशल्य विकास कार्यक्रम, शेती उत्पादक संघटना आणि बाजारपेठ पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी प्रोत्साहनात्मक सहाय्यासाठी १३७.२५ लाख रुपये मंजूर केले. कौशल्य विकास कार्यक्रमाअंतर्गत नाबार्डने २०२१-२२ मध्ये चंद्रपूर जिल्ह्यात २०० सहभागींना सामान्य सौंदर्य सहाय्यक (४० लोक), सहाय्यक इलेक्ट्रिशियन (४० लोक), CNC ऑपरेटर (४०लोक) आणि निःशस्त्र सुरक्षारक्षक (८० लोक) म्हणून प्रशिक्षण देण्यासाठी २४.९२ लाख रुपये मंजूर केले.

मार्केटिंग उपक्रमांचा एक भाग म्हणून नाबार्डने २०२१-२२ दरम्यान अनुक्रमे गोंदिया आणि नागपूर येथे एक राज्य आणि जिल्हास्तरीय प्रदर्शन आयोजित केले. २०२१-२२ या वर्षात प्रदर्शनांसाठी एकूण २३.०५ लाख रुपये अनुदान देण्यात आले. ग्रामीण उत्पादनांच्या विपणनाच्या संधींचा विस्तार करण्यासाठी तीन ग्रामीण हाट (गावांमध्ये होणारी नियमित बाजारपेठ) बांधण्यासाठी ४५.९६ लाख रुपये मंजूर करण्यात आले आणि ग्रामीण मार्ट (ग्रामीण भागात उत्पादने विकण्यासाठी एक योजना) योजनेअंतर्गत तीन मोबाईल व्हॅनसाठी १४.२८ लाख रुपये मंजूर करण्यात आले.

थोडक्यात, महाराष्ट्रात नाबार्डचे आर्थिक सहाय्य आणि उपक्रम राज्यातील कृषी उत्पादकता, ग्रामीण उपजीविका, पायाभूत सुविधा आणि एकूण ग्रामीण विकास सुधारण्यात महत्त्वपूर्ण योगदान देतात.

**नाबार्डमार्फत घेण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांमधील काही जिल्ह्यानिहाय यशस्वी गाथा :**

**१. हिंगोली जिल्हा :** एकात्मिक दृष्टिकोनातून बागायती लागवडीचा वाडी-आधारित विकास उपक्रम.

**लाभार्थी :** हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ ब्लॉकमधील ६ गावांमधील ५५० आदिवासी कुटुंबे.

**उपक्रम कार्य व परिणाम :** आंबा, चिकू, पेरू इत्यादींच्या वाडी-आधारित लागवडीसाठी आदिवासी विकास निधीअंतर्गत नाबार्डकडून २१७ लाख रुपयांचे अनुदान सहाय्य, सिंचनासाठी जलस्रोतांचा विकास, बागायती उत्पादनांचे एकत्रीकरण आणि विपणन सुनिश्चित करण्यासाठी शेतकरी उत्पादक संघटना स्थापन करण्यासाठी अतिरिक्त अनुदान सहाय्य इत्यादी विविध कार्य नाबार्डमार्फत करण्यात आले. त्यामुळे बागायती उत्पादनांच्या विक्रीतून निश्चित उत्पन्न, आंतरपिकांद्वारे अतिरिक्त उत्पन्न, शेती उत्पादनांसाठी उच्च मोबदला सुनिश्चित करण्यासाठी शेतकरी उत्पादक संघटनांसारख्या प्लॅटफॉर्मची उपलब्धता, स्थलांतरात लक्षणीय घट, भूमिहीन कुटुंबांसाठी लहान उत्पन्ननिर्मिती उपक्रमांची स्थापना असे विविध परिणाम या जिल्ह्यासंदर्भात दिसून आले.

**२. नंदुरबार जिल्हा :** स्वयं-मदत गटांद्वारे (SHGs) समुदाय-व्यवस्थापित शेळीपालन उद्योगावर उपजीविका आणि उपक्रम विकास कार्यक्रम.

**लाभार्थी :** नंदुरबार जिल्ह्यातील तळोदा ब्लॉकमधील ५ गावांमध्ये पसरलेल्या नाबार्डच्या महिला बचत गट प्रकल्पातील १५० आदिवासी महिला सदस्य.

**उपक्रम कार्य व परिणाम :** नाबार्डकडून ५.३२ लाख रुपयांचे अनुदान, स्वयंसेवा गट सदस्यांमध्ये उपजीविका आणि उपक्रम विकास कार्यक्रमद्वारे वैज्ञानिक शेळीपालन परिसंस्था निर्माण करणे, वैज्ञानिक शेळीपालनाचे व्यापक प्रशिक्षण, व्यावसायिक शेळीपालन फार्मना प्रत्यक्ष भेटी, भूमिहीन आदिवासी लाभार्थ्यांसह मॉडेल डेमो शेडची स्थापना, लाभार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी पाच पशु सखींचे प्रशिक्षण, स्टेट बँक ऑफ इंडिया आणि एनएबीएफआयएनएस (नाबार्ड उपकंपनी) द्वारे वैज्ञानिक शेळीपालन शेड उभारण्यासाठी क्रेडिट लिंकेज इत्यादी विविध कार्य नाबार्डमार्फत करण्यात आले. त्यामुळे संभाव्य फायदेशीर उपजीविकेचा व्यवसाय म्हणून शेळीपालनाची स्वीकारार्हता सुधारली, मॉडेल डेमो शेडद्वारे शेळीपालनासाठी वैज्ञानिक शेडचे महत्त्व दाखवले, चांगल्या फॉरवर्ड लिंकेजसाठी आदिवासी विकास निधीप्रकल्पांतर्गत लाभार्थ्यांचे शेतकरी उत्पादक संघटनासह एकत्रीकरण प्रोत्साहन दिले, असे विविध परिणाम या जिल्ह्यासंदर्भात दिसून आले.

**३. सांगली जिल्हा :** दुग्धव्यवसाय आणि तंत्रज्ञानाचे संयोजन उपक्रम - उत्कृष्ट दुग्धव्यवसाय पद्धतींसाठी क्षमता बांधणी तंत्रज्ञान कार्यक्रमांतर्गत जोडप्या शेतकऱ्यांना प्रशिक्षण देणे.

**लाभार्थी :** सांगली जिल्ह्यातील ७,००० शेतकरी.

**उपक्रम कार्य व परिणाम :** चितळे डेअरीच्या सहकार्याने पूर्व-प्रशिक्षण जागरुकता शिबिरे आयोजित करणे, तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यासाठी क्षमता बांधणीअंतर्गत वर्गप्रशिक्षण आणि क्षेत्रभेटींसाठी शेतकऱ्यांना एकत्र करणे, प्रगतीचे निरीक्षण करण्यासाठी

शेतकऱ्यांना वेळोवेळी भेट देणे इत्यादी विविध कार्य नाबार्डमार्फत करण्यात आले. त्यामुळे प्रशिक्षित शेतकऱ्यांच्या दुग्धव्यवसायासाठी बँक वित्तपुरवठा, तुजारपूर गावातील (वाळवा ब्लॉक) १२४ जोडप्या शेतकऱ्यांनी प्रशिक्षण घेतले आहे, अग्रणी बँकेद्वारे गायी/म्हशींसाठी कर्ज मर्यादा १ लाख रुपयांपर्यंत वाढवणे, दूध उत्पादन आणि उत्पादकतेत वाढ, बँक देणींची परतफेड सुधारणे असे विविध परिणाम या जिल्ह्यासंदर्भात दिसून आले.

**४. सिंधुदुर्ग :** महिला बचत गटांमध्ये उद्योजकतेला प्रोत्साहन उपक्रम.

**लाभार्थी :** माहेर लोकसंचलित साधना केंद्राच्या स्वयंसहाय्यता गटांचे सदस्य आणि महाराष्ट्रातील सावंतवाडीतून जाणारे रेल्वे प्रवासी.

**उपक्रम कार्य व परिणाम :** नाबार्डने लुपिन ह्युमन वेल्फेअर अँड रिसर्च फाउंडेशनला उपजीविका आणि उपक्रम विकास कार्यक्रमावर पायलट प्रोजेक्ट राबविण्यासाठी ६.२३ लाख रुपयांचे अनुदान सहाय्य मंजूर केले, माहेर लोकसंचलित साधना केंद्राच्या ३० स्वयंसेवी गट महिला सदस्यांना आयआरसीटीसीला पॅकेज केलेले अन्न पुरवण्यासाठी निवडण्यात आले इत्यादी विविध कार्य नाबार्डमार्फत करण्यात आले. त्यामुळे आयआरसीटीसीच्या प्रवाशांना 'फूड ऑन ट्रॅक' या ई-केटरिंग कार्यक्रमाद्वारे स्वादिष्ट मालवणी जेवण दिले जाते, अन्नपदार्थांना स्थानिक पातळीवर मोठी मागणी, आर्थिक आणि आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र स्वयंसहाय्यता गट सदस्य असे विविध परिणाम या जिल्ह्यासंदर्भात दिसून आले.

**५. पुणे :** विदेशी भाज्यांची व्यावसायिक लागवड उपक्रम.

**लाभार्थी :** पुणे जिल्ह्यातील माण गावातील शेतकरी.

**उपक्रम कार्य व परिणाम :** गावात शेतकरी क्लब स्थापन करण्यास नाबार्डने पाठिंबा दिला, तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यासाठी क्षमता-निर्मिती समर्थन देण्यात आले, बँकिंग प्रणालीद्वारे कर्जसुविधा देण्यात आली, बाजारातील गतिशीलता आणि विपणन धोरणाबद्दल जागरूकता निर्माण करण्यात आली इत्यादी विविध कार्य नाबार्डमार्फत करण्यात आले. त्यामुळे पॉलीहाऊसमध्ये विदेशी भाज्यांच्या लागवडीत वाढ, थेट विक्रीतून दररोज २००० रुपयांपर्यंत उत्पन्न, राष्ट्रीय स्तरावर केलेल्या प्रयत्नांसाठी क्लबच्या मुख्य समन्वयकांचा सत्कार असे विविध परिणाम या जिल्ह्यासंदर्भात दिसून आले.

**६. पुणे :** जलशुद्धीकरण प्रकल्पाची स्थापना.

**लाभार्थी :** पुणे जिल्ह्यातील ठिकेकरवाडी येथील ग्रामस्थ.

**उपक्रम कार्य व परिणाम :** नाबार्डने ८ लाख रुपयांचे अनुदान दिले आणि वॉटरलाइफ फाउंडेशनच्या भागीदारीत एक स्वयंपूर्ण आरओ पाणी शुद्धीकरण प्रकल्प उभारण्यास मदत केली इत्यादी विविध कार्य नाबार्डमार्फत करण्यात आले. त्यामुळे गावकऱ्यांना प्रति २० लिटर ५ रुपये दराने शुद्ध पाणी, शाळांमध्ये १०० टक्के उपस्थिती, केवळ वैद्यकीय खर्चावर दरमहा २००० रुपयांपर्यंत घरगुती बचत, विकास योजनांमध्ये महिलांच्या सहभागात सुधारणा असे विविध परिणाम या जिल्ह्यासंदर्भात दिसून आले.

**७. कोल्हापूर :** ऊस लागवडीसाठी ठिबक सिंचन प्रणालीची ओळख.

**लाभार्थी :** कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळमधील १६,००० शेतकरी.

**उपक्रम कार्य व परिणाम :** उसाच्या शेतात ठिबक सिंचन प्रणाली बसविण्यासाठी नाबार्डने दत्त शेतकरी सहकारी साखर कारखाना लिमिटेडला १८० लाख रुपयांचे कर्ज मंजूर केले, क्षमता-निर्मिती कार्यशाळांमध्ये ठिबक सिंचनामुळे पाण्याचा वापर सुमारे ५० टक्क्यांनी कसा कमी करता येईल यावर भर देण्यात आला, योग्य वापरामुळे ठिबक उत्पादकांना थेट पैसे दिले जातील याची खात्री करण्यात आली इत्यादी विविध कार्य नाबार्डमार्फत करण्यात आले. त्यामुळे ठिबक सिंचन

आणि शाश्वत ऊस उपक्रमाचा अवलंब केल्यानंतर लागवडीच्या खर्चात लक्षणीय घट, ऊस लागवडीसाठी पाण्याची आवश्यकता प्रतिएकर ९४० मि.मी.पर्यंत कमी, पूर्वीच्या तुलनेत १,५००-२,५०० मि.मी., तांत्रिक प्रात्यक्षिकांमुळे शेतकऱ्यांना लागवडीच्या नवीन आणि प्रगतीशील पद्धती स्वीकारण्यास मदत झाली, इष्टतम खतांचा वापर केल्यास उत्पादनात ५० टक्के वाढ होण्याची अपेक्षा आहे, असे विविध परिणाम या जिल्ह्यासंदर्भात दिसून आले.

**८. सातारा :** सुशिक्षित ग्रामीण तरुणांच्या उद्योजकीय आकांक्षांना पाठिंबा.

**लाभार्थी :** महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील तापोळा गावातील तरुण.

**उपक्रम कार्य व परिणाम :** नाबार्डने हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंटवरील व्यावसायिक प्रशिक्षणासाठी आर्थिक सहाय्य दिले, कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण, मार्केटिंग, ऑनलाइन प्रमोशन आणि खेळते भांडवल यासाठी देखील अनुदान देण्यात आले इत्यादी विविध कार्य नाबार्डमार्फत करण्यात आले. त्यामुळे तापोला ॲग्रो टुरिझम प्रोड्युसर्स कंपनी लिमिटेडची स्थापना ६ तरुण ग्रामीण उद्योजकांनी केली आहे, गावकऱ्यांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करणे, या प्रकल्पात दरवर्षी ३,००० पर्यटकांना परवडणाऱ्या दरात सामावून घेतले जाते आणि कायाकिंग, पोहणे, ट्रेकिंग आणि स्ट्रॉबेरी फार्मला भेट देणे यांसारखे विविध मनोरंजनात्मक उपक्रम उपलब्ध आहे असे विविध परिणाम या जिल्ह्यासंदर्भात दिसून आले.

**गृहीतकांची तपासणी :**

अ) प्रस्तुतसंशोधनामध्ये महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासासाठी नाबार्डमार्फत आर्थिक साहाय्य दिले जाते असे गृहीत धरले आहे. नाबार्डमार्फत करण्यात येणाऱ्या आर्थिक सहाय्याच्या अभ्यासावरून दिसते की, नाबार्ड कृषी व कृषिपूरक व्यवसाय यांना पुनर्वित्ताच्या माध्यमातून आर्थिक साहाय्य करते. ग्रामीण पायाभूत सुविधांसाठी वित्तपुरवठा करते. सूक्ष्मवित्ताच्या साहाय्याने ग्रामीण विकासास चालना देते. विविध आदिवासी विकास उपक्रम, शेतकरी उत्पादक संघटना यांना अनुदान देते. थोडक्यात महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासासाठी नाबार्डमार्फत आर्थिक साहाय्य दिले जात असल्याचे दिसून येत आहे. थोडक्यात, पहिल्या क्रमांकाचे गृहीत सत्य ठरले आहे.

ब) संशोधनामध्ये दुसरे गृहीत नाबार्डमार्फत महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात विविध उपक्रम राबविले जातात असे मांडण्यात आले आहे. नाबार्डमार्फत घेण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांमधील काही जिल्हानिहाय यशस्वी गाथांचा अभ्यासातून दिसून येते की, नाबार्ड महाराष्ट्राच्या विविध ग्रामीण भागांमध्ये ग्रामीण विकासाशी संबंधित विविध उपक्रम राबवते. तसेच विविध उपक्रम राबविण्यास आर्थिक साहाय्य करते. थोडक्यात, दुसऱ्या क्रमांकांचे गृहीत सत्य ठरले आहे.

**निष्कर्ष :**

संशोधन अभ्यासावरून महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासात नाबार्डचे महत्त्वाचे योगदान असल्याचे दिसून आले. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात करण्यात आलेला पुनर्वित्त पुरवठा, ग्रामीण पायाभूत सुविधांसाठी आवश्यक मदत, शेती व शेतीपूरक व्यवसाय यांना आर्थिक मदत व त्यातून रोजगारनिर्मिती, शेतकरी उत्पादन संघटनांना अनुदान, आदिवासी भागांचा विकास करण्यासाठी विविध राबविण्यात आलेल्या उपक्रमांना आर्थिक साहाय्य असे नाबार्डमार्फत राबविण्यात येणारे विविध उपक्रम व केला जाणारा पतपुरवठा यामुळे महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील लोकांची आर्थिक स्थिती सुधारून जीवनमानाची पातळी उंचावली आहे. तसेच राज्यातील प्रादेशिक विषमता कमी होण्यास मदत झाली आहे. नाबार्डमार्फत घेण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांतील यशस्वी गाथांच्या अभ्यासावरून असे म्हणता येईल की, ज्या उद्देशाने नाबार्डची स्थापना केली आहे तो उद्देश महाराष्ट्रात बऱ्याच प्रमाणात सफल झाला असल्याचे दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

१. कविमंडन विजय, 'कृषी व ग्रामीण अर्थशास्त्र', श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, २०१२.
२. नीता वाणी, 'कृषी अर्थशास्त्र', प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, २०१५.
३. नाबार्ड माहिती पुस्तिका-On Path of Development NABARD's Role in Maharashtra, 2022.
४. पुरी वी. के., मिश्र एस. के., 'भारतीय अर्थव्यवस्था', हिमालया पब्लिशिंग हाऊस प्रा. लि., नागपूर, २०१७.

**संकेतस्थळ यादी :**

1. https://www.nabard.org/Eng Default.aspx dt.11/04/2025.
2. https://www.nabard.org/info-centre-state-focus-papers.aspx?cid=512&id=698 dt.11/04/2025.
3. https://www.nabard.org/images/casestudy-banner.jpg dt.12/04/2025.

◆

## डॉ. सौ. अरुणा रारावीकर आर्थिक लेख पुरस्कार

मराठी अर्थशास्त्र परिषदेतर्फे २०११ पासून हा पुरस्कार सुरू केला आहे. परिषदेच्या आजीव सदस्यांनी आर्थिक विषयांवर सतत वाचन-मनन करून त्यावर जिल्हा व राज्यपातळीवरील मराठी दैनिक वृत्तपत्रासाठी वैचारिक व प्रबोधनात्मक लेख लिहिण्यास उद्युक्त व्हावे, हा त्यामागील हेतू आहे. त्यांच्या अशा प्रसिद्ध झालेल्या व निवड समितीने शिफारस केलेल्या लेखांना दोन पुरस्कार दिले जातील. प्रथम पुरस्कार रु.१०००/- चा व द्वितीय पुरस्कार रु.५००/- याप्रमाणे आहे. या पुरस्कारासाठी १ जानेवारी, २०२४ ते ३१ डिसेंबर, २०२४ या कालावधीतील लेख विचारात घेतले जातील.

एक सदस्य जास्तीत जास्त आपले तीन लेख (चार प्रती) पाठवू शकतील. त्यासाठी प्रसिद्ध झालेले लेख, वृत्तपत्रांचे नाव व दिनांकासह झेरॉक्स करून ३० ऑगस्ट, २०२५ पूर्वी कार्यवाह-खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद यांच्याकडे पाठवावेत. ०२, ०३ व ०४ नोव्हेंबर, २०२५ रोजी शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला येथे संपन्न होत असलेल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४८ व्या राष्ट्रीय अधिवेशनात हे पुरस्कार प्रदान केले जातील.

**पत्रव्यवहारासाठीचा पत्ता**

कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद, डॉ. मारोती तेगमपुरे, 'संगाई', घर क्रमांक २२, भालचंद्र पेट्रोल पंपाच्या मागे, शहीद भगतसिंग नगर, पारनेर रोड, अंबड जि. जालना ४३१२०४ (भ्रमणध्वनी: ९४२३९९३१३७)

**- डॉ. मारोती तेगमपुरे**

कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,

# शेतमजुरांचा तुटवडा समस्या व उपयोजनात्मक अध्ययन

**वसंत नानाराव पतंगे** †

**प्रस्तावना**

भारतीय अर्थव्यवस्था ही कृषिप्रधान अर्थव्यवस्था आहे. भारतातील ६० टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. स्वातंत्र्यानंतर ७० वर्षे होऊनही शेतीवरील अवलंबित्व वेगाने कमी करता आले नाही. आजही बहुतांश भारतीय शेती पारंपरिक पद्धतीने केली जाते. निसर्गावरील अवलंबित्व, तांत्रिक मागासलेपणा, पारंपरिक पद्धती, अस्थिर शेतमालाच्या किमती, जलसिंचन सुविधांची कमतरता, साठवणूक सुविधांची कमतरता, सदोष बाजारपेठा, सततची नापिकी, शासनाचे दुटप्पी धोरण इ.वैशिष्ट्ये भारतीय शेतीची आपल्याला दिसून येतात. शेतीच्या या अवस्थेमुळे शेतीकडे व्यवसाय म्हणून बघण्याचा दृष्टिकोन अजूनही आपण विकसित करू शकलो नाही. भारतीय शेतीक्षेत्रात अशाच समस्या राहिल्या तर अर्थव्यवस्थेत अनेक गंभीर समस्या निर्माण होतील. शेती व शेतमजुरी ही सामाजिक प्रतिष्ठेच्या दृष्टीने दुय्यम वाटत आहे. पूर्वीच्या काळी उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी असं म्हटलं जात असे, आता मात्र यात बदल होऊन त्याच्या नेमकं उलट झाले आहे. शेतीक्षेत्रातून सर्वात जास्त रोजगारनिर्मिती होते. मात्र शेतीक्षेत्रात रोजगार संधी उपलब्ध असल्या तरी या संधीचा लाभ घेण्यासाठी श्रमिक वर्ग फारसा उत्सुक नसल्याचे चित्र मागील काही वर्षांपासून तयार झाले आहे. शेतीमधील विविध समस्यांसोबतच शेतमजुरांचा तुटवडा ही एक नवीन समस्या शेतकऱ्यांसमोर उभी राहिली आहे. त्यामुळे शेतकरी मेटाकुटीस आला आहे. शेतमजुरांचा तुटवडा ही समस्या केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर पंजाब, केरळ, कर्नाटक, तामिळनाडू अशा अनेक राज्यांमध्ये प्रखरतेने जाणवत आहे. शेतमजुराअभावी शेतीची कामे वेळेवर होत नाहीत त्याचा परिणाम शेती उत्पादनावर व शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर होत आहे. देशात एकीकडे बेरोजगारी वाढत आहे, तर दुसरीकडे शेती कामासाठी मजुरांची उपलब्धता कमी होत आहे अशी विरोधाभासाची स्थिती कृषिक्षेत्रात निर्माण झाली आहे. अनेक वेळा शेतमजूर तुटवड्यावर शेतमजुरांना पर्याय म्हणून यांत्रिकीकरणाची शिफारस केली जाते. परंतु हे यांत्रिकीकरण अनेक शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या व जमिनीच्या तुकडीकरणामुळे शक्य होत नाही. कृषी उत्पादनासाठी आवश्यक असणाऱ्या इतर आदानांप्रमाणेच

† सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग अ.र.भा.गरुड महाविद्यालय, शेंदूर्णी, ता.जामनेर, जि. जळगाव
आजीव सभासद क्र. १५६८, भ्रमणध्वनी : ८८०५८४७५४१, ईमेलः vasantpatange@gmail.com

शेतमजुरांची भूमिका महत्त्वाची असते.

**संशोधनाची व्याप्ती व महत्त्व:**

प्रस्तुत संशोधनाकरिता महाराष्ट्रातील जळगाव जिल्ह्यातील जामनेर तालुक्याची निवड केली आहे. शेतमजूर हा शेती व्यवस्थेतील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. मागील काही वर्षांपासून मात्र शेतकामासाठी मजुरांची उपलब्धता कमी होत चालली आहे. त्यामुळे शेतीची कामे वेळेवर होत नाही. त्याचा फटका शेती उत्पादन व देशाच्या अन्नसुरक्षेला बसत आहे. शेतकऱ्यांसमोर असणारी संकटे कमी होण्याऐवजी दिवसेंदिवस वाढतच चालली आहेत. त्यातच शेतमजुरांच्या तुटवड्याची एक नवीन समस्या समोर उभी राहिली आहे. ही समस्या जाणून ती सोडविण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधनाची आवश्यकता आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

१. शेतमजुरांचे इतर क्षेत्राकडे होणारे स्थलांतर अभ्यासणे.
२. शेतमजुरांच्या तुटवड्यामुळे शेती उत्पादनावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.
३. शेतमजुरांच्या संदर्भातील समस्यांचे अध्ययन करून उपाययोजना सुचविणे.

**संशोधनाची गृहीतके:**

१. शेतमजुरांची संख्या सतत घटत आहे.
२. मजुरीदरातील वाढ ही शेतमाल किमतीपेक्षा जास्त आहे.
३. शेतमजूर कमतरतेचा उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होत आहे.

**संशोधन कालावधी :**

सदर संशोधनासाठी संशोधकाने वर्ष २०१९ ते वर्ष २०२१ या कालावधीचा विचार केलेला आहे.

**संशोधन पद्धती:**

सदरील संशोधनासाठी प्राथमिक व द्वितीयक सामग्री संग्रहण पद्धतीच्या साहाय्याने संकलन करून त्यासाठी सहेतुक विश्लेषण पद्धतीचा अवलंब केला आहे. तसेच नमुना निवडीसाठी यादृच्छिक नमुना निवड पद्धतीचा वापर केला आहे.

**प्राथमिक सामग्री संग्रहण पद्धती:**

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक सामग्री संग्रहणासाठी जळगाव जिल्ह्यातील जामनेर तालुक्याची निवड केली आहे. जामनेर तालुक्यातून सहेतुक पद्धतीने शेतकरी-१०० व शेतमजूर-१०० निवडलेले आहेत. यामध्ये मोठे व सीमांत शेतकरी तसेच कोरडवाहू व बागायती शेती करणारे शेतकरी त्या प्रमाणात नमुना म्हणून निवडले आहेत.

**द्वितीय सामग्री संग्रहण पद्धती:**

संशोधनाच्या अनुषंगाने द्वितीय सामग्री संग्रह कृषी विभागाचे अहवाल, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवाल, भारताची आर्थिक पाहणी अहवाल, जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, मासिके, वर्तमानपत्रे इत्यादींच्या माध्यमातून केली आहे.

**शेतमजूर:**

मानवी जीवनात, आर्थिक विकासात श्रमाचे अत्यंत महत्त्व आहे. नैसर्गिक साधनसामग्री आहे म्हणजे त्या देशाचा विकास होऊ शकत नाही. कारण श्रमाशिवाय नैसर्गिक साधनसंपत्तीला प्रत्यक्ष उत्पादन कार्यात सक्रिय करता येत नाही. मानवाने जी आज प्रगती केली आहे ती मानवी प्रयत्नामुळे किंवा श्रमामुळे होईल होय.

**शेतमजुरांची व्याख्या:**

ज्यांच्याकडे शेती नाही, परंतु ते इतरांच्या शेतात काम करतात त्यांना भूमिहीन शेतमजूर असे म्हणतात. काही मजुरांकडे स्वतःची थोडीफार जमीन असते. परंतु त्यांचा त्यात उदरनिर्वाह होत नाही म्हणून त्यांना इतरांच्या शेतात काम करावे लागते. त्यांनाही शेतमजूर असे म्हणतात. उपजीविकेचे साधन म्हणून दुसऱ्याच्या शेतजमिनीवर राबणाऱ्या मजुराला शेतमजूर असे म्हणतात.

**शेतमजूर राष्ट्रीय आयोग:**

जे लोक अकुशल आणि असंघटित आहेत त्यांच्या जगण्याचे मुख्य साधन शेतीतून मिळणारी मजुरी आहे. अशा लोकांना शेतमजूर म्हणतात. शेतकरी जसा अस्मानी व सुलतानी संकटांमुळे हतबल झाला आहे तशीच काहीशी अवस्था शेतमजुरांचीही आहे. मात्र शेतकामासाठी शेतमजुरांच्या तुटवड्यामुळे शेतकऱ्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते, हे मात्र नाकारता येत नाही.

**जामनेर तालुका :**

जळगाव जिल्ह्यातील १५ तालुक्यांपैकी जामनेर हा एक तालुका आहे. जामनेर तालुका हा उत्तर महाराष्ट्राच्या सीमेवरील आहे. मराठवाडा व विदर्भाच्या सीमा या तालुक्याला लागून आहेत. जामनेर तालुक्याच्या सीमेवर अजिंठा लेणी व अजिंठा डोंगररांगा आहेत. जळगाव जिल्ह्यातील सर्वाधिक क्षेत्रफळ असणारा जामनेर तालुका आहे. जामनेर तालुक्यात एखादे वर्ष वगळता सातत्याने कमी पर्जन्यमान राहिले आहे. पावसाचे कमी प्रमाण व योग्य जलनियोजनाच्या अभावामुळे जामनेर तालुक्याला भीषण पाणी टंचाईला सामोरे जावे लागते. जामनेर तालुक्यातील ७५ टक्के पेक्षा जास्त जनता ग्रामीण भागात राहाते, म्हणजेच ती प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या कृषीवर अवलंबून आहे. जामनेर तालुक्यात उद्योगांचे प्रमाण कमी आहे. जामनेर तालुक्यातील काही भाग वगळता अधिकाधिक जमिनी लालसर असल्यामुळे कमी सुपीक आहेत.

**शेतमजूर तुटवड्याच्या कारणांचे विश्लेषण:**

शेतीमध्ये शेतकऱ्यांप्रमाणेच शेतमजूर हा घटकही महत्त्वाचा आहे. बी-बियाणे, रासायनिक खते, यंत्रसामग्री इत्यादी घटकांप्रमाणेच शेतमजूरही महत्त्वाचा आहे. आजच्या जागतिकीकरण व यांत्रिकीकरणाच्या युगातही शेतमजुरांची आवश्यकता आहे. स्वातंत्र्यापूर्वी व स्वातंत्र्यानंतर शेतमजुरांची संख्या ही शेतीतील मागणीच्या तुलनेत जास्त होती. मागील काही काळापासून मात्र शेतमजुरांचे इतर क्षेत्राकडे स्थलांतर झाल्यामुळे किंवा इतरही कारणामुळे शेतमजुरांचा तुटवडा निर्माण झाला आहे. भारतात एकीकडे बेरोजगारी वाढत आहे, तर दुसरीकडे शेतीत मजुरांची उपलब्धता वेळेवर होत नाही अशी विरोधाभासाची स्थिती आहे. स्थलांतर, कायमस्वरूपी रोजगार सामाजिक प्रतिष्ठा, शासकीय योजना अशा अनेक कारणांमुळे शेतमजुरांची संख्या कमी झाली आहे. प्रस्तुत अध्ययनासाठी निवडलेल्या जामनेर तालुक्यातील शेतकरी व शेतमजूर नमुना उत्तरदाते यांनी मुलाखतीद्वारे दिलेल्या माहितीच्या आधारे शेतमजूर तुटवड्यांच्या कारणांचे विश्लेषण पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे.

**शेतमजुरांच्या तुटवड्या संदर्भातील माहिती:**

भारतीय शेतीचे स्वरूप हंगामी असल्यामुळे शेतीमध्ये हंगामात रोजगार संधी जास्त असतात. मात्र हंगाम संपल्यानंतर रोजगार कमी होतो. शहरांमध्ये किंवा इतर क्षेत्रात वर्षभर रोजगार असतो. त्यामुळे शेतीतील मजूर इतर क्षेत्राकडे स्थलांतरित झाला व शेतकामासाठी मजुरांची टंचाई जाणू लागली. शेतमजूर कमतरतेचा थेट परिणाम उत्पादनावरही होत आहे. या अध्ययनातून असे आढळून आले आहे की, शेतमजुरांच्या तुटवड्याची समस्या मोठ्या शेतकऱ्यांबरोबरच लहान किंवा सीमांत शेतकऱ्यांनाही प्रकर्षाने जाणवत आहे. शेतमजुरांचा तुटवडा वर्षभर असतो किंवा हंगामी असतो किंवा नसतोच या संदर्भातील माहिती खालील तक्त्यात दर्शविली आहे.


तक्ता क्र. १ व आकृती क्र. १ वरून असे स्पष्ट होते की, १९ टक्के शेतकरी व १७ टक्के शेतमजुरांच्या मते वर्षभर शेतमजुरांची कमतरता असते व ६८ टक्के शेतकरी व ५० टक्के शेतमजुरांच्या मते केवळ हंगामातच शेतमजुरांची कमतरता असते आणि १३ टक्के शेतकऱ्यांच्या व ३३ टक्के शेतमजुरांच्या मते मात्र

**तक्ता क्र. १ शेतमजुरांच्या तुटवड्या संदर्भातील माहिती**

| शेतमजुरांची कमतरता भासते काय? | उत्तरदात्यांची संख्या | शेतकरी शेतमजूर | एकूण उत्तरदात्यांची संख्या |
|---|---|---|---|
| वर्षभर | १९(१९%) | १७(१७%) | ३६ (१८%) |
| हंगामी | ६८(६८%) | ५०(५०%) | ११८ (५९%) |
| नाही | १३(१३%) | ३३(३३%) | ४६ (२३%) |
| एकूण | १०० | १०० | २०० |

स्रोत : प्रत्यक्ष सर्वेक्षण-२०२१-२२.

**आकृती क्र. १ शेतमजुरांच्या तुटवड्या संदर्भातील माहिती**




शेतमजुरांची कमतरता त्यांना जाणवत नाही. शेतमजुरांची कमतरता विशेषतः बागायती क्षेत्र असणाऱ्या शेतीमध्ये जास्त जाणवते आहे. एकूणच ७७ टक्के शेतकरी व शेतमजुरांच्या मते वर्षभर किंवा हंगामात शेतमजुरांचा तुटवडा असतो. यावरून असे स्पष्ट होते की, बहुतेक शेतकऱ्यांना शेतीकामासाठी मजुरांचा तुटवडा आहे.

**मजुरी दरातील वाढ शेतमाल किमतीपेक्षा जास्त आहे काय?**

शेतीत वापरल्या जाणाऱ्या बी-बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके इ. आदानांच्या किमती सातत्याने वाढत आहेत. मात्र त्या तुलनेत शेतमालाच्या किमतीतील वाढ कमी असून त्यात अनिश्चितता आहे. शेतमजुरी दरही वाढत असतात ते कमी होत नाहीत. शेतमजुरी दर इतर क्षेत्रातील मजुरीच्या तुलनेत कमी असले तरी त्यात शेतमालाप्रमाणे अस्थिरता नाही. हंगामात शेतमजुरीचे दर तुलनेने जास्त असतात. तक्ता क्र. २ मध्ये शेतमजुरी दरातील वाढ ही शेतमाल किंमतीपेक्षा जास्त आहे किंवा नाही या संदर्भातील शेतकरी व शेतमजुरांची माहिती दर्शविली आहे.

**तक्ता क्र.२ : मजुरी दरातील वाढ शेतमाल किमतीपेक्षा जास्त आहे काय?**

| मजुरी दरातील वाढ शेतमाल किमतीपेक्षा जास्त आहे काय? | उत्तरदात्यांची संख्या | शेतकरी शेतमजूर | एकूण उत्तरदात्यांची संख्या |
|---|---|---|---|
| होय | ७४ (७४%) | ४९ (४९%) | १२३ (६२%) |
| नाही | २६ (२६%) | ५१ (५१%) | ७७ (३८%) |
| एकूण | १०० | १०० | २०० |

स्रोत- प्रत्यक्ष सर्वेक्षण-२०२१-२२.

तक्ता क्र. २ वरून असे स्पष्ट होते की, ७४ टक्के शेतकरी व ४९ टक्के शेतमजुरांच्या मते मजुरी दरातील वाढ ही शेतमाल किमतीपेक्षा जास्त आहे, तर २६ टक्के शेतकरी व ५१ टक्के शेतमजुरांच्या मते मात्र शेतमजुरी दरातील वाढही शेतमाल किमतीपेक्षा जास्त नाही. शेतकरी व शेतमजूर यांच्या मते शेतमालाला मिळणारा भाव हा उत्पादन खर्चाच्या तुलनेत कमी असून त्यात अनिश्चितता आहे. त्यामुळे मजुरीदरातील वाढ ही शेतमाल किमतीपेक्षा जास्त वाटते. वर्तमान काळातील राहणीमान किंवा गरजांचा विचार करता किंवा इतर क्षेत्रातील मजुरीदरांचा विचार करता मात्र शेतमजुरी दर हे जास्त नाहीत असेही शेतकरी व शेतमजूर या दोघांनीही नमूद केले आहे.

**शेतमजूर तुटवड्याचा उत्पादनावर होणारा परिणाम:**

मागील दशकापासून शेतीसाठी मजुरांची कमतरता भासत आहे. मजुरांच्या कमी उपलब्धतेमुळे पेरणीचे काम वेळेवर होत नाहीत. शिवाय हंगाम काढणीच्या वेळेला मजूर वेळेवर मिळत नाहीत. त्यामुळे पिकांचे नुकसान होऊन त्यांचा उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होतो. अनेक भागांमध्ये शेतमजूर वेळेवर उपलब्ध होत नसल्याने शेतमाल जमिनीवर पडून जातो किंवा खराब होतो, अशी व्यथा शेतकऱ्यांनी व्यक्त केली व १० ते २० टक्के नुकसान होते असे नमूद केले. हे नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांना यंत्राची शिफारस केली जाते. मात्र त्याचा वापर लहान शेतकऱ्यांना होत नाही व जमिनीच्या तुकडी कारणामुळेही ते शक्य होत नाही. अनेक वेळा पाऊस किंवा इतर कारणांमुळेही यंत्राचा वापर करता येत नाही. शेतमजूर तुटवड्याचा उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होत आहे.

तक्ता क्र. ३ व आकृती क्र. २ वरून असे स्पष्ट होते की, ६८ टक्के शेतकऱ्यांनी शेतमजूर कमतरतेचा शेती उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होतो असे नमूद केले आहे. ३२ टक्के शेतकऱ्यांना मात्र शेतमजूर कमतरतेचा शेती उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होत नाही असे वाटते. शेतमजुरांनीही मजूर टंचाईचा उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होत असल्याचे नमूद केले आहे. मजुरांची वेळेवर उपलब्धता झाल्यास शेतकऱ्यांचे नुकसान टाळता येऊ शकते.

**गहीतक पडताळणी :**

एकंदरीत संशोधकाने केलेल्या संशोधणावरून असा निष्कर्श हाती येतो की, संशोधनासाठी घेतलेले प्रथम गृहीतक हे पूर्णत: स्वीकारार्य आहे. द्वितीय आणि तृतीय गृहीतक अंशत: स्वीकारार्य आहे.


**शिफारशी :** शेतमजुरांचा तुटवडा या समस्यांचे अध्ययन करताना प्राप्ततथ्यांचे विश्लेषण केल्यानंतर जे निष्कर्ष प्राप्त झाले त्या निष्कर्षांच्या अनुषंगाने शेतमजुरांच्या तुटवडा ही समस्या सोडविण्यासाठी

**तक्ता क्र. ३ शेतमजूर कमतरतेचा उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होत आहे काय?**

| **शेतमजूर कमतरतेचा उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होत आहे काय?** | **शेतकरी उत्तरदात्यांची संख्या** |
|---|---|
| होय | ६८ (६८%) |
| नाही | ३२ (३२%) |
| एकूण | १०० |

स्रोत- प्रत्यक्ष सर्वेक्षण-२०२१-२२

**आकृती क्र. २ शेतमजूर कमतरतेचा उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होत आहे काय?**




खालील काही सूचना सांगता येतील.

१. शेतमालाच्या किमती उत्पादन खर्चानुसार असाव्यात व किमतीत स्थिरता असावी. जेणेकरून शेतकऱ्यांना उत्पन्नाची शाश्वती राहील व मजुरांनाही अधिक उत्पन्न मिळेल.

२. रोजगार हमी योजना शेतीच्या कामाशी जोडली जावी म्हणजेच जेव्हा शेतीची कामे असतील अशा वेळेस रोजगार हमी योजनेवरील मजूर शेतकामासाठी उपलब्ध करून द्यावेत.

३. स्वस्त धान्य किंवा शासनाच्या इतर योजना या शेतीकामाशी जोडण्यात याव्यात म्हणजेच ग्रामीण भागात शेतीच्या हंगामात किमान दिवस शेतीत काम करण्याची अट असावी. ज्यामुळे शेतकामासाठी मजुरांची उपलब्धता होईल.

४. शेतीत मजुरांना पर्याय म्हणून यंत्राच्या वापरात वाढ करावी. शेतकऱ्यांना यंत्र खरेदी करणे शक्य नसल्यामुळे प्रत्येक गावात सोसायटी, शेतकरी गट किंवा ग्रामपंचायतमार्फत भाडेतत्त्वावर यंत्र उपलब्ध होतील, अशी व्यवस्था करावी.

५. शेतमजुरांना दिली जाणारी मजुरी वेळेवर व निश्चित स्वरूपात द्यावी.

६. शेतीला जलसिंचनसारख्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे. ज्यामुळे शेतीमध्ये वर्षातून दोन वेळा पिकं घेता येतील व वर्षभर रोजगार

निर्माण होईल.

७. शासनाने शेतमजूर विमा योजना राबवावी व शेतीमध्ये प्रत्यक्ष काम करणाऱ्याच शेतमजुरांचा विमा शासनाने काढावा. यामुळे शेतात काम करताना सर्पदंश व इतर कारणांमुळे अपघात किंवा मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबांना आर्थिक मदत प्राप्त होईल.

८. शेतमजुरांची ग्रामपंचायतमध्ये नोंदणी करणे किंवा एखाद्या बचत गटाकडे नोंदणी करून आवश्यकतेनुसार मजुरांची शेतकऱ्यांना उपलब्धता करून देणे.

**संदर्भ ग्रंथ सूची:**


१. पाटील कृष्णराव, उच्चतर आर्थिक सिद्धांत, मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९८.

२. महात्मा गांधीजी (हरिप्रसाद व्यास संग्राहक) ग्रामस्वराज्य, नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदनगर,१९६३.

३. बोधनकर सुधीर, आलोणी विवेक, सामाजिक संशोधन पद्धती, साईनाथ प्रकाशन, नागपूर २००३.

४. देशमुख प्रभाकर, श्रमाचे अर्थशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर, १९८७.

५. चौधरी की का, महाराष्ट्र राज्य गॅजेट जळगाव, महाराष्ट्र शासन, मुंबई,१९९४.

६. चव्हाण बी.सी., कृषी अर्थशास्त्र के सिद्धांत एवं भारत में कृषी विकास, रावत प्रकाशन, नई दिल्ली, २०१६.

७. मिश्र जयप्रकाश, कृषी अर्थशास्त्र, साहित्य भवन पब्लिकेशन, आग्रा, २०००.

८. सुदामासिंह, राजीव कृष्णासिंह, भारतीय अर्थव्यवस्था, राधा पब्लिकेशन, नई दिल्ली, चतुर्थ संस्करण, २००३.

९. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन जिल्हा जळगाव जिल्हा सांख्यिकीय कार्यालय अर्थ व सांख्यिकी संचालन महाराष्ट्र शासन जळगाव जिल्हा, महाराष्ट्र शासन.

१०. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी

११. भारताची जनगणना २०११.

१२. Agriculture statistics at a glance 2018, Govt. of India, Ministry of Agriculture and farmer Welfare Dept. Of Agriculture co-operation & farmer welfare, Directorate of Economics and statistics.

१३. Gunbhagya, Amrita T. Joshi, Suresh S.Patil and G.N.Maraddi, Agricultural labour shortage: An Abysmal to agriculture in North Eastern Karnataka.


**वर्तमानपत्र**


1. Agriculture operation in the group of labour shortage, The Hindu 13 July 2012.
2. Farmlabour shortage effects food security, rural marketing,15 September 2014.
3. labour shortage Hits Punjab farm season, Indian Express,18 June 2019
4. laboursshortage problem of Maharashtra, The Indian Express,24 January 2018.


**संकेत स्थळे**


1. Jammer mc.gov.in
2. Wikipedia


◆

# डॉ. मनमोहन सिंग यांचे अर्थशास्त्रीय योगदान

**किशोर सुतार** †

**प्रस्तावना :**

कोणताही समाज समूह किंवा राष्ट्र यांच्या आर्थिक प्रगतीमध्ये आणि अर्थव्यवस्थेच्या सर्वंकष विकासामध्ये त्या राष्ट्राच्या सामाजिक, राजकीय, भौगोलिक व इतर वैविध्यपूर्ण घटकांना अनुलक्षून काही आर्थिक विचार, संकल्पना, सिद्धांतन, प्रारूपे मांडली जाणे आणि त्याचे अर्थव्यवस्थेमध्ये अंमलबजावणीच्या स्वरूपात प्रतिस्थापन होणे ही प्रक्रिया खूप महत्त्वाची असते. युरोपामध्ये व्यापारवादी, निसर्गवादी विचारवंतांपासून ते ॲडम स्मिथ व नवकल्याणकारी अर्थतज्ज्ञापर्यंत अनेक आर्थिक विचारवंतांनी याबाबत जी अतुलनीय अशी भूमिका पार पाडली. त्याची फलनिष्पत्ती म्हणून आज युरोप व अमेरिका विकासाच्या एका शिखरावर असलेली पाहायला मिळतात. आपला भारत हा एक प्राचीन सभ्यता, संस्कृती आणि गौरवशाली आर्थिक संपन्नता असलेला देश मात्र; अनेक शतकांची झालेली परकीय आक्रमणे, युद्धे आणि पारतंत्र्य यांमुळे जग जेव्हा ज्ञान, विज्ञान यांतील प्रगतीमुळे औद्योगिक आणि तांत्रिक क्रांती घडवून विकासाचे अनेक टप्पे पार करत होते तेव्हा आपण अविकसिततेच्या गर्तेत अडकून पडलो. मात्र ब्रिटिशांच्या आगमनाने पाश्चात्त्य ज्ञानाची मिळालेली संधी आणि वातावरण यांमुळे भारतामध्ये दादाभाई नौरोजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, महात्मा गांधी, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, डॉ. वि. म. दांडेकर, डॉ. निळकंठ रथ, डॉ. सी. डी. देशमुख, डॉ. धनंजयराव गाडगीळ यांसारख्या उच्च शिक्षणात आपला ठसा उमटविणाऱ्या पहिल्या पिढीने भारताच्या दृष्टीने आणि भारतीय अर्थव्यवस्थेला साजेशी अशी आर्थिक तत्त्वे, सिद्धांत आणि विवेचन मांडण्यास सुरुवात केली. अमर्त्य सेन आणि अभिजीत बॅनर्जी या नव-आधुनिक भारतीय अर्थतज्ज्ञांनी त्यावर कळस चढवला. मात्र या सर्वांमध्ये कोंदणातील हिरा शोभावा असे गौरवशाली काम एका व्यक्तीने केले. ते काम फक्त सैद्धांतिक किंवा संशोधनात्मक मांडणीपुरते मर्यादित नव्हते तर त्याला धोरणात्मक अंमलबजावणीची आणि त्याच्या सर्वस्पर्शी अशा फलनिष्पत्तीची कार्यात्मक जोड होती. सिद्धांतांची मांडणी, संशोधनात्मक कार्य, व्यवस्था-व्यवस्थापन व कार्यकारी स्तरावर त्याची अंमलबजावणी करणे, शासन संस्थांच्या कार्यकारी मंडळामध्ये स्वतः काम करून धोरणांची आखणी व

† सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा. घटक महाविद्यालय, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा.

आजीव सभासद क्र.१८४८, भ्रमणध्वनी : ८३२९३८९९७९, ईमेलः kishorsutar2021@gmail.com

अंमलबजावणी करणे, देशाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असणाऱ्या मौद्रिक धोरण तसेच राजकोषीय धोरण, सार्वजनिक योजनांची आखणी अशा वैविध्यपूर्ण प्रांतांमध्ये साक्षीत्वी संचार अशा सर्व आयामांनी ज्यांचे 'भारतीय अर्थशास्त्रीय योगदान' हे कालातीत असे ठरले. असे जागतिक कीर्तीचे थोर अर्थतज्ज्ञ, पंतप्रधान कार्यालयाचे अर्थसल्लागार, वाणिज्य विभागाचे अर्थसचिव, अंकस्टाड सारख्या संस्थेमध्ये उच्च पदावर कार्य करणारे अर्थतज्ज्ञ, भारतीय विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष, भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, केंद्रीय वित्तमंत्री आणि या देशाचे दहा वर्षे पंतप्रधान राहिलेले एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व की, ज्यांची अर्थशास्त्रातील कारकीर्द ही एक अर्थशास्त्राचा संशोधक विद्यार्थी, प्राध्यापक ते जागतिक कीर्तीचा अर्थतज्ज्ञ अशी घडत असताना दुसऱ्या बाजूला एक यशस्वी सनदी अधिकारी ते तब्बल तीस वर्षे लोकसभा आणि राज्यसभा या दोन सर्वोच्च संसदीय मंडळांमध्ये कार्यरत असणारा राजनीतिज्ञ अशी राहिली होती. असे एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व म्हणजे या देशासाठी सदैव प्रातःस्मरणीय ठरावेत असे डॉ. मनमोहन सिंग हे होत. मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या येऊ घातलेल्या ४८ व्या वार्षिक अधिवेशनाकरिता प्राध्यापक, लेखक, संशोधक या सर्वांना परिषदेच्या वतीने आवाहन करण्यात येते की, अर्थशास्त्रीय विचारांनमध्ये आपल्या लेखन, संशोधन व कृतिशील योगदानाने ज्यांनी या देशाला एका विकासाच्या नवीन मार्गावर आणले अशा डॉ. मनमोहन सिंग या थोर अर्थतज्ज्ञाच्या जीवन, कार्य व आर्थिक तत्त्वज्ञान यावर सखोल चिंतन, मनन आणि परीक्षण होऊन त्यांच्या कार्याच्या उचित व संयुक्तिक अशा मूल्यांकनातून देशाच्या भावी आर्थिक विकासाकरिता आणि सध्याच्या समकालीन संदर्भातील विकासात्मक बांधणीकरिता गुणात्मक संशोधनाचा एक दस्ताऐवज निर्माण व्हावा या उद्देशाने आगामी अधिवेशनासाठी संशोधकांना शोधनिबंध लेखन व सादरीकरणासाठी 'डॉ. मनमोहन सिंग याचे अर्थशास्त्रीय योगदान' हा विषय आपणासमोर प्रस्तुत टिपणाच्या माध्यमातून देत आहोत. त्याच्या अनुषंगाने आपण येणाऱ्या अधिवेशनाकरिता आपले शोधनिबंध पाठवून हे अधिवेशन यशस्वी करण्यामध्ये आपले हार्दिक योगदान द्यावे.

**डॉ. मनमोहन सिंग यांचे अर्थशास्त्रीय योगदान :**

स्व. डॉ. मनमोहन सिंग हे जागतिक कीर्तीचे एक अर्थतज्ञ, केंब्रिज, ऑक्सफर्ड यांसारख्या विद्यापीठातील एक रिसर्च स्कॉलर, दिल्ली युनिव्हर्सिटी, पंजाब युनिव्हर्सिटी येथील अर्थशास्त्राचे एक निष्णात प्राध्यापक, विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष, भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, वाणिज्य व वित्त मंत्रालय, प्रधानमंत्री कार्यालय यांचे अर्थ सल्लागार, नियोजन आयोगाचे सदस्य तसेच अध्यक्ष, अंकस्टाडचे सदस्य अशा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय आस्थापनांच्या विविध प्रमुख पदांवर राहिलेले सनदी अधिकारी, अतिशय कसोटीच्या काळातून हा देश वाट काढत असतानाचे देशाचे वित्तमंत्री, तब्बल दहा वर्षे भारतासारख्या खंडप्राय व विविधतेने नटलेल्या देशाचे पंतप्रधान अशा सर्वोच्च पदांवर कार्य केलेले नेते. अशा विविध आयामांनी भारतीय अर्थव्यवस्थेला एक नवा आकार देऊन तिला जागतिकीकरणाच्या मूळ प्रवाहात घेऊन जाणारे एक दृष्टे आणि भविष्यवेधी नेतृत्व होते. नवसनातनवादी अर्थतज्ज्ञ प्रोफेसर मिसेस जॉन रॉबिन्सन यांच्यासारख्या एका विख्यात अर्थतज्ज्ञ त्यांच्या गुरू होत्या. त्यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली ज्यांची वैचारिक जडणघडण झाली. केंब्रिज, ऑक्सफर्ड यांसारख्या अर्थशास्त्राच्या संशोधन व विचारांची पंढरी असणाऱ्या वातावरणामध्ये ज्यांचा वैचारिक पिंड घडला. ज्यांचा प्रवास हा अत्यंत गरिबीपासून ते या देशातील सर्वोच्च पदांपर्यंत घडला. ज्यांनी सामाजिक, आर्थिक जीवनाचे अनेक पैलू पाहिले आणि जगले देखील. याच पार्श्वभूमीतून आल्यामुळे त्यांनी या देशाचे अर्थ सल्लागार, विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष, भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, अतिशय कठीण काळातील देशाचे अर्थमंत्री आणि दहा वर्षे पंतप्रधान पदाची कारकीर्द अशा त्यांच्या

कारकिर्दीचा बहुव्याप्त असा पैस त्यांचे अर्थशास्त्रीय योगदान अभ्यासताना पाहावा लागेल.

या त्यांच्या संपूर्ण कार्यकाळात रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या गव्हर्नर पदी काम करत असतानाचे अत्यंत प्रभावशील असे मौद्रिक धोरण, त्यांच्या गव्हर्नर पदाच्या कार्यकाळातील आरबीआयची त्यांनी आबाधित ठेवलेली स्वायत्तता या संदर्भातील त्यांच्या कामाचा आपणाला आढावा घेता येईल व त्याद्वारे सध्याच्या परिस्थितीतील आरबीआय समोरील आव्हाने व समस्या यांवरील उपायांच्या दिशा शोधता येतील. पंतप्रधान कार्यालय व वाणिज्य विभागाचे अर्थसल्लागार म्हणून कार्य करीत असताना त्यांनी ज्या नवीन आर्थिक धोरणात्मक बदलांची रूपरेषा आखून दिली ती पाहता सध्याच्या आर्थिक आघाडीवर देशासमोर असणारी अनेक जटील आव्हाने व प्रश्न नेमके कसे हाताळता येतील याचे दिशादर्शन त्यातून होईल यात शंकाच नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अध्यक्षपदी त्यांचा अल्पकाळ असणारा वावर देखील सध्याच्या नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणी संदर्भात येणाऱ्या अडचणी व त्यातील आव्हाने व उपलब्ध असणाऱ्या नव्या संधी यांचा परामर्श घेताना उपयोगी पडेल असाच आहे. त्यांनी ९० च्या दशकात देश जेव्हा एका अनोख्या वळणबिंदूतून जात होता तेव्हा त्याचा सुकाणू नेमका कसा हाकला पाहिजे? याचे त्यांनी घालून दिलेले उदाहरण हे भविष्यातील अनेक पिढ्यांना मार्गदर्शक आणि प्रेरणादायी असणार आहे. त्यांच्या LPG मॉडेलद्वारे त्यांनी ज्या पद्धतीने या देशाला एक नवी दिशा दिली आहे. ती एखाद्या दीपस्तंभाप्रमाणे येणाऱ्या विकासनीतीच्या निर्मितीसाठी एक मापदंड ठरणार आहे. दुसऱ्या हरितक्रांतीची त्यांनी केलेली यशस्वी सुरुवात म्हणजे शेतीच्या शाश्वत विकासाची मुहूर्तमेढ म्हणावी लागेल. एफडीआय, सेझ, BOT, निर्गुंतवणुकीचे धोरण या त्यांच्या काळाच्याही पुढच्या धोरणात्मक रणनीतींचे सिंहावलोकन आजच्या परिप्रेक्ष्यामध्ये करणे हा एक वेगळाच संशोधनाचा आणि अभ्यासाचा विषय असणार आहे.

पंतप्रधान पदाची त्यांची दहा वर्षांची कारकीर्द म्हणजे अनेक आर्थिक व कल्याणकारी निर्णयांनी व्यापून टाकलेली एक मालिकाच म्हणावी लागेल. ज्यामध्ये माहितीचा अधिकार, अन्नसुरक्षितता विधेयक, शेतकऱ्यांची कर्जमाफी, दुसऱ्या हरितक्रांतीची पायाभरणी, कररचनेतील अनेकविध सुधारणा, आधारची संकल्पना या गोष्टी हा संशोधकांना अभ्यासाकरिता लाभलेला अनमोल ठेवा ठरणार आहे. २००८ साली जेव्हा जगामध्ये सबप्राईम क्रायसीसच्या रूपात एक मोठे आर्थिक मंदीचे संकट आले तेव्हा भारतीय रिझर्व्ह बँक आणि देशाचे वित्तमंत्रालय या दोन्ही आघाड्यांवर तत्कालीन गव्हर्नर डी. सुब्बाराव आणि अर्थमंत्री पी. चिदंबरम या जोडगोळीला हाताशी धरून डॉ. सिंग यांनी जगातील अनेक विकसित देशदेखील अडचणीत सापडलेले असताना भारतीय अर्थव्यवस्थेला या सर्व आर्थिक मंदीच्या दुष्टचक्रातून अलगद व सुखरूप बाहेर काढले. त्यांच्या अर्थनीतींचा या अनुषंगाने देखील अभ्यास होणे अत्यंत गरजेचे आहे. त्यांच्या कार्यकाळातील भारत-अमेरिका अनुकरार व त्याचे भू-अर्थ-राजकीय संदर्भ जेव्हा संशोधनात्मक पातळीवर अभ्यासले जातील तेव्हा भूराजकीय धोरणांचा आर्थिक परिप्रेक्ष्याच्या दृष्टीने अभ्यास करण्याचा एक नवा दृष्टिकोन विकसित होण्यास मदत होईल. त्यांची वैचारिक जडणघडण जरी नवसनातनवादी आर्थिक विचारांच्या मुशीत झाली असली तरी, भारतासारख्या विकसनशील व कृषिक्षेत्राचे प्राबल्य असलेल्या देशाचे अर्थकारण हाताळताना त्यांनी देश-काल-स्थितीपरत्वे जी धोरणात्मक आणि तात्त्विक लवचिकता दाखविली ती खरेच वाखाणण्याजोगी होती. उदाहरणार्थ, त्यांची दुसऱ्या हरितक्रांतीच्या प्रयोगाची मालिका, अन्नसुरक्षितता विधेयकाद्वारे आपल्या विचारांना मुरड घालून कल्याणकारी राज्याप्रति दाखविलेली प्रतिबद्धता, कर्जबाजारीपणा आणि दुष्काळातून आलेली नापिकी यामुळे आत्महत्याग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांसाठी त्यांनी जाहीर केलेली देशाच्या इतिहासातील सर्वात मोठी

कर्जमाफी या गोष्टी बरेच काही शिकवून आणि सांगून जाणाऱ्या आहेत. ९० च्या दशकात प्रचंड मोठी आर्थिक आणि वित्तीय तूट, कर्जाचा मोठ्या प्रमाणावरील बोजा आणि आर्थिक दिवाळखोरी या गर्तेत सापडलेल्या या देशाला तब्बल दोन वेळा चलनाचे अवमूल्यन करून आणि अनेक धाडसी आर्थिक सुधारणा राबवून आर्थिक पतनापासून नुसते वाचवले नाही, तर 'परचेसिंग पॉवर पॅरिटी' या निकषावर त्यांनी या देशाला जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था म्हणून पुढे आणले. ही किमया साध्य करण्याच्या त्यांच्या अर्थशास्त्रीय कौशल्याचा देखील अभ्यास होणे अपेक्षित आहे. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात दादाभाई नौरोजींनी ज्या पद्धतीने 'ड्रेन थेअरीद्वारे भारतातील 'संपत्तीचे वहन' इंग्लंडला कसे होते? याचे विश्लेषण केले. अगदी त्याचप्रमाणे डॉ. सिंग यांनी नवउदारमतवादी विचारांच्या आजच्या काळात भारतातून होणाऱ्या 'ब्रेन ड्रेन' म्हणजेच 'बौद्धिक संपदेचे होणारे परदेशी वहन' या विषयाकडे सर्वांचे लक्ष वेधले कारण 'जनसांख्यिकीय लाभांश' सर्वाधिक असणाऱ्या सध्याच्या काळात भारताने जर आपली 'बौद्धिक मत्ता' की, जी तरुणाईच्या स्वरूपात आपल्याला सर्वाधिक लाभली आहे, तिचे होणारे विकसित परकीय देशांमधील वहन थांबवले नाही, तर आपण विकसित देश म्हणून आर्थिक विकासाचा टप्पा कधीच गाठू शकत नाही. यावर त्यांनी केलेले भाष्य आजही आपल्या डोळ्यात अंजन घालणारे असेच आहे. अशा अनेक गोष्टी डॉ. मनमोहन सिंग यांच्या अर्थशास्त्रीय योगदानात अंतर्भूत आहेत. त्यादृष्टीने संशोधकांनी पुढील मुद्द्यांना स्पर्श करणारे शोधनिबंध अधिवेशनाकरता पाठविणे अभिप्रेत आहे.

**शोधनिबंधाकरिता मार्गदर्शक विषयांची सूची :**

१) डॉ. मनमोहन सिंग यांचे अर्थशास्त्रीय संशोधन व सैद्धांतिक मांडणी.
२) प्रोफेसर मिसेस जोन रॉबिन्सन यांचा वैचारिक प्रभाव आणि डॉ. मनमोहन सिंग.
३) अर्थतज्ज्ञ : डॉ. मनमोहन सिंग जीवन व कार्य.
४) डॉ. मनमोहन सिंग; मौद्रिक धोरण विषयक नीती.
५) राजकोषीय धोरणातील डॉ. मनमोहन सिंग यांची नवी वैचारिक दिशा.
६) भारतीय अर्थव्यवस्थेला जागतिकीकरणाकडे घेऊन जाणारा प्रणेता : डॉ. मनमोहन सिंग.
७) भारतीय अर्थव्यवस्थेचे उदारीकरण आणि डॉ. मनमोहन सिंग.
८) भारतीय अर्थव्यवस्थेतील खाजगीकरण आणि निर्गुंतवणुकीचे पुरस्कर्ते डॉ. मनमोहन सिंग.
९) डॉ. मनमोहन सिंग यांच्या पंतप्रधान पदाच्या काळातील लोककल्याणकारी योजनांचा चिकित्सक आढावा.
१०) ९० च्या दशकातील नवीन आर्थिक सुधारणा आणि डॉ. मनमोहन सिंग.
११) डॉ. मनमोहन सिंग एक जागतिक कीर्तीचे अर्थतज्ज्ञ.
१२) भारताचा आंतरराष्ट्रीय व्यापार याविषयीचे डॉ. मनमोहन सिंग यांचे विचार.
१३) शेतकरी कर्जमाफी आणि डॉ. मनमोहन सिंग.
१४) देशाचे सर्वोत्तम अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग.
१५) नवसनातनवादी अर्थ विचार आणि डॉ. मनमोहन सिंग
१६) नवउदारमतवाद आणि डॉ. मनमोहन सिंग.
१७) मुक्त अर्थव्यवस्था आणि कल्याणकारी राज्य यांचा दुवा सांधणारे मनमोहन सिंग.
१८) डॉ. मनमोहन सिंग आणि BOT, goP, FDI विषयक नवीन सुधारणा.
१९) WTO, IMF या जागतिक वित्तीय संस्था आणि पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांची भारतासाठीची धोरणात्मक नीती.
२०) अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांचा १९९१ मधील ऐतिहासिक अर्थसंकल्प आणि नवीन आर्थिक सुधारणा.

२१) दुसरी हरित क्रांती आणि डॉ. मनमोहन सिंग.

२२) भारताची अन्नसुरक्षितता आणि डॉ. मनमोहन सिंग.

२३) भारतीय बौद्धिक संपदा व त्याचे रक्षण आणि डॉ. मनमोहन सिंग

२४) भारतातील सर्वात मोठी शेतकरी कर्जमाफी आणि डॉ. मनमोहन सिंग.

२५) मनरेगा, ग्रामीण विकास याबाबतचे पंतप्रधान डॉ. सिंग यांचे योगदान.

२६) भारत-अमेरिका अनुकरार : डॉ. मनमोहन सिंग यांचा भू-अर्थ-राजकीय दृष्टिकोन.

**संशोधनाकरता संदर्भ ग्रंथांची यादी-:**


१) Daman Singh : Strictly Personal Manmohan and Gurusharan- February 2014.

२) Sanjay Baru : Accidental Prime Minister 22 March 2017.

३) गिरीश कुबेर : मार्दवी मार्तंड- दैनिक लोकसत्ता, संपादकीय, २८ डिसेंबर २०२४.

४) व्यंकटेश केसरी - मृदुभाषि...कणखर-महाराष्ट्र टाइम्स, २९ डिसेंबर २०२४

५) डॉ. विजय काकडे - डॉ. मनमोहन सिंग : परिवर्तनाचे शिल्पकार- प्रबोधन प्रकाशन ज्योती, इचलकरंजी, वर्ष ३६, अंक ४४६, जानेवारी २०२५, पृष्ठ कृ. १२ ते १८.

६) प्रो.(डॉ.) पी. एस. कांबळे- आंतरराष्ट्रीय कीर्तीचे अर्थशास्त्रज्ञ आणि विकास धोरणकर्ते : डॉ. मनमोहन सिंग - प्रबोधन प्रकाशन ज्योती, इचलकरंजी, वर्ष ३६, अंक ४४६, जानेवारी २०२५, पृष्ठ कृ. १९ ते २२.

७) एक अर्थ पर्व लयाला - शंतनु किसाळकर - दै. मुक्तागिरी- ३० डिसेंबर २०२४.

८) शेतकऱ्यांप्रति संवेदनशील नेता - डॉ. बुधाजीराव मुळीक - दै. पुढारी - ३१ डिसेंबर ३०२५.

९) भविष्यवेधी दीपस्तंभ - संपा. दै. ऐक्य - २९ डिसेंबर, २०२४.

१०) शांतवृत्तीचे सुधारणावादी - संपा. दै. प्रभात - २९ डिसेंबर, २०२५.

११) देश घडवणार नेता - संपा. - दै. लोकमत ३० डिसेंबर २०२४.

१२) कर्मयोगी - संपा. दै.पुण्यनगरी-२ जानेवारी २०२५.

१३) शांत वृत्तीचा सुधारणावादी - संपा. दै. लोकमत, ३० डिसेंबर २०२४.

१४) मनमोहन भेट - विठ्ठल मनियार - दै. सकाळ- २९ डिसेंबर,२०२४.

१५) मनमोहन सिंग यांनी आपल्याला काय दिले - श्रीपाद ब्रम्हे- दै. लोकसत्ता - २९ डिसेंबर, २०२४.

१६) मृदुभाषी कणखर - व्यंकटेश केसरी - दै. प्रभात २९ डिसेंबर २०२४.

१७) भारताचा शिल्पकार - संपा. दै. महाराष्ट्र टाइम्स- २९ डिसेंबर २०२४.

१८) कर्तासुधारक - संपा.- दै. सकाळ २०२४.

१९) भविष्यवेधी दीपस्तंभ - संपा. दै. ऐक्य-२९ डिसेंबर, २०२४.

२०) Dr. Manmohan Singh - “India's Export Trends and Prospects for Self-Sustained Growth” -Clarendon Press, Oxford University, 1964

२१) भारतीय नवीन आर्थिक सुधारणांचे पितामह - प्रा. किशोर जी. सुतार - अर्थवेध - https://youtu.be/rDkkGzV5nWg?si=Znz4ZNkUTie_-Z8B


◆

# जोखीम आणि परताव्याचे आर्थिक सिद्धांतन

**सुभाष सावंत** †

**प्रस्तावना**

'उच्च जोखीम उच्च परतावा' हे ब्रीद वाक्य नेहमीच आपण ऐकत असतो. अर्थशास्त्रात जोखीम म्हणजे अपेक्षित निष्पत्तीपेक्षा वेगळे घडण्याची शक्यता होय किंवा अपेक्षित निष्पत्ती प्राप्त होण्याची अनिश्चितता म्हणजे जोखीम होय. जोखीमेमुळे संभाव्य नफा किंवा तोटा कमी जास्त होऊ शकतो. जोखीम ही मूलत: गुंतवणूक आणि आर्थिक निर्णयाशी संबंधित आहे जी निष्पत्तीच्या अनिश्चिततेमुळे उद्‌भवते, तर परतावा म्हणजे केलेल्या किंवा घेतलेल्या निर्णयामुळे मिळणारा मोबदला होय. आर्थिक निर्णयप्रक्रियेमध्ये घेतले जाणारे निर्णय हे काहीतरी परतावा मिळावा या अपेक्षेने घेतले जातात. परतावा ही संकल्पना मूलत: गुंतवणुकीसंदर्भात आणि काही प्रमाणात संयोजक या घटकाला मिळणाऱ्या मोबदल्याशी निगडित आहे. कारण या दोन्ही घटकांना मिळणारा मोबदला हा निश्चित नसतो. त्यामुळे मोबदल्याच्या अपेक्षेने लोक किंवा संस्था जोखीम पत्करत असतात आणि या जोखमी पत्करण्याबद्दल त्यांना परतावा मिळत असतो. आर्थिक निर्णयप्रक्रिया ही 'जोखीम आणि परतावा' यांच्यातील तडजोडभोवती केंद्रित झाल्याचे दिसून येते.

प्रत्येक व्यक्ती आणि संस्था यांना प्रत्येक वेळी काही जोखमींना सामोरे जावे लागते. उदाहरणार्थ, शेतकऱ्यांना गारपीट, कमीअधिक पर्जन्यमान, हवामान, निविष्ठीची उपलब्धता आणि किमती, पिकांना मिळणाऱ्या भावातील बदल इ. जोखमींना नेहमीच सामोरे जावे लागते. उद्योजकांनाही नैसर्गिक विपदा, मालमत्तेचे नुकसान, अपघात, दिवाळीखोरी, नफा, विक्री, स्पर्धा, नवीन विक्रेत्याचे आगमन यांसारख्या जोखीमांना अपरिहार्यपणे सामोरे जावे लागते. व्यक्ती अपघात, भूकंप, आजार, स्वकीयांचा मृत्यू यांसारख्या जोखीमांचा सामना करावा लागतो. थोडक्यात, जोखीम ही सार्वत्रिक आहे आणि व्यक्तींना त्यांना सामोरे जावे लागते.

**आर्थिक जोखीम आणि इतर जोखीम**

मॅगोल्ड्ट यांनी सर्वप्रथम आर्थिक जोखीम आणि इतर जोखीम मध्ये फरक करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या मते, निष्पत्तीची अनियमिता आणि आर्थिक जोखीम यात फरक केला पाहिजे. परंतु जॉन हेन्स यांच्या मते, आर्थिक जोखीम आणि इतर जोखमींमध्ये फरक करण्याचा कोणताही मार्ग नाही. मानवाची प्रत्येक

† प्राध्यापक व विभागप्रमुख, भोसला मिलिटरी कॉलेज, नाशिक.
आजीव सभासद क्र. १७०३, भ्रमणध्वनी : ७५८८६४९६८३, ईमेल: subhash.sawant@bmc. bhonsala.in

जोखीम अर्थशास्त्राच्या कक्षेत येतो. कारण जेव्हा केव्हा व्यक्ती आर्थिक क्रियांमध्ये सहभागी होतो तेव्हा तो कुठल्या ना कुठल्या जोखीमांचा सामना करत असतो किंवा व्यक्ती जेव्हा जोखमीचा सामना करतो तेव्हा त्याच्या आर्थिक परिस्थितीवर जोखमीचा काही ना काही परिणाम होत असतो. जॉन हेन्स यांच्या मते, जोखीम हा एक आर्थिक घटक आहे.

जेव्हा लोक त्यांच्याकडे असणारे पैसे मुदत ठेवी किंवा इतर कोणत्याही सुरक्षित मत्तांमध्ये गुंतवतात तेव्हा ते त्यांची जोखीम कमी करत असतात किंवा काही वेळा ते कुठलीही जोखीम पत्करत नसतात. जोखीम न पत्करण्यासाठी त्यांना कोणतीही भरपाई किंवा वाढीव परतावा मिळू शकत नाही. यामुळेच वाढीव परतावा मिळण्यासाठी लोक अधिक जोखीम घेण्याचा प्रयत्न करतात. त्या दृष्टीनेच उच्च जोखीम उच्च परतावा या ब्रीदवाक्याकडे पाहिले जाते.

**जोखीम आणि नफा**

आर्थिक निर्णयप्रक्रियेमध्ये संयोजक आणि गुंतवणूकदार हे अधिकचा परतावा मिळावा म्हणून कमी अधिक जोखीम स्वीकारत असतात. त्यामुळे त्यांना मिळणारा मोबदला हा जोखमीचे फल आहे असे मानले जाते. संयोजकाला मिळणारा मोबदला म्हणजे नफा हा सुद्धा जोखीममुळे प्राप्त होतो असे मानणारे काही अर्थशास्त्रज्ञ आहेत. प्रा. हॉवली (Hawley) यांनी नफ्याचा जोखीम सिद्धांत सर्वप्रथम मांडला. प्रा. हॉवली (Hawley) यांच्या मते, संपूर्ण व्यवसायातील जोखीम घेण्याचा मोबदला किंवा लाभ म्हणजे नफा होय. संयोजक वगळता आर्थिक क्रियांमध्ये सहभागी होणाऱ्या जमीन, कामगार आणि भांडवलदार यांना उद्योजकाकडून त्यांच्या हमीदराप्रमाणे उत्पन्न प्राप्त होते. परंतु संयोजकाला मात्र मिळणाऱ्या परताव्याची म्हणजेच नफ्याची कुठलीही हमी नसते, त्याला मिळणारा नफा हा त्याने पत्करलेल्या जोखीमेमुळे मिळत असतो. त्यामुळेच हॉवली संयोजकाला मिळणारा मोबदला हा त्याने पत्करलेल्या जोखीममुळे प्राप्त होतो असे म्हणतात. उत्पादन जुने होणे, किमतीतील चढ-उतार, स्पर्धा, स्पर्धकांची नवीन उत्पादने, सामग्रीची अनुउपलब्धता, युद्ध, आग, नैसर्गिक आपत्ती इत्यादीमुळे व्यवसायात जोखीम निर्माण होऊ शकतात. हॉवली यांनी जोखीम घेणाऱ्यांना उत्पादनाचा अनिवार्य घटक मानले. त्यांच्या मते, संयोजकाने पत्करली जोखीम जितकी अधिक तितका त्याचा नफा अधिक असला पाहिजे. कारण जोखमीच्या व्यवसायातून मिळणारा परतावा आणि सुरक्षित गुंतवणुकीतून मिळणारा परतावा समान असेल, तर कुठलाही उद्योजक त्याचे भांडवल धोकादायक व्यवसायात गुंतवणार नाही. अधिकच्या नफ्याच्या प्रेरणामुळेच उद्योजक जोखीम घेऊन व्यवसाय करत असतात. आधुनिक अर्थशास्त्रज्ञांना संयोजकांना मिळणारा नफा काही काही प्रमाणात जोखमीमुळे प्राप्त होत असला तरी तो केवळ जोखीम पत्करण्यामुळे मिळतो हे मान्य नाही.

प्राध्यापक फ्रँक नाईट यांनी प्रा. हॉवली (Hawley) यांच्या नफ्याच्या जोखीम सिद्धांतात सुधारणा करून नफ्याचा अनिश्चितता सिद्धांत मांडला. नाईट यांच्या मते, व्यवसायात उद्भवणाऱ्या जोखीमांची मापनक्षम आणि अ-मापनक्षम जोखीम अशा दोन गटांत वर्गीकरण करता येते. अपघात, कामगारांचे मृत्यू, आग, उत्पादनातील त्रुटी, भांडवली वस्तूंची झीज इत्यादी संदर्भात असणाऱ्या जोखीम गतकालीन माहितीच्या आधारे संयोजकांना मोजता येऊ शकतात. अशा मापनक्षम जोखमींसाठी संयोजक विमा, राखीव निधी, घसारा किंवा इतर स्वरूपात खर्च करू शकतो आणि त्याचा समावेश एकूण खर्चात करू शकतो. त्यामुळे ज्या जोखीम मोजता येतात आणि ज्यांचा विमा घेता येतो, त्या प्रकारच्या जोखीम संयोजकाला नफा मिळवून देत नाहीत. कारण त्यांचा समावेश उत्पादन खर्चात

केला जातो. याउलट बाजारातील वाढती स्पर्धा, नवनवीन उत्पादनांचा बाजारातील प्रवेश, उपभोक्त्यांच्या आवडीनिवडीमधील बदल, फॅशनमधील बदल यासारख्या जोखीमांचे सांख्यिकीयदृष्ट्या मोजमाप करणे शक्य नाही. अशा अ-मापनक्षम जोखीमांचा कुठल्याही प्रकारचा विमा घेता येत नाही. त्यामुळे अशा विमा न घेता येणाऱ्या अ-मापनक्षम जोखीमांना नाईट अनिश्चितता असे म्हणतात. नाईट यांच्या मते, संयोजकांना मिळणारा मोबदला हा विमायोग्य जोखीममुळे मिळत नसतो, तर तो विमा उतरवता न येणाऱ्या अ-मापनक्षम जोखमीमुळे मिळत असतो, म्हणजेच तो अनिश्चिततेमुळे मिळत असतो.

**जोखीम प्रकार :**

गुंतवणुक वैयक्तिक असो किंवा उद्योग संस्थांची त्या संदर्भातले निर्णय हे नेहमीच जोखीम आणि परतावा यातील तुलनात्मक विश्लेषणावर घेतले जातात. अर्थशास्त्रात मुख्यत: दोन प्रकारच्या गुंतवणूक जोखीम आहेत. सिस्टिमॅटिक किंवा रचनात्मक जोखीम आणि अनियमित जोखीम.

**सिस्टिमॅटिक किंवा रचनात्मक जोखीम :**

संपूर्ण बाजारावर किंवा बाजाराच्या मोठ्या भागावर परिणाम करणाऱ्या जोखमेला सिस्टिमॅटिक किंवा रचनात्मक जोखीम असे म्हणतात. या जोखमीस बाजार जोखीम म्हणूनही ओळखले जाते. आर्थिक मंदी, महागाई, व्याजदरातील बदल, राजकीय अस्थिरता, चलनाच्या विनिमय दरातील बदल यांसारख्या समग्र आर्थिक चलातील बदलांमुळे या प्रकारची जोखीम निर्माण होतात. या जोखमीचे काटेकोरपणे मोजमाप किंवा अंदाज घेता येत नाही आणि विविधीकरणाद्वारे या जोखीम टाळता येत नाहीत. त्यामुळे गुंतवणूकदारांना अशा गुंतवणुकींना सामोरे जाण्यासाठी नेहमीच तयार राहावे लागते. सिस्टिमॅटिक किंवा रचनात्मक जोखीमचे खालील प्रकार आहेत.

**बाजार जोखीम:**

गुंतवणूक विशेषत: समभागातील गुंतवणूक ही अल्पकाळात वेगवेगळ्या घटकांनी प्रभावित होत असते. गुंतवणुकीतील परतावा ज्या घटकांमुळे प्रभावित होतो त्याला एकत्रितपणे बाजार जोखीम असे म्हणतात. समभागाच्या किमती विविध सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि मानसिक घटकांनी प्रभावित होत असतात. व्यापारचक्रातील बदल हे बाजार जोखीमांचा मुख्य स्त्रोत आहे. आर्थिक संकट किंवा आर्थिक मंदीमुळे सर्व अर्थव्यवस्था ही मंदीकडे जाते. त्यामुळे कुठल्याही प्रकारच्या केलेल्या गुंतवणुकीवरील मोबदलाही कमी होतो. कोणतीही अर्थव्यवस्था नेहमी तेजीच्या अवस्थेत राहात नसते, ती पुन्हा पुन्हा तेजी-मंदीची अवस्थेतून मार्गक्रमण करत असते. जेव्हा जेव्हा अशी अर्थव्यवस्था मंदीतून जात असते तेव्हा व्यवसाय आणि गुंतवणुकीतील जोखीम मोठ्या प्रमाणात वाढते. अशावेळी भांडवल बाजारात केलेली गुंतवणूक नेहमीच अधिक परतावा देत असते. उदाहरणार्थ, २००८ च्या आर्थिक संकटामध्ये गुंतवणूक केलेल्या गुंतवणूकदारांना मोठ्या प्रमाणात फायदा झाल्याचे दिसून येते. तसेच २०२० मध्ये आलेल्या कोरोना महामारीच्या संकटात गुंतवणूक करणाऱ्या गुंतवणूकदारांना मोठ्या प्रमाणात परतावा मिळाल्याचे दिसून येते. कॅम्पबेल (१९९६) यांच्या मते, बाजार जोखीम समभाग बाजारातील अतिरिक्त परतावा निश्चित करणारा मुख्य घटक आहे.

**महागाई :**

महागाई नेहमीच गुंतवणुकीवर मिळणाऱ्या परताव्याचा मोठा हिस्सा भक्षण करत असते. गुंतवणुकीवर मिळणारा परतावा हा महागाईपेक्षा अधिक असेल तरच अशी गुंतवणूक फायदेशीर असते. जर गुंतवणुकीवर मिळणारा परतावा महागाईपेक्षा कमी असेल तर ती गुंतवणूक नुकसानकारक असते. यामुळे महागाई ही नेहमीच गुंतवणुकीवर परिणाम करत आहे.

महागाईमुळे लोकांच्या उपभोगावर आणि त्यामुळे व्यवसायावर परिणाम होतो. त्यामुळे व्यवसाय आणि गुंतवणुकीतून मिळणाऱ्या परताव्यावरही महागाईचा परिणाम होतो.

**व्याजदरातील बदल:**

व्याजातील बदल हे वेगवेगळ्या मत्तांवर भिन्न प्रकारे परिणाम करत असतात. गुंतवणूकदार नेहमीच जोखीम मुक्त व्याजदर (Risk Free Rate of Interest) आणि गुंतवणुकीवरील अपेक्षित परतावा यांची तुलना करत असतो. बाजारातील व्याजदर आणि सरकारी रोख्यांवरील जोखीम मुक्त व्याजदर हे परस्पराशी जोडलेले असतात. व्याजदरातील बदलामुळे रोखे आणि ऋणपत्र (bond and debenture) यासारख्या स्थिर उत्पन्न देणाऱ्या उत्पादनांच्या बाजार किमतीत आणि परताव्यात होणारा बदल म्हणजे व्याजदर जोखीम होय. रोखे आणि ऋणपत्र यांच्या किमती आणि व्याजदर यांच्यात व्यस्त संबंध असतो. सामान्यतः महागाईच्या काळात व्याजदर वाढतात. या वाढत्या व्याजदरामुळे समभाग आणि बोंड बाजारात मिळणारा परतावा कमी होतो.

**राजकीय अस्थिरता:**

राजकीय अस्थिरता, शासकीय धोरणातील अचानक होणारे बदल यामुळे गुंतवणुकीतील जोखीम वाढते आणि त्याचा परिणाम परताव्यावर होत असतो. स्थिर सरकार अर्थव्यवस्थेला गती देण्याचे काम करते.

**चलन जोखीम:**

विदेशी चलन बाजारातील चढउतारामुळे गुंतवणुकीवर परिणाम होऊ शकतो. विशेषत: विदेशी व्यापारात सहभागी व्यवसायांवर त्याचा अधिक मोठ्या प्रमाणात परिणाम होतो. वरील प्रकारच्या रचनात्मक जोखीम या मत्तांच्या विविधीकरणाद्वारे टाळता येत नाहीत कारण गुंतवणुकीच्या सर्व क्षेत्रांवरती त्या कमी अधिक सारखाच परिणाम करतात. या जोखीम मत्तांच्या विविधीकरणाद्वारे टाळता येत नसल्या तरी गुंतवणुकीवर होणाऱ्या अपेक्षित परिणामांचा योग्य अंदाज घेऊन त्यांचा परिणाम कमी करता येऊ शकतो.

**अनियमित किंवा अनसिस्टिमॅटिक जोखीम:**

जी जोखीम विशिष्ट उद्योग संस्था उद्योग किंवा गुंतवणूक यांच्याशी निगडित असते अशा जोखमींना अनियमित जोखीम किंवा अनसिस्टिमॅटिक जोखीम असे म्हणतात. या प्रकारच्या जोखीमला विशिष्ट जोखीम किंवा विविधीकरणक्षम जोखीम असेही म्हणतात. उद्योग संस्थेच्या व्यवस्थापनामधील बदल, एखाद्या उद्योग संस्थेच्या उत्पादनातील त्रुटी किंवा असे त्रुटी पूर्ण उत्पादन परत बोलवण्याची जोखीम, कामगारांचे संप, कायदेविषयक तंत्रज्ञानातील सुधारणांमुळे व्यवसायात येणारे अडथळे यामुळे एखादा उद्योग किंवा उद्योग संस्थेला अनियमित जोखमींना सामोरे जावे लागते. या जोखीम विशिष्ट उद्योग संस्था किंवा कंपनीशी निगडित असल्यामुळे गुंतवणूकदार या प्रकारच्या जोखमा विविध मत्तांमधील गुंतवणुकीद्वारे/ विविधीकरणाद्वारे टाळू शकतात.

**जोखीमेचे मापन**

विशिष्ट गुंतवणूक, प्रकल्प, वित्तीय निर्णय यामध्ये असणाऱ्या अनिश्चिततेचे प्रमाण माहीत करून घेण्यासाठी सांख्यिकीय व गणितीय साधनांचा वापर केला जातो. सांख्यिकी आणि गणितीय साधनांच्या साहाय्याने विशिष्ट गुंतवणुकीतील अनिश्चितता मापने म्हणजे जोखमीचे मापन होय. उपलब्ध सांख्यिकीय माहिती आणि जोखमेचे स्वरूप यावरती जोखीम मापनाची पद्धत किंवा तंत्र अवलंबून असते. जोखीम मापन करण्यासाठी खालील पद्धतींचा वापर केला जातो.

**प्रमाण विचलन:**

मध्यापासूनचे विचरण मोजण्यासाठी प्रमाण विचलनाचा वापर केला जातो. बाजारातील चढ-उतार किंवा गुंतवणूक केलेल्या मत्तांच्या किमतीतील चढउतार म्हणजेच जोखीम दाखवण्याचे काम प्रमाण विचलन

करते. प्रमाण विचलन मूल्य जेवढे अधिक तेवढा अवलोकनातील एकजन्सीपणा कमी (म्हणजेच गुंतवणूक मत्तांच्या किमतीमधील चढउतार जास्त असतात) आणि प्रमाण विचलन मूल्ये जितके कमी तितका अवलोकनातील एकजन्सीपणा जास्त असतो (म्हणजेच गुंतवणूक मत्तांच्या किमतीमधील चढउतार कमी असतात). प्रमाण विचलन सिगमा () या ग्रीक शब्दाने दर्शवले जाते.

**विचरण गुणांक** (CV):

अपेक्षित परताव्याच्या तुलनेत प्रमाण विचलन मोजण्याचे गणितीय तंत्र म्हणजे विचरण गुणांक होय. विचरण गुणांक गुंतवणुकीतील प्रतिएकका मागे असणारी जोखीम दर्शवण्याचे काम करते.

*१००

**अल्फा मूल्य / गुणांक** (α):

एखादा समभाग किंवा म्युचल फंड योजनेतील जोखमी आणि बाजारातील एकूण जोखम किंवा विशिष्ट बेंचमार्क निर्देशांकांची जोखीम यांची तुलना करण्यासाठी अल्फा मूल्याचा वापर केला जातो.

**बीटा गुणांक** (β):

एकूण बाजारातील किंवा विशिष्ट बेंचमार्क निर्देशांकातील चढउताराच्या तुलनेत एखाद्या समभागातील चढ-उतार मापनासाठी बीटा गुणांक या तंत्राचा वापर केला जातो.

β =१ म्हणजे समभाग किमती आणि बाजार एकाच दिशेला जातील म्हणजेच दोन्हीतील जोखीम समान असेल.

β < १ म्हणजे समभाग जोखीम बाजारपेक्षा कमी असेल.

β > १ म्हणजे समभागातील जोखीम बाजारापेक्षा अधिक असेल.

**शार्प गुणोत्तर** (Sharpe Ratio):

गुंतवणूकदाराने घेतलेल्या प्रति एकक जोखीममागे प्राप्त होणारा अतिरिक्त परतावा मोजण्याचे काम शार्प गुणोत्तर करते. उच्च शार्प गुणोत्तर जोखीम समायोजित कामगिरीचे (परताव्याचे) प्रदर्शन करते.

**परतावा मापन:**

विशिष्ट गुंतवणूक मिळणार मोबदला म्हणजे परतावा होय. परतावा मोजण्याच्या खालील पद्धती आहेत.

**शुद्ध/निरपेक्ष परतावा** (Absolute Return):

विशिष्ट गुंतवणुकीवर एकूण गुंतवणूक काळात मिळालेला एकूण परतावा म्हणजे शुद्ध परतावा होय. एखाद्या मत्तेच्या मूल्यांमध्ये झालेली एकूण वृद्धी किंवा घट मोजण्याचे काम शुद्ध परतावा करते. शुद्ध परतावा टक्केवारी मध्ये दर्शवला जातो.

)*१००

**वार्षिक परतावा** (Annualized Return):

गुंतवणुकीच्या निर्णयप्रक्रियेमध्ये सर्वाधिक महत्त्वाचा घटक म्हणजे वार्षिक परतावा दर होय. एखाद्या गुंतवणुकीवर एकूण गुंतवणूक काळात प्रत्येक वर्षी मिळवलेला सरासरी परतावा म्हणजे वार्षिक परतावा होय. वार्षिक परतावा मोजण्याची सूत्र खालीलप्रमाणे आहे.

) - १

n = एकूण गुंतवणूक वर्ष

**सारांश**

जोखीम आणि परतावा यांचे विश्लेषण करताना खालील विषयांचा अभ्यास यात होऊ शकतो. खालील विषय हे केवळ उदाहरणादाखल आहेत. संशोधक त्यात त्यांच्या अनुभवाप्रमाणे आणि समस्येप्रमाणे भर घालू शकतात.

- जोखीम आणि नफा
- व्यापारचक्र आणि नफा
- व्यापार चक्र आणि परतावा
- विविध मत्ता आणि परतावा यांच्यातील तुलनात्मक अभ्यास

- विविध मत्तांमधील जोखीम
- व्याजदर आणि परतावा
- सरकारी धोरण आणि परतावा
- तांत्रिक प्रगती आणि परतावा
- तांत्रिक धक्के (Technological disruption) आणि परतावा
- जोखीम आणि परतावा विश्लेषण
- विनिमय दरातील बदल आणि परतावा
- अनिशचितता, जोखीम आणि परतावा

**संदर्भ ग्रंथ सूची**


- Hawley, Fredrick B., Enterprise and Profit, The Quarterly Journal of Economics, Vol. 15 No.1 (Nov. 1900).
- Haynes, John, Risk as an Economic Factor, The Quarterly Journal of Economics, Vol. 9, No. 4 (Jul., 1895).
- Chmpbell, Y. B., Understanding of risk and return, The journal of political Economy, Vol. 104, No.2 (April 1996).
- Arora, A. K. (2021), Financial Risk Management, Wiley India Pvt. Ltd., Noida.
- Vose, David (2008), Risk Analysis: A Quantitative Guide, Wiley India Pvt. Ltd., Noida.
- Indian Institute of Banking and Finance (2019), Treasury, Investment and Risk Management, Taxmann Publications Pvt. Ltd.


◆

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारितोषिक

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने मराठी भाषेत प्रकाशित झालेल्या अर्थशास्त्रीय ग्रंथास रु. १०००/- चे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारितोषिक प्रतिवर्षी देण्यात येते. १ जानेवारी, २०२४ ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत प्रकाशित मराठीतील अर्थशास्त्रीय ग्रंथाच्या लेखकांना (मराठी अर्थशास्त्र परिषदेचे आजीव सभासद असणे आवश्यक) स्पर्धेत सहभागी होता येईल. नमुन्यातील अर्ज, संबंधित ग्रंथाच्या चार प्रती कार्यवाहांकडे ३० ऑगस्ट २०२५ पर्यंत पोहचतील या बेताने पाठवावे. ०२, ०३ व ०४ नोव्हेंबर २०२५ रोजी शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला येथे संपन्न होत असलेल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४८ व्या राष्ट्रीय अधिवेशनात हे पुरस्कार प्रदान केले जातील.

**पत्रव्यवहारासाठीचा पत्ता**


कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद, डॉ. मारोती तेगमपुरे, 'संगाई', घर क्रमांक २२, भालचंद्र पेट्रोल पंपाच्या मागे, शहीद भगतसिंग नगर, पारनेर रोड, अंबड, जि. जालना ४३१२०४ (भ्रमणध्वनी: ९४२३९९३१३७)

**- डॉ. मारोती तेगमपुरे**

कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,

# महाराष्ट्रातील व्यसनाधिनतेचे सामाजिक व आर्थिक पैलू

**मारोती तेगमपुरे** †

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४८ व्या वार्षिक अधिवेशनासाठी राज्यपातळीवरील चर्चेचा विषय म्हणून महाराष्ट्रातील व्यसनाधिनतेचे सामाजिक व आर्थिक पैलू हा विषय निश्चित करण्यात आला असून, या विषयावर शोधनिबंध लिहिणाऱ्या संशोधकांसाठी काही मुद्दे उपस्थित करीत आहे.

व्यसनामुळे अनेक कुटुंबाचा सामाजिक / आर्थिक दर्जा खालावल्याचे आपण पाहतो /वाचतो/अनुभवतो. कोणत्याही प्रकारच्या व्यसनामुळे व्यक्तीची एकूणच नैसर्गिक कार्यक्षमता क्षीण होऊन जाते. व्यसनाधीन व्यक्ती निर्व्यसनी व्यक्तीसारखे सातत्यपूर्ण कार्य करू शकत नाही. प्रथम व्यसन नेमकेपणाने कशास म्हणावे / म्हटले जाते हे समजून घेण्याचा प्रयत्न करू.

व्यसन, चटक, खोड म्हणजे एखाद्या पदार्थाचे किंवा विशिष्ट कृतीचे इतके जास्त प्रमाणामध्ये सेवन करणे किंवा त्यात गुंतणे की त्यामुळे व्यक्तीच्या आरोग्याला, सामाजिक जीवनाला किंवा मानसिक स्थितीला हानी पोहोचते. व्यसन म्हणजे जेव्हा तुम्हाला काहीतरी करण्याची किंवा वापरण्याची गरज किंवा आग्रह असतो, जरी त्यामुळे नुकसान होत असले तरीही व्यक्ती होणाऱ्या नुकसानीकडे दुर्लक्ष करून त्याकडे पुन्हा पुन्हा आकर्षित होतो. नशा देणाऱ्या पदार्थाचे किंवा मादक पदार्थाच्या सेवनाने मानवी शरीराच्या मज्जासंस्थेवर परिणाम होऊन गुंगी/निद्रा येणे, शरीराचे अवयव शिथिल पडणे, ग्लानी येणे, विचारशक्तीचा ऱ्हास इत्यादी प्रकार घडतात. मात्र मादक पदार्थाच्या सेवनाने मनावरील दडपण निघून जाते किंवा कमी होते. या मादक द्रव्याची मग शरीराला सवय लागते. अशा पदार्थाचे वारंवार सेवन करण्याची सवय म्हणजे व्यसन होय, असे मत विकिपिडीयाने नोंदवले आहे.

व्यसनाच्या प्रकारांमध्ये पदार्थांचे व्यसन (जसे की, दारू, धूम्रपान किंवा ड्रग्ज) आणि पदार्थ नसलेले व्यसन (जसे की, जुगार किंवा खरेदी) या घटकांचा समावेश केला जात असला तरी आजरोजी हे एवढेच म्हणजे व्यसन असे आपणास म्हणता येत नाही. आज अनेक प्रकारांच्या व्यसनांचा उगम झाला असून त्याचे व्यक्ती म्हणून, समाज म्हणून, विविध गंभीर परिणाम जाणवत आहेत. सरळपणे व्यसनाचे दोन प्रकार सांगता येतील. व्यक्तीच्या आरोग्याला किंवा जीवनाला हानी पोहोचवणारा पदार्थ असला तरी तुम्ही त्याचा वापर

† अर्थशास्त्र विभागप्रमुख, गोदावरी कला महाविद्यालय, अंबड, जि. जालना ४३१२०४
आजीव सभासद क्र. १२९५, भ्रमणध्वनी :९४२३९९३१३७, ईमेल: drmaruti3137@gmail.com

सुरू ठेवता तेव्हा त्यास पदार्थांचे व्यसन म्हणता येईल व पदार्थ नसलेले व्यसन, ज्याला वर्तनात्मक व्यसनदेखील म्हणतात, त्यात अशा वर्तनांचा समावेश होतो जे नियंत्रित करणे एक कठीण कार्य होऊन बसते.

व्यसनाच्या लक्षणांमध्ये तुमच्या वर्तनावरील नियंत्रण गमावणे, सवयीवर जास्त वेळ घालवणे आणि तुमच्या जबाबदाऱ्यांकडे दुर्लक्ष करणे यांचा समावेश करता येईल. बऱ्याच प्रकरणांमध्ये, हे व्यसन तुमच्या आरोग्याला हानी पोहोचवू शकते आणि तुमच्या दैनंदिन जीवनावर नकारात्मक परिणाम करू शकते. यासंदर्भातील जाणीव व्यसनाधीन व्यक्तीला होऊनही / करून दिली जाऊनही व्यक्ती त्यापासून स्वतःला विलग करून घेत नाही/ घेऊ शकत नाही. दारू, कॅफिन, गांजा, हॅलुसिनोजेन, जसे की पीसीपी आणि एल. एस. डी. झोपेच्या गोळ्या, बेंझोडायझेपाइन्स आणि बार्बिट्यूरेट्ससारख्या संमोहन, शामक आणि चिंताविरोधी औषधे, इनहेलेंट्स, जसे की पेंट थिनर, एरोसोल स्प्रे, गॅसेस आणि नायट्रेट्स (पॉपर्स). कोडीन, ऑक्सीकोडोन आणि हेरॉइन सारखे प्रिस्क्रिप्शन आणि नॉन-प्रिस्क्रिप्शन ओपिओइड्स. प्रिस्क्रिप्शन आणि नॉन-प्रिस्क्रिप्शन उत्तेजक, जसे की अडरॉल, कोकेन आणि मेथाम्फेटामाइन. तंबाखू/निकोटीन, जसे की सिगारेट ओढणे आणि इलेक्ट्रॉनिक सिगारेट (ई-सिगारेट किंवा व्हेपिंग).

महाराष्ट्रातील व्यसनाधिनतेचे सामाजिक व आर्थिक पैलू यावर अभ्यास करीत असताना / निबंध लिहिताना प्रामुख्याने दोन-तीन बाबींचा विचार करता येऊ शकतो. यामध्ये आणखी काही मुद्द्यांची भरही पडू शकते. एक म्हणजे व्यसनाधिनतेमुळे संबंधितांच्या आरोग्यावर / कुटुंबावर (सामजिक/आर्थिक/मानसिक पातळीवर) / श्रमशक्ती - कामाच्या कुवतीवर - दर्जावर / कौटुंबिक आर्थिक घटकांवर होणारे परिणाम.

दुसरे म्हणजे राज्य/विभाग/जिल्हा/तालुका/गाव/ वस्ती/पाडा/टोला/तांडा यांच्या समाजजीवनावर (सामजिक/आर्थिक/मानसिक पातळीवर) होणारे परिणाम. यातील अभ्यासकांच्या दृष्टीने तिसरा घटक म्हणजे राज्याची अर्थव्यवस्था म्हणून व्यसन साधनसामुग्रीमुळे (तंबाखू/खरा/अल्कोहल- सर्व प्रकारची दारू / गांजा/चरस/आणि अन्य घटक) काय परिणाम होतो. कोणत्या व्यसन साधनसामुग्रीच्या माध्यमातून किती महसूल प्राप्त होतो. प्रत्यक्ष राज्याच्या महसुलात किती भर पडते व अन्य संबंधित यंत्रणेच्या तिजोरीत किती? यासंदर्भातील राजकीय अर्थव्यवस्था (पॉलिटिकल इकॉनॉमी) समजून घेता/देता येईल. याबरोबरच व्यसनाधिनतेच्या संदर्भात अभ्यास करीत असताना आपल्याला पुढील काही विषयांचाही विचार करता येईल.

- व्यसनांचा प्रदेश / विभागनिहाय अभ्यास करून विभागानुरूप त्यात वेगळेपण आहे की सारखेपणा आहे हे दाखवून देता येईल.
- आर्थिकदृष्ट्या दुर्बल गटातील व्यसन प्रकार आणि मध्यम-सधन कुटुंबातील व्यसन प्रकार या अनुषंगानेही अभ्यास करता येईल.
- भारतातील / राज्यातील पारंपरिक व्यसन पद्धती / प्रकार व आधुनिक व्यसन पद्धती / प्रकार यासंदर्भात तुलनात्मक अभ्यास करता येईल.
- व्यसनाधिनतेच्या संदर्भात अन्य राज्यांशी तुलना करून अर्थव्यवस्थात्मक पातळीवर काय परिणाम होतात याचाही अभ्यास केला जाऊ शकतो.
- व्यसनाधिनतेची कारणे, प्रकार, स्त्रियांची व्यसने, पुरुषांची व्यसने, व्यसनाची व्याप्ती, लहान मुले आणि व्यसने या दृष्टीनेही विचार करण्यास वाव आहे.
- व्यसनाधिनता आणि शिक्षण, आरोग्य, रोजगार, राहणीमान, आयुर्मान, प्रजनन दर या दिशेनेही अभ्यास करता येईल.

- उत्पादनाच्या बाजूने विचार करून कारण - राजकारण - समाजकारण आणि अर्थकारण सहसंबंधाचा अभ्यास करता येऊ शकेल.

उदा. गडचिरोली जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येच्या ४० टक्के महिला या व्यसनाच्या आहारी गेल्या आहेत. साधारणपणे गडचिरोलीचे जिल्ह्यात प्रतिवर्षी खरा या व्यसन प्रकारावर २९८ कोटी रुपये खर्च केले जातात. (अभय बंग) म्हणजेच राज्य सरकार जिल्ह्याच्या विकासप्रक्रियेसाठी जेवढी आर्थिक तरतूद करते त्यापेक्षाही अधिक रक्कम जिल्ह्यातील लोक खरा या व्यसन प्रकारावर खर्च करतात. या सर्वच गोष्टींचा साकल्याने विचार करून राज्यातील अन्य जिल्ह्यांत या व्यसनाच्या आहारी गेलेल्या व्यक्ती/समूहाकडून नेमकेपणाने किती खर्च होतो याचा प्रत्यक्ष सर्व्हेच्या माध्यमातून आपणास अभ्यास करता येईल.

संदर्भासाठी आपल्याला पुढील ग्रंथाचा / अहवालाचा आधार घेता येईल / प्रत्यक्ष सर्व्हेच्या माध्यमातूनही शोधनिबंधाची आखणी करता येईल.


- https://www.asam.org/quality-care/definition-of-addiction
- https://my.clevelandclinic.org/health/diseases/6407-addiction
- https://www.nhs.uk/live-well/addiction-support/addiction-what-is it #:~:text=Addiction%20is%20defined%20as%20not,could%20be%20harmful%20to%20you.
- https://en.wikpiedia.org/wiki/Addiction
- https://www.google.com/search?q=negative+effects+of+anime+addiction&sca_esv=5dbeab7b81d1ee5e&sxsrf=AE3TifO1u6_LlPQ7mf3tdtVRte9IL6bNKQ%3A1753335401750& source=hp &ei=acaBaL3gK-ORs
- अभय बंग, या जीवनाचे काय करू आणि निवडक, राजहंस प्रकाशन, पुणे.
- डॉ. कादरी ए. ए., व्यसनाधिनता, मानसिक आरोग्य केंद्र, औरंगाबाद.
- डॉ. जो. डिस्पेन्जा, ब्रेकिंग द हबीट ऑफ बिइंग योरसेल्फ - आपका मस्तिष्क ही सबकुछ है, प्रभात प्रकाशन प्रा. लिमिटेड, दिल्ली. जी. एम. देशपांडे, वाटचाल व्यसनमुक्तीकडे, मनोरमा प्रकाशन, मुंबई.


◆

विकासाला मानवाधिकाराचा मुद्दा म्हणून पाहिले पाहिजे केवळ सकल राष्ट्रीय उत्पादन वाढीचा प्रयत्न म्हणून नव्हे.

**- मुहम्मद युनुस**

# शोधनिबंध पाठविण्यासंबंधी सूचना

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४८ वे वार्षिक राष्ट्रीय अधिवेशन ०२,०३ व ०४ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला येथे होत आहे. शोधनिबंधासाठीची शब्दमर्यादा २००० व सोबत ३०० ते ४०० शब्दांत गोषवारा अत्यावश्यक आहे. शोधनिबंध मराठीतच असणे आवश्यक असून यापूर्वी तो इतरत्र प्रकाशित झालेला नसावा. शोधनिबंधावर आपला आजीव सदस्य क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक, ई-मेल, महाविद्यालयाचे नाव व पत्ता इत्यादी तपशील मराठीत देणे आवश्यक आहे. आपला शोधनिबंध (vilasbkhandare @gmail.com, maparishad1977@gmail.com) मेल करावा. शोधनिबंध ३० सप्टेंबर २०२५ रोजी पर्यंत मा. अध्यक्ष मराठी अर्थशास्त्र परिषद यांना पोहचतील या बेताने पाठवावेत.

**शोधनिबंधासाठी विषय**

- जोखीम आणि परताव्याचे आर्थिक सिद्धांतन.
- डॉ. मनमोहन सिंग यांचे अर्थशास्त्रीय योगदान.
- महाराष्ट्रातील व्यसनाधिनतेचे सामाजिक व आर्थिक पैलू.

**पत्रव्यवहारासाठी पत्ता**

प्रा.(डॉ.) विलास भिकाजी खंदारे,
अर्थशास्त्र विभागप्रमुख,
श्री. आसारामजी भांडवलदार महाविद्यालय,
देवगाव (रं.) जि. छत्रपती संभाजीनगर ४३१११५
मो. ९४२१३०१५३८
ई-मेल : vilasbkhandare@gmail.com
maparishad1977@gmail.com

**- डॉ. मारोती तेगमपुरे**
कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,

# ४८ वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन, अकोला
# निबंध लेखकांसाठी महत्त्वाच्या सूचना

१) चर्चासत्रासाठी विषयाचे जे शीर्षक जाहीर केलेले असते तेच शीर्षक आपल्याही निबंधाला देणे आवश्यक नाही. त्याच्या अंतर्गत एखादा उप-विषय निवडून त्या अनुषंगाने योग्य असे शीर्षक आपणास देता येईल.

२) सामान्यपणे विषयाचा ऐतिहासिक आढावा घेण्यासाठी पूर्ण निबंधाचा उपयोग करू नये. त्यात अनेक वादग्रस्त मुद्द्यांचे विश्लेषण असल्यास आणि त्यातून नवीन अर्थ लावण्याचा प्रयत्न करणार असल्याचा विस्तृत आढावा घ्यावा.

३) जी माहिती एम.ए. पर्यंतच्या पाठ्यपुस्तकांमध्ये उपलब्ध असते तिचा संदर्भ म्हणून उपयोग करावा. परंतु त्या पातळीचे विश्लेषण असू नये. कारण ते सर्वांना माहीत असते. त्या माहितीतील सांख्यिकी संबंध शोधून त्यापलीकडे जाऊन विश्लेषणाचा प्रयत्न करणे योग्य राहील.

४) समाजाच्या आर्थिक जीवनाचा (राष्ट्रीय / प्रादेशिक आणि आवश्यकतेनुसार स्थानिक) सामाजिक सांस्कृतिक जीवनाशी येणारा संबंध, त्यात होणारे बदल आणि शासनाचे आर्थिक धोरण यावर निबंधात त्या-त्या विषयाच्या अनुषंगाने भर असावा.

५) निबंधात वेगवेगळ्या भागामध्ये जे संबंध आपण दर्शवितो आणि निष्कर्ष प्रस्थापित करतो त्यांच्यात अंतर्गत सुसंगती साधण्याचा प्रयत्न केला जावा.

६) निबंधात शक्यतो महाराष्ट्र शासनाच्या भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या 'अर्थशास्त्र परिभाषा कोश' आणि 'शासन व्यवहारकोश' यातील परिभाषेचा उपयोग करावा. त्यातील शब्दांचा अर्थ पटत नसल्यास इतर शब्दांचा उपयोग करावा. महत्त्वाच्या मराठी संज्ञांचे मूळ इंग्रजी शब्द कंसात द्यावेत.

७) निबंधातील आकडेवारीचे संदर्भ अचूक, सुस्पष्ट, परिपूर्ण आणि मान्य पद्धतीनुसार असणे आवश्यक आहे.

८) निबंधाची मांडणी केवळ सांख्यिकी माहितीचे संकलन करून वर्णन करणारी न ठेवता संशोधनात्मक पद्धतीची असावी. त्यामुळे निबंधाची पातळी उंचावेल. निबंध इतर भाषांतून केवळ भाषांतरित नसावेत.

९) निबंधाच्या शेवटी संदर्भ टीपा / संदर्भ सूची प्रमाणित पद्धतीने असावी.

१०) निबंधाच्या अखेरीस ३०० शब्दांत गोषवारा द्यावा.

# मराठी अर्थशास्त्र परिषद
# ४८ वे राष्ट्रीय अधिवेशन, अकोला
# शोधनिबंध लेखकांसाठी निवेदन

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४८ वे वार्षिक अधिवेशन शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला येथे दिनांक ०२,०३ व ०४ नोव्हेबर २०२५ या कालावधीत आयोजित केले जाणार आहे. या अधिवेशनाचे अध्यक्षस्थान देवगाव (रं.) येथील प्रा.(डॉ.) विलास खंदारे हे भूषवतील. सदर अधिवेशनाचे स्थानिक कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ.रामेश्वर भिसे आणि स्थानिक-कार्यवाह प्रा. धनंजय पंजाबराव काळे (७७०९४९६१७८) आहेत. परिषदेच्या चर्चासत्रासाठी खालील विषय निश्चित करण्यात आले आहेत.

१. जोखीम आणि परताव्याचे आर्थिक सिद्धांतन.

२. डॉ. मनमोहन सिंग यांचे अर्थशास्त्रीय योगदान.

३. महाराष्ट्रातील व्यसनाधिनतेचे सामाजिक व आर्थिक पैलू.

वरील तीन विषयाचे शोधनिबंध आपणास मा.अध्यक्षांकडे पाठवता येतील. चौथा विषय तत्कालीन परिस्थितीशी संबंधित असेल आणि तो परिषदेचे अध्यक्ष अधिवेशनापूर्वी जाहीर करतील. त्या विषयावर सदस्यांकडून शोधनिबंध मागविले जात नाहीत. ३० ऑगस्ट २०२५ ही निबंध स्वीकारण्याची अंतिम तारीख राहील. निबंध लेखकांनी आपले निबंध जास्तीत जास्त २००० शब्दांत मांडावयाचे असून, निबंधासोबत ३०० शब्दांत त्याचा गोषवारा सादर करणे अनिवार्य आहे. शोधनिबंध युनिकोड या फॉन्टमध्ये PageMaker या सॉफ्टवेअरमध्ये टाईप करावा. फॉन्ट साईझ १४ असावी. निबंधाची सॉफ्ट कॉपी (सीडी) खाली नमूद केलेल्या मेलवर पाठवावी. निबंध लेखक मराठी अर्थशास्त्र परिषदेचा आजीव सभासद असावा, निबंध मराठीत असावेत, ते पूर्वी कोठेही प्रकाशित केलेले नसावेत. लेखकांनी आपले संपूर्ण नाव व पत्ता, आजीव सभासद क्रमांक, भ्रमणध्वनी, महाविद्यालय / विद्यापीठाचे नाव व पत्ता हा सर्व तपशील मराठीत देणे आवश्यक आहे. निबंधलेखकांनी आपले निबंध पुढील पत्त्यावर पाठवावेत.

**प्रा.(डॉ.) विलास भिकाजी खंदारे**

अर्थशास्त्र विभागप्रमुख, श्री. आसारामजी भांडवलदार महाविद्यालय, देवगाव (रं.) जि. छत्रपती संभाजीनगर ४३१११५ मो. ९४२१३०१५३८

ई-मेल - vilasbkhandare@gmail.com, maparishad1977@gmail.com

**- डॉ. मारोती तेगमपुरे**

कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,

९४२३९९३१३७

महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

(स्थापना : १९ नोव्हेंबर, १९६०)

रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई – ४०० ०२५

दूरध्वनी : ०२२-२४३२५९२९/३१ फॅक्स : ०२२-२४३२ ५९३१ ई-मेल : secretary.sblc-mh@gov.in

संकेतस्तळ : https://msblc.maharashtra.gov.in


**मंडळाच्या योजना**

१. पुस्तक प्रकाशन योजना-विविध विषयांवरील बृहद्ग्रंथ प्रकाशित करणे
२. महाराष्ट्राचे शिल्पकार चरित्रमाला योजना
३. उत्कृष्ट ग्रंथांची भाषांतरे योजना
४. ललित व ललितेतर वाङ्मयाच्या प्रकाशनार्थ अनुदान योजना
५. नवलेखक पुस्तक प्रकाशनासाठी उत्तेजनार्थ अनुदान योजना
६. नवलेखक कार्यशाळा अनुदान योजना
७. नियतकालिकांना अनुदान योजना
८. स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना, विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार योजना, श्री.पु. भागवत पुरस्कार योजना
९. अन्य मराठी साहित्य संमेलनांना अनुदान योजना.

**मंडळाची निवडक प्रकाशने**

१. मृगपक्षिशास्त्र (मूळ संस्कृतासह) हंसदेव विरचित-संपा. मारुती चित्तमपल्ली. पं. नरसिंशास्त्री भातखंडे
२. खगोलशास्त्राचे विश्व - डॉ. जयंत विष्णू नारळीकर
३. कलेची मूलतत्त्वे (R.G.Collingwood यांच्या The Principles of Art या पुस्तकाचे भाषांतर) – स.गं. मालशे, डॉ. मिलिंद मालशे
४. मराठी चित्रपटसृष्टीचा समग्र इतिहास-रेखा देशपांडे.
५. महाराष्ट्राचा खाद्यसंस्कृतीकोश - संपा. डॉ. अनुपमा उजगरे
६. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास खंड पहिला- के.के. चौधरी
७. श्री. चांगदेव पासष्टी (अर्थ व विवरणासहित) – स्वामी नित्यबोधानंदतीर्थ
८. आधुनिक संत आणि समाज - श्री. रवींद्र गोळे

**मंडळाची निवडक ४४४ पुस्तके ई-बुक स्वरुपात मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहेत.**

**मंडळाच्या पुस्तकांचे जिल्हानिहाय वितरक**

१. मॅजेस्टिक बुक स्टॉल, गिरगाव, मुंबई
२. आयडियल पुस्तक, दादर, मुंबई
३. लोकवाङ्मयगृह, प्रभादेवी, मुंबई.
४. लक्ष्मी बुक डेपो, शिवाजी पेठ, ठाणे.
५. अक्षर साहित्य , चिपळूण, जि. रत्नागिरी.
६. अशोक एजन्सीज्, कणकवली, जि. सिंधुदुर्ग
७. ज्योती स्टोअर्स बुकसेलर, नाशिक.
८. अक्षय लॉ बुक सेलर्स, देवपूर, धुळे.
९. मे. शारदा प्रकाशन आणि बुक डेपो, जळगाव
१०. शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, जि. अहमदनगर
११. मॅजेस्टिक बुक स्टॉल, पुणे.
१२. बलशेटवार बुक सेलर्स, सातारा.
१३. गजानन बुक स्टोअर्स, सोलापूर.
१४. मे. अजब पुस्तकालय, कोल्हापूर.
१५. मेहता बुक सेलर्स, कोल्हापूर.
१६. मे. धारा (साकेत) प्रकाशन, औरंगाबाद
१७. दीपाली बुक एजेन्सी, जालना.
१८. देबडबाड पुस्तक भांडार, नांदेड.
१९. शारदा बुक डेपो, अकोला.
२०. भारतीय पुस्तकालय, लातूर.
२१. मेसर्स प्रकाश बुक डेपो, अकोला.
२२. सरस्वती बुक्स अँड स्टेशनर्स, अमरावती.
२३. स्वराज्य भांडार महिला सेवा मंडळ, वर्धा
२४. मे. साहित्य प्रसार केंद्र, चंद्रपूर
२५. साहित्य वितरण केंद्र, चंद्रपूर
२६. मुद्रा बुक डेपो, पालघर
२७. मावळे बुक डेबो, कर्जत, जि. रायगड
२८. सुशांत बुक डेपो, नंदूरबार
२९. रत्नाकर बुक सेलर्स, मिरज, सांगली
३०. पूजा ग्रंथ वितरण, परभणी
३१. गोपाल बुक सेलर, हिंगोली
३२. अनुराग पुस्तकालय, अंबाजोगाई, बीड.
३३. टिकार बुक एम्पोरिअम, जि. बुलढाणा
३४. बालाजी बुक डेपो, वाशिम.
३५. गणेश पुस्तकालय, यवतमाळ.
३६. व्हीजन बुक शॉप, भंडारा.
३७. सनी स्टोअर्स, गोदिंया.
३८. राहुल ट्रेडिंग कंपनी अ‍ॅन्ड बुक डेपो, गडचिरोली

**शासकीय ग्रंथागारांचे पत्ते**
**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची पुस्तके मिळणाऱ्या शासकीय ग्रंथागारांचे पत्ते**

१. संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, नेताजी सुभाष मार्ग, चर्नीरोड, मुंबई ४०० ००४.
दूरध्वनी : (०२२) २३६३२६९३ २३६३०६९५, २३६३११४८, २३६३४०४९

२. व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार, फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी.पी.ओ. नजीक, पुणे ४११ ००१.
दूरध्वनी : (०२०) २६१२५०८०८

३. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार, सिव्हिल लाईन्स, नागपूर – ४४० ००१.
दूरध्वनी : (०७१२) २५६२६१५

४. सहायक संचालक, शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार, शहागंज, गांधी चौकाजवळ, औरंगाबाद ४३१००१.
दूरध्वनी : (०२४०) २३३११०९७

५. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, ताराबाई पार्क, कोल्हापूर – ४१६ ००३.
दूरध्वनी : (०२३१) २६५०३९५ २६५०४०२

**मंडळाकडून प्रकाशित ५२४ ग्रंथांवर २५२ अधिकृत वितरकांना ४० टक्के सूट मिळेल. जास्तीत जास्त पुस्तक वितरकांनी अधिकृत वितरणासाठी सहभागी व्हावे, असे आवाहन सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी मंडळाच्या https://msblc.maharashtra.gov.in संकेतस्थळाला भेट द्या.**

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452

# नॅक द्वारा अ++ (CGPA 3.58) दर्जा मिळविणारे
# विदर्भातील एकमेव महाविद्यालय

Shri Shivaji Education Society, Amravati's

## SHRI SHIVAJI COLLEGE OF ARTS, COMMERCE & SCIENCE, AKOLA



NAAC Re-Accredited with A++ grade with CGPA 3.58
UGC Status of 'College with Potential for Excellence',
DST-FIST level- 0 Support






## Courses Available

| | |
|---|---|
| **Jr. Arts** | Eng, Mar, Hindi, EVS, Economics Political Science, History, Sociology, Co-operation, Home Science Music |
| **Jr. Com.** | English Marathi. Hindi EV S Economics Book Keeping and Accountancy. secretarial Practice. organisation of Commerce. |
| **Jr. Science.** | English, Marathi, Hindi, Chemistry, Biology, Physics Mathematics, Economics, Home Science, IT, Computer Science, Electronics, Electrical Maintenance, Fisheries |
| **HSVC. (MCVC)** | Construction Technology, Automobile Technology, Electrical Technology, Ophthalmic Technician, Food Products Technology |
| **B. A.** | English, Marathi, Hindi, Economics, History, Political Science, Sociology, Philosophy, Geography, Music, Eng. Litrature, Marathi Lit. Hin. Lit., Psychology, Purfurming Arts, Home Economics |
| **B.Com.** | English & Marathi Medium |
| **B.Sc.** | Chemistry, Zoology, Geology, Biochemistry,Bctany, Mathematics, Computer Sol., Electronics, Forensic Science, Physics, Biotechnology, Microbiology, Statistics, Home Science |
| **M.A.** | Economics, English, Marathi, Sociology, Music, Physiology, Philosophy, Political Science, History, Hindi |
| **M.Com.** | English & Marathi Medium |
| **M.Sc.** | Chemistry, Physics, Zoology, Geo-informatics, Biochemistry, Computer Sci., Microbiology, Botany, Mathematics, Electronics, Statistics, Forensic Science, Herbal Science Home Science • Human Development, Textile & Clothing, Nutrition |
| **Ph.D.** | Chemistry, Zoology, Microbiology, Botany, Home Science, Biochemistry, Commerce, Economics, Marathi, History, Pol.Science Sociology, English, Physics |
| **COP** | Functional English, Tourism, Foundation Course in Human Rights, Human Rights & Educational Certificate Course, Library & Office Automation, E-Commerce, Insurance, Analytical Chemistry, Bio-Technology, Information & Computer Technology, Clinical Laboratory Technology, Bio-Medical Instrumentation, Fashion Designing, Assembly & Manufacturing of Electronic kits |

**महाविद्यालयाची वैशिष्ट्ये**

- प्रशस्त इमारत
- प्रशस्त क्रिडांगण
- उच्च शिक्षीत व अनुभवी प्राध्यापक वर्ग
- शुशोभित व अत्याधुनिक सुविधायुक्त वर्गखोल्या
- ई-लर्निंग क्लासरुम उपलब्ध
- संगणक कक्ष, प्रयोगशाळा, वाचनालय उपलब्ध
- महाविद्यालयात सीसीटीव्ही कॅमेराची सुविधा
- पिण्यासाठी फिल्टर व वाटर कुलचे शुद्ध व थंड पाणी
- नियमीत अतिरिक्त पुरक मार्गदर्शन
- करियर गायडन्स व प्लेसमेंट सेल
- स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र
- गर्ल्स व बॉइज कॉमन रुमची व्यवस्था

**अधिक माहितीकरीता अवश्य भेट द्या**

**www. shivajiakola.ac.in**



**Shri. Harshvardhan P. Deshmukh**
President,
Shri Shivaji Education Society, Amravati



**Dr. Rameshwar M. Bhise**
Principal